
साप्ताहिक

२२ डिसेंबर८४ / २ रुपये

# माणूस

## युनियन कार्बाइड



## आज अवस्था काय आहे?

## निवडणुकीतील हैदोस

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : चोविसावे

अंक : तिसावा

¤

२२ डिसेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

राजू देशपांडे

# पंतप्रधानांची पुण्यातली पहिली सभा

नव्या पंतप्रधानांना पहाण्याची, त्यांचं बोलणं ऐकण्याची संधी पुणेकरांना निवडणुकांमुळे मिळाली. त्यापूर्वीही दर्शन घडलेलंच होतं; पण ते दूरदर्शनवरून. इंदिराजींच्या अखेरच्या प्रवासाची तयारी करताना, गंभीर चेहऱ्याने चितेला अग्नी देताना, प्रदक्षिणा घालताना, कलश घेऊन विमानात बसताना, लोकांनी केलेल्या सांत्वनाला तोंड देताना. तेव्हा वेगवेगळ्या परदेशी पाहुण्यांचे–अध्यक्षांचे आणि मंत्र्यांचे स्वागत करतानाही त्यांना दूरदर्शनवर पाहिलं होतं. मार्गारेट थॅचर, झिया, अमेरिका–रशियाचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करतानाही त्यांना पाहिलं होतं. ती दृश्यं पहाताना नव्या पंतप्रधानापेक्षा कर्तबगार आईचा चांगला मुलगा असंच चित्र डोळ्यावर ठसलं होतं. समजुतदार, शांत डोक्याचा, धीरोदात्त.

मग सुरू झाल्या पेपरमधून बातम्या. तोपर्यंत निवडणुका जाहीरही झाल्या होत्या. नव्या पंतप्रधानांबद्दल, त्यांच्या नव्या प्रशासकीय कार्यपद्धतीबद्दल अंदाज व्यक्त होत होते. राजीव गांधींचा उल्लेख 'मि. कॉम्प्यूटरजी', 'अच्छा लडका' असे होत होते. नव्या सरकारचं धोरण व्यवस्थापनाच्या ताब्यात जाणार असे अंदाज वर्तवले जात होते. निवडणुकीसाठी करायच्या प्रचार जाहिरातींचं 'कॉन्ट्रॅक्ट' पंतप्रधानांनी एका परदेशी कंपनीला दिल्याचीही बातमी आली. तसा नव्या पंतप्रधानांना परदेश जास्त जवळचा असणं शक्य आहे. कारण त्यांची बरीच वर्षं परदेशातच गेली.त्यांची पत्नीही परदेशी. अशी वेगळी पार्श्वभूमी असलेले राजीव गांधी योजनापूर्वक राजकारणात आणले गेले आणि योगायोगाने तडकाफडकी पंतप्रधान झाले. आता त्यांना या देशाबद्दल, या माणसांबद्दल बोलायचं होतं. त्यांना समजून घ्यायचं होतं. देशातल्या आणि विदेशातल्या राजकारणाच्या वेगवेगळ्या पातळ्या समजून घेऊन स्वतःच्या पक्षाचं धोरण ठरवायचं होतं. राजकारणाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना (इंदिराजी या त्यांची आई असतानासुद्धा ?) किंवा अनिच्छेनेच राजकारणात उतरलेल्या व्यक्तीचा हा राजकीय प्रवास लोक कुतुहलाने बघत होते. या भावनेत गांधी–नेहरू घराण्याबद्दलचं कौतुक, आदर होता, आई–वडील–भाऊ हयात नसलेल्या तरुण मुलाबद्दलची सहानुभूती होती आणि विरोधी पक्षनेत्यांबद्दलची कडवट प्रतिक्रिया होती. राजीवची पंतप्रधान म्हणून झालेली निवड म्हणूनच कोणाला 'लादलेली' वाटली नाही. उलट लोकांनी त्याचं स्वागतच केलं. हे स्वागत उफाळून आलं डिसेंबरच्या १५ तारखेला. पक्षाची जाहीर प्रचारसभा पंतप्रधान पुण्यात घेणार असं जाहीर झालं आणि कार्यकर्त्यांची तयारी जोरात सुरू झाली. एस. पी. कॉलेज मैदानावर सुरक्षा अधिकाऱ्यांची आणि पोलिसांची वर्दळ सुरू झाली. शनिवारी १५ तारखेला साडेतीन वाजता सभा जाहीर झाली होती. पंतप्रधान ज्या मार्गावरून जाणार त्या मार्गाचा पक्का बंदोबस्त होता. पुण्याच्या म्युनिसिपल स्पोर्टस्च्या मैदानावर पंतप्रधानांचं हेलिकॉप्टर उतरणार होतं. त्यामुळे तिथंही कडक बंदोबस्त. १४ तारखेला काँग्रेसच्या हाताच्या पताका जागोजागी लागल्या होत्या.

सभा सुरू होणार होती साडेतीनला. माणसांच्या झुंडी मात्र दोन वाजल्यापासून एस. पी. कॉलेजकडे चालल्या होत्या. २॥ वाजता मैदानाचा जवळजवळ अर्धा भाग भरून गेला होता. ३–३। वाजता मैदान फुलायला लागलं. चारीबाजूंनी माणसं वहात होती. पुढे बसायला मिळावं म्हणून धडपड होती. या रेटारेटीत मुली आणि बायकापण होत्या. प्रथमच आपल्या गावात आलेल्या पंतप्रधानांना लोकांना जवळून पहायचं होतं. किमान

'पहायचं' होतं. पुढे बसण्याच्या या रेटारेटीत पुरुषांपेक्षा बायकाच जास्त होत्या. काँग्रेस पक्षातर्फे वाटले गेलेले 'निमंत्रका'चे पास या बायकांच्या हातात होते. प्रमाणापेक्षा पास जास्त वाटले गेल्यामुळे बसण्याची व्यवस्था कोलमडली होती. मुठीत पास घट्ट पकडून बायका पोलिसांशी कर्कश्य आवाजात भांडत होत्या. पत्रकारांची बसण्याची सोयही चांगली नव्हती. खुर्च्या कमी होत्या. त्यामुळे एका खुर्चीवर दोन-दोन माणसं बसली होती. शिवाय पत्रकारांच्या जागेत सुरक्षा अधिकाऱ्यांचे नातेवाईकही असल्यामुळे, जागा कमीच पडली असती. ३॥ वाजता आवार पूर्ण भरलं होतं आणि तरीही माणसं येताना दिसत होती. आजूबाजूचे पत्रकारमित्र कोणती जागा कोणाला मिळणार असल्या चर्चा करत होते. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध न होणारी बरीच 'रंजक' माहिती कळत होती. बारामतीतून शंभर एक ट्रक आले होते ! माणसं उतरवून ते सिंहगडपाशी उभे होते म्हणे. अंदाज केला शंभर ट्रकमधून प्रत्येकी दिडशे धरली तरी १५००० माणसं होतात. आणि आता समोर होती ती गर्दी पहाता ट्रकमधून आणलेली माणसं एका कोपऱ्यात मावली असतील. समोरची गर्दी खरी होती. आपल्या 'हिरो' ला बघायला जमलेल्या 'पब्लिक'ची ती गर्दी होती. त्यांना इंदिरा गांधींबद्दल जे आकर्षण आहे, अमिताभबद्दल जे आकर्षण आहे तेच राजीव गांधींबद्दल आहे. तो काय बोलणार, कोणती धोरणं राबवणार, अमेरिकेला जवळ करणार की रशियाला याच्याशी त्यांना घेणं नाही. पंतप्रधान म्हणून त्यांनी त्याला स्वीकारलंच आहे. आता फक्त हेलिकॉप्टरमधून उतरून स्टेजच्या पायऱ्या झपझप चढणारा, गर्दीतून वाट काढत पुढे येणारा आणि हात हलवून स्वागताचा स्वीकार करणारा राजबिंडा हिरो त्यांना पहायचा आहे.

साडेतीनची सभा ४ वाजून ५० मिनिटांनी सुरू होणार असल्याची घोषणा झाली. वाटलं बाप रे, अजून पन्नास मिनिटं ? गर्दीकडे बघता बघता उन्हाची तिरीप पुढेही गेली. आणि आकाशात हेलिकॉप्टर दिसलं. आता फक्त २।३ मिनिटात स्टेजवर. गर्दी तशी शांत होती. फक्त उत्सुकतेनं ताणलेली होती. आणि 'तो' आला. पांढरी सुरवार, पांढरा झब्बा आणि गळयात निळया कडेचं उपरणं. त्याच्या आईसारखाच तो झपझप स्टेजवर गेला. दोन्ही हात हलवून त्यानं उत्स्फूर्त जमलेल्या गर्दीला अभिवादन केलं. लोक आजूबाजूला म्हणत होते– 'टिव्हीवर दिसतो त्याच्यापेक्षा पर्सनलिटी छान आहे !'

पंतप्रधानांचं भाषण सुरू होण्यापूर्वी विठ्ठलराव गाडगीळ, शंकरराव पाटील, आणि रामकृष्ण मोरे दोन दोन मिनिटं बोलले. पण ती सहा मिनिटंसुद्धा समोरच्या गर्दीला जास्त वाटली. आणि मग तो बोलायला उठला. जराश्या गबाळया कपड्यातला, जरा शिणलेल्या चेहऱ्याचा, मध्यमवयीन राजीव गांधी. मलासुद्धा 'अच्छा लडका'च वाटला. असेल बेरकी; पण दिसतो मात्र साधासरळ.

मग भाषण सुरू झालं. माता, भगिनी, वडीलधारे आणि बंधूंनो (माँ, बहनों, बुजुर्गों और बंधू...) वा ! आणखी काय पाहिजे ? मग त्यानं नेहमीप्रमाणं विरोधी पक्षांवर आरोप केले, पक्षाची प्रतिमा डागाळणाऱ्यांवर कारवाई करू, स्त्रियांवरचे अत्याचार, समानसंधी, बलशाली स्वयंपूर्ण भारत, आसाम काश्मिर-पंजाब आंदोलनं–आनंदपूर ठराव, भ्रष्टाचार वगैरे सगळे मुद्दे एका पाठोपाठ एक आणले. त्याच्या बोलण्यात आवेश, आक्रमकता नाही. पण त्याचा आवाज संथ, आश्वासक आहे. बोलणं थोडं अस्पष्टच; पण त्याच्या 'चांगल्या मुला'च्या प्रतिमेत अचूक बसणारं. तरीही 'हम वो करेंगे', 'मैं ये बहोत सोच समझकर गंभीरतासे बोल रहा हूँ' या सारखी ठाम लयदार वाक्य सहजतेनं येत होती, पढवलेली का असेना पण 'तयारी' नक्कीच चांगली होती. या तयारीला तशी दादही मिळाली. लोक टाळया देत होते, घोषणा करत होते, हात हलवून त्याच्या बोलण्याला प्रतिसाद देत होते. खुर्चीच्या पाठीमागे लागणाऱ्या, भ्रष्ट, स्वतःसाठी सत्ता वापरणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करू, सक्तीनं पक्षातून बाहेर घालवू, ही त्यांची आश्वासनं. लोकांना आणखी काय पाहिजे ? हे सगळं जर नव्या पंतप्रधानांच्या व्यवस्थापनानं घडवलं तर स्वर्गच हातात आला. बोलता बोलता राजीव गांधी आणखी एक महत्त्वाचं वाक्य बोलले. 'आज नीतीमूल्य आपल्यातून हरवली आहेत. आपण पुन्हा ती मूल्यं शोधून त्यांची स्थापना केली पाहिजे' हे ऐकल्यावर वाटलं कशाच्या का सहाय्याने होईना, मग कंम्प्यूटर त्यासाठी वापरावा लागला तरी चालेल. ही हरवलेली मूल्य जर पंतप्रधान पुन्हा आणणार असतील तर त्याचं स्वागतच आहे. फक्त तो कंम्प्यूटर भारतीय बनावटीचा असावा अशी जर आम्ही गरिबांनी मागणी केली तर ती फारशी चूक नाही ना मि. कंम्प्यूटरजी ?

**– मेधा राजहंस**


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# युनियन कार्बाइड : सावधानतेचे नियम केव्हा करणार?

**विनायक गोखले**

बुधवार दिनांक ५ डिसेंबरचे सकाळचे वर्तमानपत्र हे भारतीयांचेच नव्हे, तर जगातील सर्व वाचकांच्या काळजाचे ठोके चुकवणारे ठरले. इंदिरा गांधींची हत्या व त्यानंतर झालेली जाळपोळ, लुटालूट आणि त्याहून भयंकर अशी मनुष्यहानी यांनी भारतीय मनावर आलेले दडपण अजून कुठे कमी होत होते... तोच ही बातमी झळकली.

भोपाळ, मध्यप्रदेशची राजधानी. जातीय तणाव याकरता कुप्रसिद्ध. दरोडेखोरी, जमीनदारी आणि त्यासंबंधात राजकीय हस्तक्षेप व शेजारी राज्यांवर केल्या जाणाऱ्या कुरघोड्या... यासारख्या कटु बातम्या वाचायची सवय, फुलनदेवीचे प्रताप आणि तिचा अटक समारंभ यासारख्या चमचमीत परंतु काळी किनार असणाऱ्या बातम्यांच्या संदर्भात इतकी भयानक बातमी कोणाच्या मनी स्वप्नी नव्हती. सध्याच्या राजकीय परिस्थितीत ही बातमी 'खरोखरच काल्पनिक असावी' अशी सर्वांची इच्छा आदल्या दिवशी बातमी ऐकल्यापासून होती; पण नाही. आदल्या दिवशी ऐकलेल्या बातमीच्या किती तरी पट भयानक चित्र हे दुसऱ्या दिवशी पेपर वाचल्यावर डोळ्यासमोर उभे राहिले.

चार डिसेंबर या दिवसाची नुकतीच सुरुवात होती. वाढत्या थंडीत स्वतःला गुरफटून घेतलेले भोपाळ शहर १.३० च्या सुमारास जागे झाले. अस्वस्थपणा वाटत होता. स्टेशन आणि भोवतालच्या प्रदेशात याच वेळेला मृत्यूघंटा वाजू लागली. माणसांना श्वासोच्छ्वास जमेना, डोळे व छातीत जळजळायला लागलं. लोकं जीव मुठीत घेऊन स्वैर पळू लागली, किती जगले? किती वाचले? कोणाला ठाऊक; परंतु झालेल्या प्रकारास कारणीभूत होता विषारी वायू! एवढे सकाळपर्यंत सर्वांना समजून चुकले. हा विषारी वायू आला कुठून?

युनियन कार्बाइड कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन उद्योगसमुहाची एक शाखा भारतात आहे. युनियन कार्बाइड ही बहुराष्ट्रीय कंपनी भारताशिवाय अनेक राष्ट्रात आपला पसारा वाढवून आहे, तर युनियन कार्बाइड इंडिया या उद्योगाचा एक प्रकल्प भोपाळ येथे स्टेशनपासून दोन कि. मी. अंतरावर आहे. भोपाळ येथील प्रकल्पात कीटकनाशके तयार केली जातात. युनियन कार्बाइड ही कंपनी नुसती कीटकनाशकं किंवा Agro chemicals च नव्हे तर इतर अनेक औद्योगिक क्षेत्रात हातपाय पसरून आहे. FERA खाली येणाऱ्या युनियन कार्बाइड या कंपनीचे ५१ टक्के भाग भांडवल युनियन कार्बाइड ह्या मूळ अमेरिकन कंपनीचे आहे. कलकत्ता स्टॉक एक्सचेंज येथे रजिस्टर्ड असलेल्या युनियन कार्बाइड इंडिया या उद्योग समूहाच्या अॅग्रो इंडस्ट्री, मरिन, प्लास्टीक व बॅटरी या शाखा आहेत. गेले काही वर्षं या उद्योगसमूहाच्या, बॅटरी व प्लास्टीक या शाखा सोडून इतर फारशा लाभदायक नाहीत आणि हा उद्योगसमूह विशेष दर्जेदार म्हणून जसा प्रसिद्ध नाही तसा दर्जाहीन म्हणून सुद्धा नाही. भारतातील २४ हजार गुंतवणूकदारांचे १५ ते १६ कोटी रुपयांचे भाग भांडवल असलेल्या उद्योगसमुहात २६ हजार असेही आहेत की, ज्यांनी रोखे व ठेवीद्वारे पैसे गुंतवले आहेत. रिलायन्स टेक्साइल या भारतातील सुप्रसिद्ध उद्योगाशी चाललेले व्यवहार हे सुद्धा युनियन कार्बाइड संबंधी चर्चेचा विषय असणारे होते. अशा तऱ्हेची बहुराष्ट्रीय तसेच भारतीय औद्योगिक क्षेत्रात नाव असलेल्या या उद्योग समुहाने भोपाळ येथे कीटकनाशके बनवायचा प्रकल्प १९७९ मध्ये सुरू केला.

## तो वायू कोणता होता?

या प्रकल्पात फंगीसाइडस्, मेटीसाइडस्, नॅमेरोसाइडस्, हरबीसाइडस्, सेविन इनसेक्टीसाइडस्, सेविमोल इनसेक्टीसाइडस्, सेविडॉल इनसेक्टीसाइडस्, टेमीक इनसेक्टीसाईडस्, सिरमेट इनसेक्टीसाइडस् यांचेही उत्पादन केले जाते. सेविन इनसेक्टीसाइड हे उत्पादन सुमारे पंधरा-सोळा वर्षापूर्वी फार प्रसिद्ध व परिणामकारक होते. कापसाच्या बोंडावर त्याचा वापर किडीपासूनच्या स्वरक्षणाकरता केला जातो. ६८ ते ७२ या काळात सेविन हे उत्पादन बाजारातून अनेकांना ब्लॅकमध्ये घ्यावे लागे. पुढे ते कालबाह्य ठरू लागले व त्याचा खप कमी झाला. सेविनचाच नव्हे तर युनियन कार्बाइड या उद्योग समूहाच्या अॅग्रोकेमिकल शाखेची उलाढाल कमी झाली. सेविनचा आणि इतर कीटकनाशकांचा वाढता खप पाहून त्यांनी भारतात उत्पादनांना सुरुवात केली होती; पण त्यात त्यांना विशेष यश मिळत नव्हते. भारतात या व्यवसायात त्यांनी उडी जरी आधीच घेतली असली तरी ६९ साली भोपाळ प्रकल्पाला सुरुवात होईपर्यंत ते ही उत्पादने आयात करत. ७९ साली हा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या पूर्ण झाला आणि पूर्ण उत्पादनाला प्रारंभ झाला. या कारखान्यासाठी युनियन कार्बाइडने सुमारे २५ कोटींची गुंतवणूक केली होती. उद्योगसमूहाची एकत्रित विक्री जरी २१० कोटी रुपयाची असली तरी त्यापैकी किटकनाशकांची विक्री होती फक्त १० कोटी रुपयांची! या कीटकनाशकांच्या विक्रीत दिवसेंदिवस जी घट होत होती ती बघण्यासारखी आहे. ५००० टन क्षमता असणाऱ्या या प्रकल्पात १९८२ मध्ये २३०८ टन तर ८३ मध्ये १६४७ टन तर या वर्षी सुमारे १६०० टन कीटकनाशकांचे उत्पादन झाले.

या कीटकनाशकांच्या उत्पादनांसाठी लागणारा मुख्य कच्चा माल म्हणजे MIC मिथील आयसो सायनेट हा. या प्रकल्पात तीन टाक्या अशा आहेत ज्यात MIC साठवला जातो. ३ व ४ डिसेंबरच्या रात्री काही भाग जमिनीच्या थोड्या आत व बाकी बाहेर असणाऱ्या या तीन टाक्यांपैकी एकीतून गळती सुरू झाली आणि तीच पुढच्या

अनर्थाला कारणीभूत ठरली.

टाकीतून जी गळती सुरू झाली त्यामुळे वातावरणात एक विषारी वायू पसरला. वासहीन आणि रंगहीन असलेला हा वायू जड असल्याने व कदाचित धुक्यामुळे खाली आला. अतिविषारी असलेल्या ह्या वायूपासून वरील परिस्थितीत सुटका करून घेणं अशक्य होते. हा वायू होता तरी कोणता ? MIC ? मिथाइल आयसो सायनेट हा काही इतका विषारी वायू नाही की ज्याच्या श्वसनानी लगेचच मृत्यू यावा ! या वायूच्या प्रादुर्भावाने इतर काही शारिरीक त्रास उद्भवतात; पण त्याची ताकद माणसं मारण्यात नाही याची खात्री डॉक्टरांनी दिली. मग मिथाइल आयसो सायनेट तयार करण्याकरता लागणाऱ्या वायूंपैकी एखादा तर नसेल ? अशी शंका सर्वत्र व्यक्त होऊ लागली; पण तो दुवा सुद्धा लवकरच निखळला. मरणाऱ्या आणि आजारी पडणाऱ्या लोकांना तपासताना संशोधकांना शंका आली ती फॉसिजीनची. फॉसिजीनसंबंधी 'एक फॉसिजीनची बाटली एका बॉंबइतके काम करते' असे अभिप्राय मिळाले. गुदमरल्यासारखे होणे, डोळ्यातून पिवळा द्रव येणे व जळजळणे, छातीत जळजळणे आणि फुफ्फुसात प्राणवायू शोषणास आडकाठी करणाऱ्या भिंती होणे.

## वाढलेले तपमान आणि दाब

ही लक्षणे श्वसनातून आलेला वायू फॉसिजीन असावा असे वाटणारी होती. हा फॉसिजीन असेल तर तो आला कुठून ? गळती असलेल्या टाकीत फॉसिजीन नव्हता हे निश्चित होते. कंपनीत कोठेच फॉसिजीनची साठवणूक केली नव्हती. काही संशोधकांचं म्हणणं असं पडलं की, मिथाइल आयसो सायनेट हा वायू मोठ्या प्रमाणावर बाहेर आल्यावर त्याचे नैसर्गिक विघटन होऊन फॉसिजीन बनला व तो घातकी ठरला. अर्थात हा सर्व वैज्ञानिकांचा उहापोह ! पण प्रत्यक्षात कोणत्या वायुमुळे ही दुर्घटना घडली याची कोणालाच खात्री नाही. कारण 'मृत्यूची कोठारे' म्हणून ज्याचे आता सर्वत्र वर्णन केले जाते त्या MIC च्या टाकीत थेंबभरसुद्धा वायू शिल्लक नाही की, ज्याचा वापर करून दुर्घटना कोणत्या वायूमुळे झाली हे समजू शकेल. या टाकीला गळती लागली ती छोट्याशा स्फोटामुळे; आणि या स्फोटाला कारणीभूत झाले MIC चे वाढलेले तपमान. तपमान वाढल्याने या टाकीतील दाब वाढला व सेफ्टी व्हाल्व उडून गेला. टाकीतले तपमान कशामुळे वाढले असावे यासंबंधी दोन तर्क केले जातात. पाण्याचा थेंब किंवा एखादे मेटॅलीक सॉल्ट या टाकीतील MIC चे तपमान वाढवू शकते. एखादा गंजलेला कणसुद्धा या घटनेस कारणीभूत ठरू शकतो. अपघात झाला ती टाकी आहे स्टेनलेस स्टीलची, त्याला जोडणाऱ्या दोन स्टीलच्या नळ्या आर्द्र नत्र वायू आणि मेथिल आयसो सायनेट टाकीत आणतात. या नळ्यातून असा एखादा कण आला नसेल ना ! अशी शंका संशोधक व्यक्त करत आहेत ! टाकीतील दाब मापक व तपमापक यंत्रे मोडून पडली होती. टाकीतील दाब ५५ व तपमान १००° पेक्षा जास्त वाढल्याने ती मोडून पडली आणि वाढलेल्या दाबामुळे सेफ्टी व्हाल्व उडाला आणि विषारी वायु आपले भक्ष्य शोधत बाहेर पडला.

अपघात घडला; पण त्यानंतर, जाणवलेली गोष्ट म्हणजे शासन यंत्रणेचा अभाव. भोपाळमधून मुंबई अथवा पुण्यात आलेल्या व्यक्तींनी आपले मनोगत वेगवेगळ्या वर्तमानपत्रांना सांगताना हेच प्रतित केले. विषारी वायू शहरात पसरत आहे म्हणून सायरन वाजवणे, जीपमधून सूचना देत हिंडणे, शहरातील कोणता भाग सुरक्षित आहे. याची जाणीव नागरिकांना वेळेवर करून देण्यात शासन अयशस्वी ठरले. कारखान्याच्या शेजारील झोपडपट्टीतील नागरिकांना भराभरा हलवण्याचे धाडस दाखवण्यास पोलीस असमर्थ ठरले. मुळातच निवडणुकांचे रंग चढू लागले आहेत. त्यामुळे जीप व मोटारी यांचा अभाव जाणवला असेल. सरकारी वाहनांचे उपयोग अशा कामांसाठी सुद्धा करावे लागतात याची जाणीव त्या मंडळींनी यापुढे ठेवली तरी पुष्कळ मिळवले ! कोसळलेली शासनयंत्रणा आणि सैरभैर झालेले नागरीक यामुळे अनर्थाची भयानकता अजूनच वाढली. रस्त्यांवरती, रेल्वेस्टेशनात, किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी अनेक माणसं मरून पडली होती. 'काळीज गलबलून टाकणारी दृश्य होती' हा तेथील लोकांचा अनुभव वाचकांच्या मनाला चाटून जाणारा होता.

भोपाळमधील २० टक्के लोकांना या अपघाताचा उपसर्ग पोहचला. दोन हजारावर माणसे मेली. अनेकांना अंधत्व आले. पांगळी झालेलीसुद्धा कमी नाहीत व अत्यवस्थ सुद्धा. या विषारी वायुचा परिणाम येथील अनेक नागरिकांना यापुढे अनेक दिवस भोगावा लागेल. मृतांच्या संख्येतली होत असलेली वाढ हेच त्याचे द्योतक होय; परंतु भोपाळ व आसपासच्या भागात असलेल्या हॉस्पिटलनी जी कामगिरी बजावली व बजावत आहेत ती खरोखरच संतोषजनक आहे. सुमारे लाखभर नागरिक तपासणी व उपचाराकरता आलेले असताना, तपासणी आणि उपचाराबाबत अजून कोणी ब्र काढलेला नाही. भोपाळहून पुण्यात आलेल्या एका रुग्णावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी येथील स्थानिक वर्तमानपत्राला सांगितले की, 'या रुग्णावर उपचार करताना मला जाणीव होत आहे की, अशा हजारो रुग्णांवर उपचार करणाऱ्यांची काय स्थिती झाली असेल.'

## सवंग लोकप्रियतेमागे

भोपाळची दुर्घटना घडल्यावर युनियन कार्बाइडचे पश्चिम व्हर्जिनिया आणि जॉर्जीया येथे असलेले प्रकल्प ताबडतोब बंद केले गेले. अर्थात या प्रकल्पातसुद्धा ते MIC तयार करत नव्हते. MIC फक्त भारतातच तयार करणारे युनियन कार्बाईड, ह्या वायूचा इतरांनासुद्धा पुरवठा करतात. वरील प्रकल्प बंद करण्याचे आदेश देऊन युनियन कार्बाइड-अमेरिकाचे अध्यक्ष अँडरसन यांनी भारताकडे धाव घेतली. प्रथम मुंबईत आणि तेथून भोपाळला रवाना झाले. इकडे भोपाळमध्ये कारखान्याला सील ठोकण्यात आले होते. जबाबदार असणाऱ्या कामगारांना अटक करण्यात आली आणि आश्चर्य असे की, कारखान्यातील एकाही कामगाराला या वायूचा प्रादुर्भाव झाला नाही.

भोपाळला उतरलेल्या श्री. अँडरसन या 'युनियन कार्बाइड अमेरिका' च्या अध्यक्षांचे स्वागत झाले ते बेड्यांनी ! त्यांना उतरल्या उतरल्या अटक केली या अपघाताला जबाबदार धरून! व त्यांच्याबरोबर युनियन कार्बाइड

भारताचे अध्यक्ष श्री. महिंद्र व कार्यकारी संचालक वसंत गोखले यांनासुद्धा अटक केली. या अटकेचे आदेश मध्य प्रदेश सरकारने दिले.[१] एकीकडे न्यायालयीन चौकशी सुरू केली आणि दुसरीकडे स्वत: अटकेचे आदेश झाडले. सवंग लोकप्रियतेकरिता हपापलेले राजकारणपटु अशा वेळी कोणतीही पावलं किती झटपट टाकू शकतात हे पुन्हा एकवार दिसून आले. कारखाने आणि झोपडपट्टी हे नेहमी हातात हात घालून चालतात आणि या दोन्ही सध्याच्या सरकारच्या गरजा आहेत. त्यापैकी कोणालाच ते डावलू शकत नाहीत. असे कारखाने शहरात असू नयेत आणि अशा कारखान्यांभोवती वस्ती वाढू देऊ नये या दोन्ही नियमांना नेहमीच चाट देणारे सरकार असलेल्या सवंग लोकप्रियते-शिवाय काय मिळवू शकेल? मुंबईच नव्हे तर भारतातील झोपडपट्टी ही 'समस्या आहे' असे ज्यांना वाटतच नाही, त्यांच्याकडून अपेक्षा तरी काय धरणार? एरवी आंतर-राष्ट्रीय संकेत पाळण्याकरिता धडपडणारी आणि आंतरराष्ट्रीय परिषदा भरवण्यात वेळ घालवणारी शासकीय यंत्रणा फार तर अँडरसन यांना भारतात येण्यास मज्जाव करू शकली असती किंवा कारखान्याच्या परिसरात जाण्यास बंदी घालू शकली असती. नुसते अँडरसनच नव्हे तर श्री. महिंद्र ह्यांची अटकसुद्धा निषेधार्थ आहे. दैनंदीन कामात संबंध नसणारे श्री. महिंद्र यांची अटक काय कपाळ करणार? श्री. गोखले व श्री. महिंद्र थोडेच कोठे पळून जाणार आहेत? आणि त्यातून न्यायालयीन चौकशी समिती आव-श्यकता वाटली तर त्यांना अटक करेल की! मध्य प्रदेश सरकारला हा उद्योग करायची आवश्यकता होती का? जे. आर. डी. टाटां-सकट अनेकांनी याचा निषेध केला. तरी नशीब हे की, श्री. अँडरसन यांना अटक करून सहा तासांनी जामीनावर सोडले! भारतात श्री. अँडरसन यांना सुरक्षिततेची हमी देऊनसुद्धा अशी घटना घडावी. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांनी या अट-केची जबाबदारी स्वत:वर घेतली आहे. अर्थात जबाबदारी घेतली म्हणजे काय केलं त्यांचे त्यांना ठाऊक! पण निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन, आपल्या धाडसाचे प्रतिक दाखवण्या-करता ही अटक केली गेली हे सर्वांना कळल्याशिवाय राहणार नाही. जर धाडस दाखवायची एवढी खुमखुमी होती तर गेल्या पाच वर्षात दरोडेखोरांबरोबर वाटाघाटी करण्याची आणि त्यांच्या हातापाया पड-ण्याची वेळ आली नसती.

### नुकसान भरपाई कोण देणार?

श्री. अँडरसन यांच्या अटकेचा निषेध करणे म्हणजे युनियन कार्बाइड या उद्योग-समूहाची बाजू घेणे असा अर्थ होत नाही. उत्पादन घटलेल्या व घसरलेली विक्री अस-लेल्या या प्रकल्पाकडे त्यांचे दुर्लक्ष झालेले असणे नाकारता येत नाही. कारखाना बंद करावा की काय? असा त्यांचा विचार चाल

## भागधारकांचं काय होणार?

१९३४ साली नॅशनल कार्बन कंपनी ऑफ इंडिया ह्या खाजगी उद्योगास प्रारंभ झाला. आर्क कार्बन आणि इंडस्ट्रियल कार्बन इलेक्ट्रोड आणि शेपस् यांच्या उत्पादनांना सुरुवात झाली. पुढे १९५५ मध्ये याच उद्योगाचे 'प्रायव्हेट लिमिटेड' मधून 'पब्लिक लिमिटेड' मध्ये स्थलांतर झाले. चार वर्षात या उद्योगाचे नामांतर झाले 'युनियन कार्बाईड इंडिया लिमिटेड' असे. युनियन कार्बाईडची अनेक उत्पादनं आहेत. बॅटरीज्, फ्लॅश लाईट केस, आर्क कार्बन, इंडस्ट्रियल कार्बन इलेक्ट्रोड,फोटो एनग्रेव्हरस प्लेट, स्टॅलाइन कास्टिंग, इलेक्ट्रोलाइट मॅंगॅनीज डायऑक्साईड, केमिकल्स, पॉलिथीन, MIC पेस्टीसाईडस् आणि मरिन प्रॉडक्टस्.

हा उद्योग समूह मोठा असला तरी भाग धारकांच्या दृष्टीने फारसा किफायतशीर नाही. १९७१ साली ७५ कोटीची विक्री वाढत वाढत ८३ साली २१० कोटींवर गेली. उद्योगाचा पसारा एवढा वाढूनसुद्धा ह्या उद्योगाने भागधारकांच्या हातावर डिव्हिडंड कधीच ठेवला नाही. १९७३ साली दिलेला डिव्हिडंड १०.१८% हा सर्वोच्च आहे, तर ७५ साली दिलेला ६.२५% हा सर्वात कमी. तरी पण अधूनमधून काहीना काही 'फायदे' भागधारकांना दिल्याने त्यांच्या १० रुपये दर्शनी किंमतीच्या शेअरचे मूल्य २५ ते ३० रुपये असायचे. ७४ एप्रिलमध्ये चढलेला भाव (५२.४०) आणि ७७ जुलैमध्ये घसरलेला (१८.६०) भाव ह्या त्याच्या कमाल व किमान किंमतीच्या पातळ्या. कलकत्त्याला असलेल्या बॅटरी डिव्हिजनमध्ये ७३ साली झालेला ११७ दिवसाचा संप वगळता या उद्योग समुहाला उत्पादनक्षेत्रात कोणत्याच अडचणी नव्हत्या.

सर्वांना माहिती असलेले त्यांचे उत्पादन म्हणजे 'एव्हररेडी' बॅटरी. तीच ती 'लाल एव्हरेडी' जिचे युनियन कार्बाईड दरवर्षी ५१२ मिलियन इतकं उत्पादन करतात आणि तीच सर्वात जास्त नफ्याची शाखा. एके काळची 'सेवीन'ची लोकप्रियता पाहून, एक्झीम बँक वॉशिंग्टन व फस्ट नॅशनल बँक यांकडून २.५ मिलियन डॉलरचे कर्ज घेऊन १९६९ ते १९७९ मध्ये MIC वर आधारीत किटक नाशकांच्या उत्पादन प्रकल्पाला प्रारंभ केला. पुढे पुढे सेवीनची लोकप्रियता घसरली व तोटा येऊ लागला. ५००० टन किटकनाशक तयार करण्याची परवानगी घेतल्यावर ५००० टन उत्पादनाची क्षमता असणारा प्रकल्प सुरू केल्यावर प्रथम उत्पादन बाहेर पडलं ते ७७ मध्ये ३२१ टन. ७८ मध्ये ३६७, ७९ मध्ये १४९६, ८० मध्ये १५४२, ८१ मध्ये २७०४ अशा चढत्या क्रमानंतर ८२ मध्ये २३०८, ८३ मध्ये १६.४७ तर ८४ मध्ये साधारण १६००.

३२.६८ कोटी रुपये भागभांडवल असणाऱ्या या उद्योगसमुहाच्या मूळ अमेरिकन समुहाकडे १,६५,८४,७५० इतके समभाग आहेत. उरलेले ४९.१० टक्के समभाग जे १७.९९२ भारतीयांकडे आहेत त्यांचे काय होणार? किंवा ११ टक्के व्याजानी दिले गेलेले दोन लाख पन्नास हजार डिबेंचरर्स आहेत त्यांच्या मालकांचे काय होणार हाच तर खरा प्रश्न आहे. ◻

होता. याशिवाय त्यांचे कारखान्याकडे असलेले दुर्लक्ष दाखवणाऱ्या चार घटना श्री. अर्जुनसिंग यांनी नुकत्याच सांगितल्या. गेल्या काही वर्षात येथे चार छोटे अपघात झाले आहेत. अर्थात सर्वच कारखान्यात लहान-मोठे अपघात हे होणारच; परंतु जीवनास अपायकारक ठरू शकतील, अशा पदार्थांची साठवण जेथे होते, तेथे अशा तऱ्हेच्या अपघातांची नोंद नीट घेतली पाहिजे; परंतु येथे ती घेतली गेलेली नाही आणि त्याचाच परिणाम आख्खा भोपाळ भोगतोय.

ह्या अपघात झाल्यावर जगातील सर्वथरांतून प्रतिक्रिया आल्या. विविध नेत्यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले; पण ह्या झाल्या तोंडी प्रतिक्रिया. खऱ्या प्रतिक्रिया दिसल्या त्या शेअर बाजारात. एका दिवसात १० रुपये दरानी किंमत असलेला युनियन कार्बाइडचा शेअर जो ३० रुपयाच्या आसपास असायचा, तो घसरून २३ वर आला आणि यापुढेही घसरून तो त्याच्या दर्शनी किंमतीपेक्षा कमी होईल, असा जाणकारांचा अंदाज आहे. भारतातच नव्हे तर वॉल स्ट्रीटवर जिथे अमेरिकेतील प्रमुख व जागतिक उद्योगांचे केंद्रस्थान असणारे स्टॉक एक्स्चेंज आहे. तिथेसुद्धा युनियन कार्बाइडचा भाव घसरला. पंचेचाळीस लाख शेअर्स एका दिवसात विकले गेले. कंपनीला द्यावी लागणारी नुकसान भरपाई किती असेल याची जाणीव असणाऱ्यांनी अशा रीतीने प्रतिक्रिया दर्शविली. भारतापुरतं बोलायचं तर हा कारखाना सध्या बंद आहे व तो कोणत्याही परिस्थितीत पुन्हा सुरू केला जाऊ देणार नाही असा मध्य प्रदेश सरकारचा दावा आहे. तेव्हा ह्या कारखान्यापुरते तरी कंपनीला पाणी सोडावे लागणार असे दिसते व त्या शिवाय नुकसान भरपाई ?

नुकसान भरपाई किती द्यावी लागले, यासंबंधी निश्चित कोणीच काही सांगू शकत नाही. आता ही नुकसान भरपाई अमेरिकन कायद्याप्रमाणे का भारतीय ? एकूण मृत किती ? त्यातले दुर्घटनेतले मृत ठरवायचे कसे ? का फक्त पोस्टमार्टेम झालेल्या मृतांच्या आप्तांना नुकसान भरपाई ? पोस्टमार्टेम किती जणांचे केले ? आजारी पडलेल्यांना काय ? पुन्हा आजारी कोण ? या सारखे असंख्य प्रश्न या अपघातानंतर दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईसंबंधी निर्माण होणार आहेत. गरीबांना याचा त्रास जास्त झाला आहे. नुकसान भरपाई ही त्यांच्यापर्यंत खरोखर पोहचेल, का सरकारी पद्धतीनी पोहचेल ? हा सुद्धा एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. आता किमानपक्षी, मिळणारी नुकसानभरपाई आपदग्रस्तांपर्यंत पोहचवली जाईल याची काटेकोर दक्षता घेतली जावी. १०० कोटीपासून ३०० कोटीपर्यंत कितीही नुकसान भरपाई कंपनीला द्यावी लागेल आणि हा आकडा ऐकल्यावर अनेकांचे हात शिवशिवण्याची शक्यता आहे. तेव्हा नुकसान भरपाई संबंधी पुढे आपणास काही 'बातम्या' वाचावयास मिळू नये अशी इच्छा करूयात.

### सावधानता नियम रद्द ?

भारतात अनेक उद्योग रासायनीक उत्पादनाच्या क्षेत्रात आहेत. रासायनीक कारखान्यातून वाया गेलेली रसायने बाहेर पडणारा धूर व साठवली जाणारी रसायने व वायू यांची वेळोवेळी झडती घेतली पाहिजे. आज अनेक उद्योग वाया गेलेली रसायने नदीत, ओढ्यात सरसकट टाकून देतात. फार कशाला, सपूर्णतः सरकारी यंत्रणेखाली असलेली पुण्याची ॲम्युनेशन फॅक्टरी टाकाऊ रसायने मुळा नदीत सोडते. अनेक कारखान्यांतून बाहेर पडणारा सल्फर डाय ऑक्साईड हा पिके व वनस्पती यांच्या दृष्टीने धोकादायक असतो. संभावीत जीवीत हानी व नैसर्गिक हानी टाळण्यासाठी यापुढे नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. असे पालन झाले नाही की मग 'ॲसिडेन्ट' होतात, पाण्याचे प्रदूषण, हवेत प्रदूषण... आणि ह्याच पायऱ्या वाढत शेवटी त्याचा 'भोपाळ' होतो.

अणुबॉबमुळे झालेला जपानमधील प्रलय. अर्थात त्याच्याशी तुलना जरी होत नसली तरी त्याची आठवण यावी अशी घटना आहे. अमेरिकेचे अध्यक्ष कार्टर यांच्या कारकिर्दीत अमेरिकेतील उद्योगांना सावधगिरीचे नियम लावताना त्यांच्या इतर देशातील शाखांना सुद्धा तेच सावधगिरीचे नियम असायचे. अमेरिकेत ज्या प्रकारची सावधानता अशाप्रकारच्या प्रकल्पात आवश्यक असते तशी भारतात नव्हती. कारण काय तर रेगन राजवटीत हा नियम रद्द झाला. तो जरी रद्द झाला तरी, मानवजातीच्या दृष्टिकोनातून कोणता उजवा होता ? काही बाबतीत व्यावसायिकता दूर ठेवायची असते आणि 'नियमापुरतंच' करायचं सोडून द्यायचं असतं. त्यात फायदा सर्वांचाच आहे हे व्यावसायिकांना या घटनेवरून कळले तरी खूप झाले. □

## प्रदूषण : ग्वालियेर रेयॉन सिल्क मिल्स

भोपाळमध्ये विषारी वायूंच्या स्फोटाने अकस्मित घडलेली दुर्घटना क्षणार्धात जगाच्या कानाकोपऱ्यात पसरली; परंतु असंख्य आधुनिक कारखान्यांच्या प्रदूषणाने अनेक निष्पाप लोकांची आयुष्ये हळूहळू बेचिराख होत आहेत या गोष्टीकडे समाजाचे लक्ष जायला शेकडो वर्षे लागतात.

'ग्वालियेर रेयॉन सिल्क मिल्स' हा उद्योग हे त्याचेच एक उदाहरण. औद्योगिक विकासाचे फायदे आपल्या चटकन लक्षात आले तरी त्यामुळे निर्माण झालेल्या तोटयांकडे आपण वाजवीपेक्षा जास्ती दुर्लक्ष करतो व यातून निर्माण होणारे संभाव्य धोके टाळता येण्यासारखे असले तरी त्यांकडे शासनाचे व समाजाचे दुर्लक्ष झाल्यामुळे ते टाळले जात नाहीत हे भोपाळच्या पार्श्वभूमीवरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. या दृष्टीने 'ग्वालियेर रेयॉन सिल्क मिल्स' हे एक उदाहरण घेऊन त्याचा अभ्यास करणे उचित ठरेल.

ग्वालियेर रेयॉन सिल्क मिल्स हा आशियातील एक सर्वात मोठा रेयॉन निर्मितीचा उद्योग. मध्यप्रदेशात उज्जेन जिल्ह्यातील नागदा येथे १९५४ साली या उद्योगास सुरुवात झाली, जवळपासच्या अनेक कापूस पिकवणाऱ्या खेड्यातून लोक या कापड-गिरणीकडे आकृष्ट होऊ लागले. आधुनिक यंत्रसामग्री, कामाच्या पाळ्या, व्यवस्थापन याबरोबर कारखान्याच्या परिसरातील घाण, विषारी वायू यांचीही त्यांनी सवय करून घेतली.

कारखाना सुरू होऊन एक वर्ष व्हायच्या आतच कामगार अनेक रोगांना बळी पडले. डोकेदुखी, मळमळ, अपचन, थकवा, भूक न

लागणे ह्या सर्व आजारांची त्यांना बाधा झाली. जे शेतकरी पहाटेपासून सूर्य अस्ताला जाईपर्यंत शेतात राबत असत, ते आठ तासांच्या कामानंतर प्रचंड दमून जात.

हळूहळू हे आजार बळावतच गेले. सुरुवातीला सर्वच कामगारांची कामवासना वाढली; पण नंतर नंतर ती खूपच कमी होऊन ती जवळजवळ संपलीच. अनेक कामगार कोरडा खोकला व हृदयविकाराने आजारी पडले. अनेकजण अर्धांगवायूने आजारी पडल्याने कामे सोडून आपापल्या गावी निघून गेले. १९८२ ते १९८४ या दोन वर्षांच्या काळात एकूण १९ कामगार मृत्यू पावले. त्यातले पंधरा हृदयविकाराच्या आजाराने मरण पावले जवळ जवळ अर्ध्याहून अधिक कामगारांना काही ना काही आजाराची बाधा झाली होती.

हे विकार निर्माण होण्याचे मुख्य कारण होते गिरणीतून बाहेर पडणारे विषारी वायू. लाकडाच्या लगद्यापासून 'व्हिसकोस' या प्रक्रियेपासून रेयॉन हा कृत्रिम धागा निर्माण करतात. या प्रक्रियेसाठी कॉस्टिक सोडा, सल्फ्युरिक ॲसिड, कार्बन डाय सल्फाईड ह्या पदार्थांची आवश्यकता असते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्बन डाय सल्फाईड ($CS_2$) हायड्रोजन सल्फाईड ($SO_2$) क्लोरीन व मरक्युरिक व्हेपर इत्यादी वायू वातावरणात बाहेर टाकले जातात. यातील $CS_2$ आणि $H_2S$ व $SO_2$ हे वायू अत्यंत विषारी असून त्यांचा शरीरात शिरकाव झाल्यावर डोकेदुखी, चक्कर येणे, अर्धांगवायू, श्वासोश्वासास त्रास व हृदयविकार ह्या विकारांची बाधा होण्याची शक्यता असते.

हे विषारी वायू वातावरणात सोडले गेल्यामुळे फक्त नागदातच नाही तर आसपासच्या अनेक खेड्यातील लोकांची व शेतकऱ्यांची आयुष्ये बेचिराख होऊ लागली. कारखाना सुरू व्हायच्या आधी नागदाजवळून वहाणारी चंबळ नदी ही लोकांची प्राणदात्री नदी होती; पण आता नाही. असंख्य विषारी खनिजे तिच्या पाण्यात मिसळली गेली असल्यामुळे ती आता एक विषारी व निर्जीव नदी झाली आहे. संपूर्ण ३० किमी अंतरापर्यंत तिच्या क्षेत्रात कुठलाही जीवजंतू शिल्लक राहिलेला नाही. चंबळच्या काठावरील नागदा व राजापूरा येथील लोकांना सक्तीने विषारीच पाणी प्यावे लागते कारण तेथील विहिरीतून सुद्धा ही विषारी खनिजे मिसळली गेली आहेत. आसपासच्या अनेक खेड्यातून अनेक नवीनच रोगांची लागवण झाली आहे. थकवा येणे, भूक न लागणे, त्वचारोग, पचन बिघडणे, इ. रोगांची तेथील लोकांना बाधा झाली आहे. गाईगुरांतील पण आजाराचे प्रमाण बरेच वाढले आहे. हे पाणी शेतीसाठीसुद्धा नाशकारक असल्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती अतिशय हलाखीची झाली आहे. हवेतील विषारी वायूंच्या प्रमाणामुळे शेते, फुले, फळे जळून जात आहेत, उन्हाळ्यात ही संपूर्ण नदी कोरडी ठणठणीत पडते व ही सर्व खनिजे तेथील डबक्यात साचून बसतात पहिल्या पावसाबरोबर ही सर्व खनिजे एरवी जिथे धोका नाही अशा ठिकाणी वहात जातात व तेथील माणसे, जनावरे, मासे यांच्या मृत्युसंख्येत वाढ होते.

ह्या कारखान्याच्या आसपासच्या वातावरणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी शासनातर्फे एक समिती नेमण्यात आली. कामगारांच्या आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी वातावरणातील वायूंची तीव्रता ताबडतोब कमी करण्यात यावी व आजारी कामगारांसाठी उपचाराची सोय कारखान्यातर्फे करून देण्यात यावी, तसेच सर्व कामगारांची सतत व वेळच्या वेळी आरोग्यतपासणी केली जावी असे या समितीने मांडले; पण या अहवालानुसार कारखान्यात बदल करण्याऐवजी व्यवस्थापनातर्फे तो अहवाल दडपून ठेवण्यात आला.

भोपाळमधील पब्लिक हेल्थ इंजिनियरिंग डिपार्टमेंटचे डी. के. मिश्रा यांनी चंबळच्या पाण्यावर प्रथमच संशोधन केले. चंबळच्या पाण्यात जस्त व अनेक विषारी खनिजांचे प्रमाण असल्यामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण संपले आहे, असे त्यांनी आपल्या अहवालात मांडले; परंतु शासनाने यावर काहीही उपाय योजले नाहीत. यानंतर आलेल्या अनेक अहवालांकडे शासनाने असेच दुर्लक्ष केले. १९७२ साली विक्रम युनिव्हर्सिटीचे तरुण शास्त्रज्ञ रामचंद्र त्रिवेदी यांनी यावर संशोधन केले. चंबळच्या पाण्यात मर्क्युरी या खनिजाचे ०.२५ मिलिग्रॅम / लीटर इतके प्रमाण आहे असे त्यांनी आपल्या अहवालात मांडले. नंतर केलेल्या संशोधनात गांधीसागर नदीतील काही माशांच्या स्नायूत व जनावरांच्या दुधातसुद्धा 'मर्क्युरी' चा काही अंश दिसून आला. येथून मासे व दूध विक्रीसाठी कलकत्ता व दिल्ली येथे नेत असल्यामुळे तेथील लोकांनाही 'मर्क्युरी' ची बाधा होण्याची शक्यता आहे.

पण एकच आशावादी गोष्ट म्हणजे कामगार, शेतकरी व गावकरी यांचा कारखान्याबाबतचा वाढता असंतोष. हा असंतोष लक्षात घेऊन कारखान्याच्या व्यवस्थापनाने व प्रदूषण बोर्डाने कारखान्याला प्रदूषण नियंत्रण प्लॅंट बसवून घेतला; पण त्रासदायक वाटणाऱ्या समित्यांना व व्हि. आय. पी. लोकांना दाखविण्याखेरीज या प्लॅंटचा फारसा उपयोग व्यवस्थापनाने केला नाही. हे लक्षात आल्यावर कामगार स्वस्थ बसले नाहीत. दुसऱ्या लोकसभा निवडणुकीपासून नागदा येथील कामगारांनी प्रदूषण हा राजकारणातला महत्त्वाचा विषय बनवला आहे. कामगारांतर्फे अनेक आमदार वारंवार विधानसभेत या विषयासंबंधी प्रश्न उपस्थित करू लागले आहेत. १९७७ पासून नागदामध्ये त्यांचे समर्थ व बंडखोर नेतृत्व उदयास येऊ लागले आहे. नागदातील तरुण युवक व शेतकरीसुद्धा या प्रश्नाबाबत जागृत होत आहेत हीच एक आशेची गोष्ट आहे.

अजूनपर्यंततरी भारतामध्ये प्रदूषणाविरुद्धचा लढा फारच प्राथमिक स्वरुपाचा राहिला आहे. मुंबई, कलकत्ता, केरळ येथील काही निसर्गप्रेमी मंडळी सोडता इतर ठिकाणी प्रदूषणाविषयी फारशी जाणीव दिसत नाही. याहून महत्त्वाचे म्हणजे प्रदूषणामुळे ज्या गरीब व अशिक्षित खेड्यातील लोकांचे सर्वांत हाल होतात, तीच या प्रश्नाबाबत उदासीन दिसतात. आपल्या समाजातील निरनिराळ्या वर्गांचे हित अतिशय विसंगत गोष्टींवर अवलंबून असल्यामुळे या चळवळीत एक महत्त्वाची उणीव राहून गेलेली दिसते. उदा. कारखान्यावर अनेक कामगारांचे पोटपाणी अवलंबून असते; पण त्याच कारखान्याने टाकलेल्या खनिजांमुळे व धुरामुळे अनेक शेतकरी व मच्छिमार लोकांचे नुकसान होते. त्यामुळे समाजातील या दोन्ही घटकांना प्रदूषणाविरुद्ध लढा देण्यासाठी एकत्र आणणे हाच या चळवळीपुढे मोठा प्रश्न आहे. जरी नागदासारख्या खेड्यातून काही लोक या प्रश्नाबाबत जागृत होऊ लागले असले तरी शासनाने, जनतेने दबाव आणल्याशिवाय याबाबत काहीही हालचाल न करता स्वस्थ बसावे की काय ?

**–प्रेमा देशपांडे**

(व्ही. टी. पद्मनाभन यांनी लिहिलेल्या 'द गॅस चेंबर ऑन चंबळ' या पुस्तिकेच्या आधारे)

## लोकसभा निवडणुका

# देशातील प्रमुख लढती

अभय गोखले

देशातील महत्त्वाच्या लढती अमेठी (उत्तरप्रदेश), बागपत (उत्तर-प्रदेश), ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) बारामती (महाराष्ट्र), अलाहाबाद (उत्तरप्रदेश), बालीया (उत्तरप्रदेश), सासाराम (बिहार), हृमम-कोंडा (आंध्रप्रदेश) या मतदारसंघात होणार आहेत.

अमेठी मतदार संघातून स्वर्गीय संजय गांधी निवडून येत असत. १९७७ च्या जनता लाटेत अमेठीमधून स्वर्गीय संजय गांधी यांचा जनता उमेदवाराने ८० हजाराहून अधिक मतांनी पराभव केला होता. या मतदार संघात कॉंग्रेस खालोखाल भाजपचा जास्त जोर आहे. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत संजय गांधींचा पाडाव करणारा उमेदवार जनसंघ घटकाचा होता. मात्र जनतापक्षाच्या पाडावानंतर १९८० च्या निवडणुकीत संजय गांधी पुन्हा प्रचंडबहुमताने अमेठी मतदार संघातून निवडून आले. संजय गांधींच्या मृत्यूनंतर अमेठीच्या जागेवर नुकतेच राजकारणात प्रवेश करणारे राजीव गांधी निवडून आले. त्यानंतर सतत या मतदार संघात आपले वर्चस्व रहावे म्हणून पंतप्रधान राजीव गांधी प्रयत्नशील राहिले व त्यांनी या मतदार संघात बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या. निरनिराळे नवीन प्रकल्प सुरू केले व आपले स्थान सुरक्षित राखण्यासाठी हाताबाहेर जाऊन जे काही करता येईल ते त्यांनी अमेठीत केले. संजय गांधी यांची विधवा पत्नी मनेका ही या मतदार संघावर पूर्वीपासून डोळा ठेवून होती. संजयच्या अकाली निधनानंतर इंदिराजींनी काहीजणांचा अपेक्षाभंग करत मनेकाला बाजूस सारले व राजकारणात काहीशा अनिच्छेनेच प्रवेश करणाऱ्या राजीवना पुढे आणले व तेथेच मनेका विरुद्ध राजीव असा संघर्ष सुरू झाला. फार पूर्वीपासून मनेका अमेठी मतदारसंघाचे सतत दौरे करून राजीवने तेथे जे प्रकल्प चालू केलेत त्यातील फोलपणा लोकांना समजावून सांगत आहे. लोकांना रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्याऐवजी व त्यांच्या दारिद्र्याकडे दुर्लक्ष करून स्टेडीयम वगैरे कशी बांधली जात आहेत व त्यावर पैशाचा प्रचंड अपव्यय कसा केला जात आहे ते मनेका अमेठी मतदार संघातील लोकांना समजावून सांगते. हा सर्व पैशाचा ओघ केवळ निवडणुकीवर डोळा ठेवून अमेठीमध्ये येत आहे हे ती आपल्या भाषणात सांगते. संजय गांधींची विधवा पत्नी म्हणून लोकांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न ती करते. इंदिरा गांधी हयात होत्या तोपर्यंत अमेठीतून जिंकून येण्याची मनेकाला चांगली संधी होती. मात्र इंदिराजींच्या निघृण हत्येने अमेठीतील संपूर्ण चित्र बदलून गेले आहे. इंदिराजींच्या हत्येमुळे देशभर राजीव गांधी व कॉंग्रेसपक्ष यांच्याबद्दल मतदारात सहानुभूतीची हवा निर्माण झाली आहे व तिचा जोर उत्तरप्रदेशात व विशेषत: अमेठीत जास्त आहे. शिवाय राजीव स्वत: पंतप्रधान असल्याने ती एक त्यांची जमेची बाजू म्हणता येईल. इंदिराजींची हत्या शीख जमातीच्या व्यक्तींनी केली व मनेका ही शीखच आहे तेव्हा या गोष्टीचा प्रतिकूल परिणाम तिला मिळणाऱ्या मतांवर होणारच. कॉंग्रेसवाल्यांनी या गोष्टीचा फायदा उठविण्याची संधी सोडलेली नाही. 'मनेका सरदार है, देशकी गद्दार है।' अशा घाणेरड्या घोषणा कॉंग्रेसवाले अमेठीत देतात ही माहिती स्वत: मनेकानेच मागे एका मुलाखतीत सांगितली. अशा परिस्थितीत मनेकाने कितीही उत्साह दाखवला तरी तिचे निवडून येण्याचे चान्सेस जवळजवळ नाहीतच. अमेठीची जागा चांगल्या मताधिक्याने राजीव जिंकतील असा अंदाज आहे. मनेकाला भाजप, जनता, दमकीपक्ष यांनी पाठिंबा दिला असला तरी निकालात फरक पडणार नाही. मताधिक्यात फरक पडू शकेल.

बागपत (उत्तरप्रदेश) मतदारसंघातून दलित मजदूर किसानपक्षाचे अध्यक्ष चौधरी चरणसिंग उभे आहेत. १९७७ साली ते प्रचंड बहुमताने या मतदार संघातून निवडून आले होते. १९८० साली ते स्वत: पंतप्रधान असल्याने त्यांना निवडणूक जिंकण्यास परीश्रम पडले नाहीत. जनता राजवटीत चरणसिगांचे हनुमान म्हणून भूमिका बजावणारे व चरणसिगांच्या मदतीने जनता पक्षाचे मंत्रीमंडळ खाली खेचणारे विक्षिप्त राजनारायण या वेळेस राष्ट्रीय जनता पक्षाचे उमेदवार म्हणून चरणसिगांशी सामना करत आहेत. मध्यंतरी राजनारायण जनतापक्षातून बाहेर पडले व त्यांनी राष्ट्रीय जनतापक्षाची स्थापना केली. एक पक्ष मोडून दुसरा स्थापन करण्यातील त्यांचा उत्साह दांडगा आहे. याबाबतीत त्यांनी मधू लिमये, जॉर्ज फर्नांडीस, बिजू पटनाईक, देवीलाल, चरणसिग व कर्पुरी ठाकूर, बहुगुणा, जगजीवनराम यांना मागे टाकले आहे. आपल्या एका वेळच्या गुरुविरुद्ध चेला लढाईकरिता उभा राहिला आहे व राजनारायण यांच्या नेहमीच्या आचरट वर्तनाशी ते सुसंगत आहे. प्रथम राष्ट्रीय जनतापक्ष लोकदलात विलीन करण्याचे घाटत होते, त्याकरिता चरणसिंगांचा आशीर्वादही राजनारायण यांनी मिळवला; परंतु नंतर कशावरून तरी त्यांचे बिनसले व राजनारायण यांनी चक्क चरणसिगांच्या बालेकिल्ल्यात त्यांच्याशी दोन हात करण्याची तयारी केली. राजनारायण यांनी आपले सहकारी बनारसीदास यांना कॉंग्रेसमध्ये घुसवून आपल्या उमेदवारीस कॉंग्रेसकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला; पण राजनारायण यांच्यासारख्या तोंडाळ, बेशिस्त, पक्षफोड्या व्यक्तीस पाठिंबा देण्याचे कॉंग्रेसने नाकारले, शिवाय राजनारायण हे चरणसिंग यांचीच मते फोडणार असल्याने ते कॉंग्रेस उमेदवाराच्या पथ्यावरच पडणार आहे. १९७७ मध्ये रायबरेलीतून इंदिराजींचा पराभव केल्यापासून राजनारायण हे घमेंडीत वावरत असतात. त्यांची ही घमेंड जिरवण्याची व त्यांना राजकारणातून हाकलून देण्याची नामी संधी बागपतमधील मतदारांस चालून आली आहे. बागपत मतदारसंघात जाटांची संख्या कमी असली तरी त्यामुळे चरणसिगांच्या मतांवर परिणाम होणार नाही. चरणसिगांचा हा परंपरागत मतदारसंघ आहे. ते मागे मुख्यमंत्री असताना व पंतप्रधान असताना त्यांनी आपल्या मतदारसंघात बऱ्याच सुधारणा केल्या व मतदारसंघाशी सतत संपर्क ठेवला. या वेळेस त्यांना भाजप, जनता, राष्ट्रीय संजय मंच, इत्यादींचा पाठिंबा आहे. या मतदारसंघात भाजपचा काही

भागात चांगला होल्ड आहे त्याचा फायदा चरणसिंगांना मिळेल. त्यांनी नवीन स्थापन केलेल्या दलित मजदूर किसानपक्षात बहुगुणा सामील झाल्याने मुस्लिम मतदारांवर विशेष प्रभाव असणारे बहुगुणा त्यांना मुस्लिम मते मोठ्या प्रमाणावर मिळवून देतील. काँग्रेसचा उमेदवार फारसा प्रभावी नसल्याने राजनारायण यांनी काही मते फोडली तरी त्याचा फायदा उठवण्याच्या परिस्थितीत काँग्रेसपक्ष नाही. त्यामुळे पूर्वीपेक्षा कमी मताने का होईना चरणसिंगांचा विजय निश्चित आहे. आयत्या वेळेस राजनारायण यांना काँग्रेसने पाठिंबा दिल्यास ते आपली अनामत रक्कम वाचवू शकतील. राजनारायण यांनी काँग्रेस उमेदवारास आयत्या वेळेस पाठिंबा दिल्यास निकालात फरक पडणार नाही. या दोन्हीही शक्यता नाकारता येत नाहीत.

### वाजपेयींना धक्का !

ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) मतदारसंघात भाजपचे अध्यक्ष वाजपेयी उभे आहेत. १९८० मध्ये नवी दिल्ली मतदारसंघातून वाजपेयी हे काँग्रेस उमेदवार सी. एम. स्टीफन यांच्याविरुद्ध फक्त चार हजार मते अधिक मिळून विजयी झाले होते. अर्थातच हा मतदारसंघ सुरक्षित नव्हे असे समजून भाजपने त्यांना ग्वाल्हेर मतदारसंघात हलवले. विजया राजे शिंदे यांच्यामुळे ग्वाल्हेर मतदारसंघ भाजप करिता सुरक्षित मानला जातो. मात्र ग्वाल्हेर मतदारसंघ वाजपेयींना नवीन नाही. १९७१ च्या इंदिरा लाटेत ग्वाल्हेर मतदारसंघातून वाजपेयी आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा किमान एक लाखाहून अधिक मते मिळवून विजयी झाले होते. १९७७ च्या जनता लाटेत वाजपेयी नवी दिल्लीतून निवडून आले तेव्हा भाजपचे एन. के. शेजवलकर ग्वाल्हेरमधून लाखाहून अधिक मते मिळवून निवडून आले. मात्र १९८० च्या इंदिरा लाटेत शेजवलकरांना फक्त पंचवीस हजारांचेच मताधिक्य मिळाले होते. आज भारतात वाजपेयी हे सर्वोत्कृष्ट लोकप्रिय विरोधी नेते मानले जातात. त्यांना प्रचारासाठी (भाजपच्या) जास्त वेळ मिळू नये म्हणून त्यांच्याच मतदारसंघात जास्त वेळ अडकवून ठेवण्याची क्लृप्ती काँग्रेस श्रेष्ठींनी शोधून काढली आहे. ही क्लृप्ती बहुदा राजीव गांधी, अरुण नेहरू, फोतेदार यांची असावी. वाजपेयी व भाजप यांना घाबरवण्यासाठी त्यांच्याविरुद्ध काँग्रेसने राजमाता विजयाराजे शिंदे (भाजप. उपाध्यक्ष ) यांचे सुपुत्र माधवराव शिंदे यांना उभे केले आहे. माधवराव यापूर्वी गुणा मतदारसंघातून निवडून येत. हा डाव इतका गुप्तपणे रचण्यात आला की त्यामुळे भाजप व वाजपेयी दोन्हीही चकीत झाले असतील. शेवटच्या क्षणापर्यंत याची कोणाला माहिती नव्हती. अर्थात माधवराव हे स्वर्गीय संजय गांधी यांचे जवळचे मित्र मानले जात तेव्हा त्यांना राजकारणातून खलास करण्याचा राजीव, अरुण नेहरू व फोतेदार यांचा डाव असू शकेल. वायपेयी पराभूत झाले तर सोन्याहून पिवळे नाही तर माधवरावांची कटकट तरी घालवता येईल व वाजपेयींना ग्वाल्हेरमध्ये बराच काळ गुंतवून देशात इतरत्र भाजपच्या उमेदवारांचा प्रचार करण्यास कमी वेळ मिळेल असा एका दगडात तीन पक्षी मारण्याचा राजीव व त्याच्या सल्लागारांचा मनसुवा दिसतो. गुजराथमधील मेहसाणाजवळ काही




राजकीय गुंडांनी वाजपेयींवर हल्ला केल्याने ते जखमी झाले व त्यांना हॉस्पिटलमध्ये हलवावे लागल्याने भाजपच्या उमेदरावांचा प्रचार ते काही दिवस करू शकणार नाहीत ही गोष्ट कांग्रेसच्या पथ्यावरच पडेल. वाजपेयींइतका मोठा जनसमुह आपल्या सभांना देशातील कोणताही नेता आकर्षित करू शकत नाही हे या संदर्भात लक्षात ठेवावयास हवे. माधवराव शिंदे ग्वाल्हेरमधून उभे राहिले असले तरी त्यामुळे भाजप व वाजपेयींना घाबरण्याचे कारण नाही. माधवराव यांची माता, राजमाता विजयाराजे शिंदे वाजपेयींच्या विजयाकरीता अविरत परीश्रम करत आहेत. त्यांचे या मतदारसंघात आपल्या मुलापेक्षा जास्त वजन आहे. वाजपेयींनी ही लढत राजाविरुद्ध रंक यांच्या मधील आहे असे घोषित केले असले तरी खरी लढत आई व मुलगा यांच्यातच आहे. भाजपच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे ग्वाल्हेर महानगरपालिका पक्षाच्या ताब्यात आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीत माधवराव यांनी कांग्रेसचा भरपूर प्रचार करूनही कांग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागला यावरून माधवरावांची किती लोकप्रियता आहे हे समजते. १९८० च्या निवडणुकीत कांग्रेसने सात विधानसभा मतदारसंघापैकी चारमध्ये विजय मिळवला असला तरी आता परिस्थिती बदलली आहे. आता शेजवलकर यांच्या ऐवजी अखिल भारतीय किर्तीचे वाजपेयी भाजपतर्फे उभे आहेत. १९६७ पासून कधीही या मतदारसंघात जनसंघ (भाजप) पराभूत झालेला नाही. माधवराव शिंदे वाजपेयींना कडवी लढत देतील यात शंकाच नाही; परंतु या लढतीत वाजपेयीच विजयी होतील. मात्र त्याना मोठे मताधिक्य मिळणार नाही.

## पवार–बहुगुणा–नरसिंहराव

बारामती मतदारसंघातून कांग्रेस (एस) चे अध्यक्ष शरद पवार उभे आहेत. त्यांच्याशी कांग्रेस ( इं ) चे सध्याचे खासदार शं. बा. पाटील लढत देत आहेत. बारामती मतदारसंघातील शरदरावांचे कार्य व लोकप्रियता पहाता ही निवडणुक जिंकण्यास त्यांना फारसे प्रयास पडणार नाहीत. बारामतीत विशेष जोर असणाऱ्या जनताच्या संभाजीराव काकडे यांचा शरदरावांना पाठिंबा आहे. सर्व विरोधीपक्षांचे कार्यकर्ते एकजुटीने व उत्साहाने शरदरावांना विजयी करण्यासाठी रात्रंदिवस झटत आहेत. विरोधकात मतविभागणी होण्याची आशा नसल्याने व पाटील हे तगडे प्रतिस्पर्धी नसल्याने शरदरावांचे काम सोपे झाले आहे. गेल्या खेपेस विरोधकात समझोता न झाल्याने पाटील निवडून आले होते. अलाहाबाद मतदारसंघात नटवरलाल बहुगुणा यांच्या विरोधात नटवरलाल सिनेमात भूमिका करणारे लोकप्रिय सिनेनट अमिताभ बच्चन उभे आहेत. बहुगुणा यांनी आपला नेहमीचा गढवाल मतदारसंघ सोडून अलाहाबादमधून निवडणुक लढविण्याचा जो निर्णय घेतला तो त्यांच्या अंगाशी येण्याची शक्यता आहे. बहुगुणा यांचे तगडे प्रतिस्पर्धी अलाहाबादचेच रहिवासी आहेत. अतिशय लोकप्रिय अभिनेते म्हणून अमिताभ यांची अलाहाबाद मतदारसंघातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात ख्याती आहे. त्यांच्या भोवतीचे प्रसिद्धीचे वलय इतके जबरदस्त आहे की, त्यांच्या चहात्या हजारो तरुण-तरुणींनी त्यांच्या प्रचारकार्यास वाहून घेतले आहे. त्यांना कार्यकर्त्यांची वाण नाही. त्यांच्या सभांना तुफान गर्दी असते. त्यांची चित्रपटातील इमेज गरिबांना आकर्षित करणारी आहे. ते स्वत: कायस्थ आहेत व त्यांच्या जमातीची या मतदारसंघात बरीच मते असल्याने ती मोठ्या प्रमाणावर बच्चन यांना मिळतील. बच्चन यांचे वडील सुप्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन यांचा नेहरू–गांधी कुटुंबाशी संबंध जुना आहे. इंदिराजींच्या हत्येमुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीचा फायदा अमिताभ यांना मिळेल. बहुगुणा यांची जमेची बाजू म्हणजे ते एक कसलेले राजकारणी आहेत. राजकारण हा त्यांच्या हाताचा मळ आहे. कपटनिती त्यांना अवगत आहे. अलाहाबाद मतदारसंघाशी त्यांचा संपर्क बरेच काळ तुटला असला तरी ते उत्तरप्रदेशचे माजी मुख्यमंत्री होते व केंद्रीय मंत्रीमंडळात त्यांनी बरीच महत्त्वाची खाती सांभाळली आहेत.बहुगुणा यांच्याविरुद्धही अमिताभची अचानकपणे उमेदवारी जाहीर करण्यात आली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे बहुगुणा चरणसिंगांच्या दमकीपक्षात असल्याने चरणसिंगांच्या जाट समाजाची मते त्यांना मोठ्या प्रमाणात मिळतील. बहुगुणांची मुस्लिम समाजातील लोकप्रियता वादातीत आहे. आयत्यावेळेस समझोता झाल्यास विरोधकांचा पाठिंबाही बहुगुणा मिळवू शकतील. सध्याच्या परिस्थितीत अमिताभ यांचे पारडे बहुगुणांच्या तुलनेत जड वाटत आहे. बालीया ( उत्तर प्रदेश ) येथून जनतापक्षाध्यक्ष चंद्रशेखर व सासाराम ( बिहार ) येथून कांग्रेस (जे) अध्यक्ष जगजीवनराम उभे आहेत. दोघांची त्यांच्या मतदारसंघातील लोकप्रियता व त्यांच्या तुलनेतील कांग्रेस (इं) चे कमकुवत प्रतिस्पर्धी पहाता हे दोघेही आपापल्या मतदारसंघातून निवडून येण्यास फारशी अडचण भासणार नाही. हनमकोंडा मतदारसंघातून ( आंध्रप्रदेश ) केंद्रीय गृहमंत्री नरसिंहराव उभे आहेत. आंध्रप्रदेशातील तेलगुदेशमच्या प्रभावाने घाबरून जाऊन नरसिंहराव यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातूनही उमेदवारी जाहीर केली आहे. हनमकोंडा येथून तेलगुदेशमपुरस्कृत भाजप उमेदवार जंगा रेड्डी त्यांना लढत देत आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत हनमकोंडा क्षेत्रातील विधानसभेच्या सर्व जागा तेलगुदेशमने जिंकल्या होत्या. त्यामुळेच नरसिंहराव यांनी रामटेकमधूनही अर्ज भरला. मात्र रामटेकमधून नरसिंहराव यांचा विजय निश्चित असल्याने हनमकोंडा निवडणुकीतील चुरस नाहीशी झाली आहे. नरसिंहराव यांचा पराभव करण्याकरिता त्यांचे काही स्वपक्षीय टपून बसले होते, त्यांची निराशा झाली आहे. एन. टी. रामाराव यांच्या तेलगुदेशमपक्षाचा पूर्वीइतका प्रभाव राहिलेला नाही. त्यातच भास्करराव यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या गटाने पक्षत्याग केला आहे. या मतदारसंघात तेलगुदेशमचा स्वतःचा उमेदवार नसून त्यांचा पाठिंबा असलेला भाजपचा उमेदवार आहे. भाजप या मतदारसंघात अजून खेडोपाडी पोचलेला नाही. एन. टी. रामाराव यांना घटनाबाह्यरित्या मुख्यमंत्री पदावरून दूर करण्यात आल्याने त्यांच्याबद्दल व त्यांच्या पक्षाबद्दल आंध्रमधील जनतेत सहानुभूतीची लाट आली होती; परंतु त्यांना परत मुख्यमंत्री पदावर स्थानापन्न करण्यात आले. इंदिराजींच्या हत्येमुळे जी सहानुभूतीची हवा निर्माण झाली त्याला आंध्र अपवाद नव्हते. थोडक्यात लाटेवर लाट आदळल्याने सध्या आंध्रमध्ये कोणतीच लाट अस्तित्वात नाही. एन. टी. आरची लोकप्रियता मात्र वादातीत आहे त्याचा फायदा भाजप उमेदवारास मिळेल. एकूण रागरंग पहाता या मतदारसंघातून कोण बाजी मारेल हे सांगणे अवघड आहे. □

# निवडणुकीतील गैरव्यवहार

बी. वाय्. कुलकर्णी

येत्या २४ व २७ डिसेंबरला लोकसभेच्या सार्वजनिक निवडणुका होतील; पण त्या लोकशाहीला अपेक्षित खुल्या निःपक्षपाती संविधानात्मक मार्गांनी होतील याबद्दल खात्री मात्र देता येत नाही. कारण काळ्या पैशाची निवडणुकीतील भूमिका दिवसेंदिवस महत्त्वाची ठरू लागली आहे. मतदान केन्द्रे ताब्यात घेण्याची व गुंडागर्दी करून निवडणूक यंत्रणाच स्वतःच्या ताब्यात घेण्याची प्रथा पद्धत आहे. खुद्द निवडणूक यंत्रणेच्या निःपक्षपातीपणाबद्दलच शंका येण्याइतपत त्याची काम करण्याची पद्धती वाईट झालेली आहे. लोकांचा निवडणुक यंत्रणेबाबतचा विश्वास १९६७ पासून उडत चाललेला आहे. कारण १९६७ मध्ये जम्मु आणि काश्मीरमध्ये निवडणुकीत झालेले गैरप्रकार मुख्य निवडणुक आयुक्त श्री सुंदरमच्या मदतीने झाले असे म्हणण्यास बरीच जागा आहे, तर श्री. सेनवर्मांनी पश्चिम बंगालमध्ये झालेल्या गैरप्रकारांकडे दुर्लक्ष केल्याचा पुरावा आहे. श्री. बहुगुणांनी कॉंग्रेस पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर खासदारकीचाही राजीनामा दिला होता. ती पोटनिवडणुका घेण्यासाठी तत्कालीन मुख्य निवडणुक आयुक्त शकधर यांनी १३ महिने लावले, म्हणजे त्या मतदार संघात कॉंग्रेसला अनुकूल वातावरण होईपर्यंत वेळ लावला. तर श्री. पी के. त्रिवेद्रींची आसाम व काश्मीरच्या निवडणुकीच्या वेळची वागणूक दुटप्पी होती कारण निवडणुक काळात या राज्यात केन्द्रीय सत्ता असावी अशी त्यांनी सूचना केली होती.

या सर्व पार्श्वभूमीवर येत्या निवडणुका खुल्या व निःपक्षपाती होतीलच असे म्हणता येणार नाहीत. कारण आता मतदानातील गैरप्रकाराला प्रत्यक्ष हस्तक्षेपाचे रुप आलेले आहे. मतदान केंद्र ताब्यात घेण्याची पद्धत १९६७ मध्ये प्रथम बिहारमध्ये सुरू झाली व आजतागायत चालू आहे. बिहारमध्ये मतदानकेंद्रे ताब्यात जास्तीतजास्त घेण्यात आली ती १९७१ मध्ये तर १९७२ मध्ये मतदार केंद्र ताब्यात घेण्याच्या पद्धतीने कहर केला तो पश्चिम बंगालमध्ये.

पश्चिम बंगाल १९७२ ला मतदान केंद्र ताब्यात घेण्यासाठी दोन पद्धतींचा अवलंब करण्यात आला. एका पद्धतीत सरकारी अधिकाऱ्यांचा हात होता, त्यामुळे पद्धतशीरपणे मतदान केंद्र ताब्यात घेण्याचे प्रयत्न झाले. १९८० च्या निवडणूक आयोगाचा बिहार विधानसभेच्या निवडणुकीबाबतचा अहवाल बोलका आहे. या अहवालात म्हटले आहे की, हारलाखी विधानसभा मतदारसंघातील बैंलूना येथे तीन वेळा निवडणूक घ्यावी लागली. पहिल्यावेळी निर्वाचन अधिकाऱ्यांनीच निवडणुकीबाबत तक्रार केली व त्यामुळे तेथे दुसऱ्यांदा निवडणूक ६ जून ८० ला घेण्याचे ठरवले. पण याही वेळेस लोकांकडून तक्रारी आल्या की, या निवडणुकीच्या वेळी निर्वाचन अधिकाऱ्यांनीच स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून मतदान केन्द्रे ताब्यात घेतली, मत पत्रिकेवर स्वतःच शिक्के मारले व खरे मतदार जेव्हा मतदान करण्यासाठी आले तेव्हा त्यांना मतदान केन्द्रातून हाकलून दिले. हे एकदोन ठिकाणी नाही तर उत्तर प्रदेशांच्या उत्तर व पश्चिम भागात व मध्य बिहार व उत्तर बिहारमध्ये एकूण संसदेच्या ७५ मतदारसंघात झाले. म्हणजे एखादे सरकार बनवण्यासाठी आवश्यक व पाडण्यासाठी आवश्यक इतक्या मतदार संघात झाले.

## मतदान—पिस्तुलाच्या धाकात !


इकॉनॉमिक अॅन्ड पोलिटिकल विकलीच्या २४ मे १९८० च्या अंकात नलिनी सिंगनी निवडणुकीतील गैरप्रकार दाखवण्यासाठी एका निर्वाचन अधिकाऱ्याच्या तक्रारीचाच दाखला दिला आहे. त्यात तो निर्वाचन अधिकारी लिहीतो. ' मी सकाळी ८ ते १० पर्यंत व्यवस्थित मतदान करवून घेतले. तोपर्यंत ८० लोकांनी मतदान केले होते. त्यानंतर ५० सशस्त्र लोकांनी मतदान केन्द्रास घेरा घातला. मतदान केन्द्राच्या आवारात त्यांनी बॉम्बस्फोट केला, ज्यात ५ व्यक्ती जखमी झाल्यानंतर त्यांनी मला पिस्तुलाचा धाक दाखवून मतदान पत्रिकेवर सह्या करण्यास लावले. मी विरोध केला नाही व सह्या केल्या; पण मी यावेळी केलेल्या सह्या माझ्या पहिल्या ८० मतदान पत्रिकेवर जशा होत्या तशा नव्हत्या. पहिल्या ८० मतदान पत्रिकेवर मी पूर्ण सही केली होती; पण या वेळी मी फक्त अद्याक्षरे लिहीली म्हणजे ८० पत्रिका बाजूला काढून ओळखता येत होत्या व ज्यावर मी खोटी सही केली त्या बाजूला काढता येत होत्या. हे सर्व मी अतिशय संथ गतीने करत होतो. उद्देश असा की, वेळ लागावा व तितक्यात पोलि

सांचे टेहळणी पथक यावे, माझ्या सह्या करणे संपले व त्या गुंडांनी मतदानपत्रिका शिक्के मारून मतदान पत्रिकेत टाकल्या व मला निर्वाचन अधिकाऱ्यांच्या नोंदवहीत नोंदी करण्यास सांगितले, जे करण्यास मी मुद्दामच जास्त वेळ घेतला. तितक्यात दंडाधिकाऱ्यांचे टेहळणी पथक आले त्यास मी मदत करण्याची विनंती केली. त्यांनी मदत करणे तर सोडाच उलट मलाच त्यांनी नोंद लवकर करण्यास सांगितले, अन्यथा ते पेट्या स्ट्रॉंगरूममध्ये नसल्याची धमकी दिली.मी नोंदी केल्या. दंडाधिकारी विकला गेला होता. माझी मान त्यावेळी शरमेने खाली गेली. १९७२ मध्ये पश्चिमबंगालमध्ये ज्या निवडणुका झाल्या त्यावर झालेला गैरवापर भयानक असताना देखील तो बाहेर येऊ शकला नाही. कारण निवडणुकीत झालेल्या गैरप्रकाराच्या बातम्या बाहेर येऊ नये म्हणून वृत्तपत्राची प्रसिद्धीपूर्व तपासणी केली जात होती. कारण मतदान केन्द्र ताब्यात घेण्याचे व बळजबरीने मतदान करण्याचे काम युवक काँग्रेस करीत होती. श्री. सजल बसू यांच्या 'वेस्टबेंगाल द व्हायलंट इयर्स' या पुस्तकात त्याची हकीकत दिली आहे. कॉंग्रेस (ओ) चे नेते व माजी मुख्यमंत्री श्री. पी. सी. सेन यांनी कमरहाटी मतदार संघातील निवडणुकीतील गैरप्रकाराबद्दल म्हटले होते की, या मतदारसंघात १६००० मतदान पत्रिकांवर दोन दोन शिक्के मारलेले आढळले. कारण कॉंग्रेसच्या व्यक्तींनी मतदान पेट्यातून या मतपत्रिका बाहेर काढल्या व ज्या मतदान पत्रिकेवर कॉंग्रेस व्यतिरिक्त उमेदवारांपुढे फुली आहे, ती मतदान पत्रिका रद्द व्हावी म्हणून पुन्हा दुसऱ्या दिवशी फुली मारली व अशा प्रकारे विरोधकांना झालेले मतदान बाद झाले. कलकत्त्याच्या काही मतदान केन्द्रावर तर दुपारी ११ वाजताच १०० टक्के मतदान पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले म्हणजे मतदान गुंडांनी केले. जेव्हा ११ नंतर प्रत्यक्ष खरे मतदार केन्द्रावर गेले, तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, मतदान झालेले आहे व त्यांनी मतदान करण्याची गरज नाही !

### काँग्रेसचा धाडसी प्रयोग !

कलकत्त्याच्या देशबंधू स्कूल बालियाघाट या मतदान केन्द्रावर तर स्थानिक गुंडांनी मतदानाची वेळ संपल्यावर पेट्या सीलबंद न करताच मतदान केन्द्राच्या बाहेर नेल्या व त्यांच्याजवळ असलेल्या मतदान पत्रिका फुल्या मारून पेटीत टाकल्या !

फेब्रुवारी १९७४ मध्ये पश्चिम बंगालमध्ये झालेल्या पोटनिवडणुकीच्या ११ मतदान केन्द्रावर झालेल्या गैरप्रकारामुळे मतदान पुन्हा घ्यावे लागले कारण सरकारी अधिकाऱ्यांनी निवडणुकीत गैरप्रकार झाल्याची तक्रार केली होती. पश्चिम बंगालचे निर्वाचन प्रमुख श्री. गुहां यांनी स्वतःच मान्य केले होते की, दोन मतदान केन्द्रांवर तर निवडणुका घेणे गुंडांनी अशक्य केले होते. पाच मतदान केन्द्रांवर मध्येच निवडणुकाच स्थगित कराव्या लागल्या. समाजवादी पक्षाच्या उमेदवाराच्या मानेवर पिस्तुल ठेवून त्यांना (मतदान केन्द्र नं. ११) अंबुली स्कूल सोडून जाण्यास सांगण्यात आले. या मतदान केन्द्रावरील निर्वाचन अधिकाऱ्यांनी निवडणुकीतील गैरप्रकाराबाबत दिलेले निवेदन अतिशय बोलके आहे. त्यांनी म्हटले आहे की, '२३-४-७४ ला रात्री अनेक व्यक्ती मतदान केन्द्रावर आल्या व त्यांनी माझ्याकडून ०७७०४१ ते ०७७३४९ पर्यंतच्या मतपत्रिका बळजबरीने नेल्या.




परिणामतः खरे मतदार मतदान करू शकले नाहीत व त्यांनी गैरप्रकारची तक्रार केली.'

बिहारमध्ये काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री श्री. अब्दुल गफूर यांनी फेब्रुवारी ७४ मध्ये झालेली पोटनिवडणूक याच पद्धतीने मधुबानी मतदारसंघातून जिंकली होती. मधुबानीत निवडणुकीतील गैरप्रकाराने कळस केला. मधुबानीकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे मतदानापूर्वी ३६ तास रद्द करण्यात आल्या होत्या. ६००० पोलीस मधुबानीत तैनात करण्यात आले होते. मधुबानीचा इतर भागांशी संपर्क जवळपास तोडण्यात आला होता. उद्देश हा की, कॉंग्रेसने गफूरच्या विजयासाठी भाड्याने आणलेल्या गुंडांना मधुबानीत नंगानाच घालता यावा व मतदान स्वतःच्या बाजूने करून घेता यावे, या सर्व प्रकारानंतर गफूर ती निवडणूक न जिंकतील तरच नवल. कॉंग्रेसच्या ह्या विजयाबद्दल लिहिताना १० मार्च १९७४ चा न्यू दिल्लीहून निघणारा 'न्यूएज' लिहितो की, 'कॉंग्रेसने एखादी जागा जिंकायचे ठरवले तर लोक त्यांच्या बाजूने मतदान करो किंवा न करो ते निवडणूक जिंकतातच. (सविस्तर माहितीसाठी 'इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल विकली' १३ एप्रिल ७४.)

१९७५ मध्ये आसामातील बारपेटा मतदारसंघातील लोकसभेच्या पोटनिवडणुकीच्या वेळी वेगळाच प्रकार घडला. निवडणुकीनंतर जेव्हा मतमोजणी सुरू झाली, तेव्हा पहिल्या दिवशी विरोधीपक्षांचे उमेदवार बिसवा गोस्वामी ४०,००० मतांनी आघाडीवर होते; पण दुसऱ्या दिवशी फक्त ५ विधानसभा मतदारसंघातील मतदान मोजण्यात आले. तेव्हा कॉंग्रेसच्या उमेदवाराने २७००० फरकाची आघाडी मारली. याचा शोध घेत असताना, गोस्वामीला आढळून आले की, दुसऱ्या दिवशी मतपत्रिका छापून निर्वाचन अधिकाऱ्यांच्या सह्या करून व त्यावर फुली मारून त्या मोजणी बाकी असलेल्या पेट्यात टाकण्यात आल्या तेथून गोस्वामींनी काही मतपत्रिका निवडणूक आयुक्ताला दाखविण्यासाठी घेतल्या. त्याची दखल घेण्याऐवजी गोस्वामींनाच न वापरलेल्या मतपत्रिका बाळगल्या म्हणून अटक करण्यात आली.

काँग्रेसने हा धाडसी प्रयोग यासाठी केला कारण त्यांचा निवडणुकीपूर्वी गैरप्रकार करण्याचा प्रयत्न पूर्ण यशस्वी झाला नाही. त्याच्या निवडणूकपूर्व गैरप्रकाराच्या प्रयत्नाबाबत मुख्य निवडणूक आयुक्तांकडे विरोधी खासदारांनी केलेल्या तक्रारीत म्हटले होते की, १९ फेब्रुवारी ७५ ला म्हणजे निवडणुकीच्या आदल्या दिवशी कॉंग्रे-



सच्या गोहातीमधील प्रमुख नेत्यांनी गोहाती प्रेसमधून ७०,००० मतपत्रिका घेतल्या. त्यावर संबंधित निर्वाचन अधिकाऱ्यांच्या सह्या घेतल्या व पैसे देऊन त्या वाटण्यात आल्या; पण काही मतदारांनी ही गोष्ट गोस्वामींना सांगितली. ( द स्टेटस्मन कलकत्ता २२ मार्च ७५ ) व त्यामुळे तो प्रयत्न फसला. या प्रकाराबाबत खासदार श्री. समर गुहा यांनी संसदेत 'रॉ' वर असा आरोप केला होता की, 'रॉ' च्या काही लोकांनी बारापेटा मतदारसंघात काँग्रेसच्या निवडणुकीतील गैरप्रकाराला हातभार लावला. ( फायनान्शियल एक्सप्रेस, नवी दिल्ली, दि. १५ मार्च ७५ ) ज्या नंतर संबंधित निर्वाचन अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. कारण या कोऱ्या मतदानपत्रिका खासदारांनी दाखल केल्या त्यावर त्या निर्वाचन अधिकाऱ्यांच्या सह्या होत्या.

याच वेळी आसामात तर निवडणुकीतील गैरप्रकाराचा कळस करणारी एक घटना घडली. आसामातील कालाचार मतदानकेंद्रावर १०० टक्के मतदान झाल्याचे घोषित करण्यात आले. वास्तविक कालाचार १९७५ ला अस्तित्वातच राहिले नव्हते. कारण ते आदल्या वर्षीच पुरात वाहून गेले होते. ( द हिंदुस्थान टाइम्स, नवी दिल्ली २७ मार्च ७५ ).

## गैरव्यवहाराची चढती मजल

निवडणुकीतील गैरप्रकाराचे आणखी एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे श्री. बहुगुणांनी काँग्रेसपक्ष व खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर गढवाल क्षेत्रात झालेली निवडणूक घेण्यासाठी निवडणुकआयुक्तांनी शंकास्पद १३ महिन्यांनी म्हणजे १४ जून ८१ ला निवडणुक घेतली व २० जूनला ती रद्द केली. बहुगुणांना पाडण्याची तयारी सुरू झाली ती इथपासून. स्वतः पंतप्रधान श्रीमती गांधींनी पोटनिवडणुकीत प्रचाराला न जाण्याचा संकेत मोडला व त्या गढवालला गेल्या. या मतदारसंघात त्यांनी एकूण ३२ सभा घेतल्या. या प्रचार दौऱ्यात बरोबर नेलेल्या सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला झाला. त्याची पूर्ण चौकशी केल्यानंतर असे आढळून आले की, श्रीमती गांधींचे वक्तव्य खोटे व प्रचारकी स्वरूपाचे होते, कारण गढवाल मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार नेगीदेखील यावर बोलावयास तयार नव्हते तर सिटीझन फॉर डेमोक्रसी या संस्थेने वस्तुस्थिती पाहण्यासाठी नेमलेल्या समितीने मतदारसंघाची पाहणी करून २२ ऑक्टोबर १९८१ ला सादर केलेल्या अहवालात गांधींनी केलेल्या आरोपात तथ्य नाही असे म्हटले आहे.

श्रीमती गांधीव्यतिरिक्त या मतदारसंघात पाच मुख्यमंत्री, एकूण ८५ केंद्रीय व राज्यमंत्री, सहा हेलिकॉप्टर्स, ५००० केंद्रीय राखीव पोलीस, १२००० हरियाना व पंजाब पोलिसांना दहशत बसवण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. निवडणुककाळात मंत्र्यांनी गढवाल क्षेत्रात सरकारी दौरे काढले. निवडणुककाळात जाहीर सभांवर बंदी घातली होती. डेहराडून येथे बहुगुणांच्या जाहीर सभेला ज्या अधिकाऱ्याने परवानगी दिली त्याची बदली करण्यात आली. हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेशातील पोलिसांना मतदारसंघात निवडणुकआयुक्तांच्या परवानगीशिवाय पाचारण करण्यात आले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाने या मतदारसंघात ६ कोटी रुपये तीन दिवसात वाटले. इतके झाल्यानंतरही लोक मते देतीलच याची जेव्हा खात्री होईना तेव्हा शेवटी श्रीमती गांधींनी लोकांना नमवण्यासाठी शेवटचे शस्त्र बाहेर काढले व एका प्रचार भाषणात त्या म्हणाल्या, 'बहुगुणांचा जर विजय झाला तर या क्षेत्रातील संपूर्ण विकासाची कामे थांबतील.' (ऑन लुकर जुलै ८१) आणि झाल्यानंतर बहुगुणा विजयी झाले. कारण या क्षेत्रात काँग्रेसपेक्षा ते थोडेही कमी पडले नाहीत. शेवटी बहुगुणा काँग्रेस संस्कृतीचे अपत्य आहे. दुसरा कुणी असता तर पराभव मात्र निश्चित होता.

१९८३ सालाने निवडणुकीतील गैरप्रकाराच्या संदर्भात १९८२ वर मजल मारली. जून ८३ मध्ये जम्मु-काश्मिरमध्ये निवडणुका झाल्या व ७६ सदस्यांच्या विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्सने ३९ जागा जिंकल्या. या निवडणुकीत गैरप्रकाराच्या क्षेत्रात काँग्रेसला नॅशनल कॉन्फरन्सने मागे टाकले म्हणून गैरप्रकाराची तक्रार काँग्रेसने केली. मुफ्ती मोहंमद सय्यद या पक्षाच्या प्रांताध्यक्षाने नॅ. कॉ. ने केलेल्या गैरप्रकाराबाबत म्हटले आहे की, 'काश्मिरमधील निवडणुका १९७८ मधील भुत्तोंनी पाकिस्तानात घेतलेल्या निवडणुकीची आठवण करून देतात. या निवडणुकीत प्रचंड भ्रष्ट मार्गाचा वापर झाला. फक्त काँग्रेसनेच नाही तर पीपल्स कॉन्फरन्स व जमातनेदेखील परत निवडणुकांची मागणी केली.

मोठ्या प्रमाणात कोऱ्या मतपत्रिका निवडणुकांपूर्वी वाटण्यात आल्याचा आरोप करण्यात आला, तर १८ मतदान केंद्रे नॅ. कॉ. च्या लोकांनी ताब्यात घेतल्याचा आरोप काँग्रेसच्या अध्यक्षांनी केला. निवडणुकआयुक्तांनी हाबा–कादल येथे परत निवडणुका घेण्याचा आदेश दिला कारण श्रीनगरमध्ये १६००० हिंदूंना गुंडांनी मतदानास जाऊच दिले नाही. अशी त्यांनी सह्यानिशी तक्रार केली होती. हे सर्व होत असताना पोलिसयंत्रणा काहीच करत नव्हती. कारण मतदानकेन्द्रावर केन्द्रसरकारने पाठविलेले जवान न पाठवता राज्यपोलि-

सांनाच पाठविण्यात आले होते व श्रीनगर ते दिल्ली टेलिफोनलाईन त्याच वेळी नादुरुस्त केली होती. नॅ. कॉं. ला विजय मिळाला कारण येथे त्यांनी गैरप्रकाराच्या क्षेत्रात काँग्रेसशी आघाडी मारली व काँग्रेस 'लोकशाही' 'निःपक्षपातीपणा' रिगींग, 'खुल्या निवडणुकांची' भाषा जम्मू-काश्मिरमध्ये करू लागले. १९८३ मध्ये कर्नाटकात निवडणुकीच्यावेळी पोलिसयंत्रणाच एका पक्षाला निवडणुकीत यश मिळविण्यासाठी साह्य करीत होती. डेप्युटी जनरल ऑफ पोलीस के. सी. के. राजाने टेलेक्सने सर्व पोलीस ठाण्याला व फौजदारांना कळविले होते की, कोणत्याही स्थितीत काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारालाच अर्ज भरू द्या. म्हणजे बंडखोरांना अर्ज भरू देऊ नका किंवा ते भरणार नाही, अशी व्यवस्था करा. दिल्लीत कर्नाटकभवनात जेव्हा पक्षाच्या उमेदवाराच्या निवडीचे काम चालू होते, तेव्हा श्री. डी. आर. कारथीकेयन (डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल गुप्तचर) श्री. गुंडुरावांच्या जवळ बसले होते व त्यांना मदत करीत होते.

पण १९८३ चे निवडणुका कशा नसाव्यात हे पाहिले ते आसाममध्ये. आसामसारख्या भयानकपणा कुठेच झाला नाही. जानेवारी ८३ ला आसामच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली. या निवडणुकांवर असमियांनी बहिष्कार टाकला. त्यांच्या मते जोपर्यंत नवीन मतदार याद्या तयार केल्या जात नाही व घुसखोरांची नावे मतदान याद्यांतून काढून टाकली जात नाहीत तोपर्यंत निवडणुकीवर त्यांचा बहिष्कार राहील. पण घुसखोर तर सरकारच्या बाजूने मतदान करणारे होते. त्यामुळे घुसखोरांना काढून टाकणे व नवीन याद्या तयार करणे सरकारला परवडणारे नव्हते. म्हणूनच सरकारला तेथे निवडणुका घ्यावयाच्या होत्या. ही निवडणुक लोकशाहीतील माध्यमाची विटंबना होती; पण तीच फक्त सरकारला फायदा करून देणार होती.

### निवडणुकांची विटंबना

निवडणुक बहिष्काराचा प्रचार वृत्तपत्राद्वारे होऊ नये म्हणून आसाममधील वृत्तपत्रांवर कडक निर्बंध लादण्यात आले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस तुकड्यांचा महापूर लोटला. केन्द्रीय सुरक्षा दलाच्या ५५ बटालियन्स तैनात करण्यात आल्या. [तर हरियाणा सशस्त्र दल, उ. प्र. प्रादेशिक दल,आसाम सशस्त्र पोलिस,सीमा सुरक्षादल, यांच्या एकूण ३६ बटालियन तैनात करण्यात आल्या. एकूण १,०५००० सशस्त्र पोलिस आणण्यात आले. अघोषित आणिबाणीच तेथे होती.या लष्कराच्या बुटाच्या टाचेखाली तिथे निवडणुका घेण्यात आल्या. प्रचंड सशस्त्र पोलीस पाहून एकूण स्थिती निवडणुकीच्या तयारीची वाटतच नव्हती तर सरकारने असामीयांविरुद्ध पुकारलेल्या युद्धाची वाटत होती. आसाम पूर्ण अशांत होते.म्हणण्यापेक्षा ज्वलंत होते. कारण या काळात संघर्षाच्या एकूण ४७ घटना घडल्या. ज्यात ५ हजार लोक ठार झाले तर साडेतीन लाख बेघर झाले. शेकडो गावे उध्वस्त झाली. कोट्यावधी रुपयाचे नुकसान झाले हिंसाचार इतका वाढला होता की, लष्करालाही त्याला आवर घालता आला नाही. परिणामतः विधानसभेच्या १८ जागेसाठी होणारे मतदान बेमुदत पुढे ढकलण्यात आले. १२ लोकसभेच्या व ११ विधानसभेच्या जागांसाठी व ३५० मतदान केन्द्रावर पुन्हा मतदान घ्यावे


**संचित ठेव योजना !**

# काळ चालला पुढे, पुढे . . .

## म्हणून " उद्या " चा विचार करा अनोख्या ठेव्यात त्याचे रूपांतर करा !

उद्याचा विचार आजच नको का करायला ?
नंतर पश्चात्ताप करून काय उपयोग ?

उद्याचे स्वप्न साकार करण्यासाठी
आमच्या संचित ठेव योजनेचा फायदा घ्या.

आज बँकेत २५,००० रुपये ठेवा
व दहा वर्षांनी त्याचे
७४,००० रुपये बँकेकडून घ्या.

अधिक माहितीसाठी
नजीकच्या शाखेला भेट द्या !

**बँक ऑफ महाराष्ट्र**
( भारत सरकारचा नवीन उपक्रम )
मुख्य कचेरी :
" लोकमंगल "
१५०१ शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

लागले. वास्तविक हिंसाचार लक्षात घेऊन निवडणुक आयुक्त श्री. आर. के. तिवारी यांनी सरकारला निवडणूक घेण्याबाबत पुन्हा विचारले, मात्र सरकार विचार करण्यास तयार नव्हते. प्रचंड हिंसाचार होत असताना ऑल इंडिया सांगत होता. 'परिस्थिती फारशी वाईट नाही' सरकार इथेच थांबले नाही तर रेल्वेमंत्री ए. बी. ए. गनीखान चौधरींना घुसखोर मुस्लिमांची मते मिळविण्यासाठी आसाममध्ये पाठवण्यात आले. त्यांनी जाहीर सभांमध्ये केलेल्या भाषणांनी हिंसाचाराला चिथावणी मिळाली. सरकार मतदान घेण्यावर इतके हटून बसले होते की, दारंग जिल्ह्यात सिपानपूर मतदार संघात प्रशासनाने शेवटी मतदारांना खुश करण्यासाठी फिरत्या मतदान केंद्राची व्यवस्था केली. इतके करूनही प्रत्यक्ष मतदानाचे आकडे या निवडणुकीतील फोलपणा दाखवतात. असमीया क्षेत्रात अत्यल्प मतदान झाले. मतदानाची टक्केवारी अनुक्रमे २४.४, ४०.६ व २८ अशी होती. दिब्रुगढ जिल्ह्यात १२.९ टक्के मतदान झाले तर शिवसागर लखिमपूर या असमीयाबहूल जिल्ह्यात फक्त ५.५ टक्के ३.५टक्के इतके मतदान झाले. याहीपेक्षा कळस म्हणजे लखिमपूर जिल्ह्यातील होमाजी मतदार संघात मतदानाने ०.४० टक्क्यांचा निचांक गाठला. त्याच जिल्ह्यात ठकु आखान मतदार संघात केवळ ०.८५ टक्के मतदान झाले. हे दोन्ही मतदारसंघ आहेत. खुद्द गोहातीत पूर्व मतदारसंघात १.६७ टक्के तर पश्चिम मतदार संघात ९.३१ टक्के दिसपूरच्या राजधानी परिसरात मतदान केवळ १०.३९ टक्के इतके कमी झाले. विधानसभेच्या बारा मतदार संघात ५ टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले, आसाममधील वरच्या भागातील १० मतदार संघात फक्त ३ टक्के मतदान झाले. कामरूप जिल्ह्यात धरमपूर मतदार संघात तर ६७३४५ मतदारांपैकी फक्त २६७ लोकांनी मतदान केले.

विशेष म्हणजे या भागात जास्त मतदान झाले. जिथे घुसखोरांची संख्या जास्त होती व त्यांच्याच जोरावर सैकियाचे सरकार लोकशाहीच्या मूल्यांना पायदळी तुडवून सत्तेवर आले होते.

या निवडणुकीबाबत बोलताना आसूचे कार्यकारी अध्यक्ष नुरुल हुसेन १८ फेब्रुवारी ८३ ला म्हणाले होते की, 'आम्ही या निवडणुकीने सत्तेवर आलेले सरकार कदापिही मानणार नाही. कारण हे घुसखोरांनी, पोलीस व सीआरपीच्या लोकांनी निवडून आणलेले सरकार आहे. आसामीयांनी नव्हे.' आसाममधील निवडणुकातर निवडणुका कशा नसाव्यात, निवडणुकाची विटंबना म्हणजे काय हे स्पष्टपणे दाखवतात.


हे सर्व भयानक प्रकार लक्षात घेता भीती वाटते ती या महिन्यात होणाऱ्या निवडणुकीची. कारण ३० सप्टेंबर ८४ च्या संडे ऑब्झरव्हरनी येत्या निवडणुकीत गुंडगिरी कशी होईल व ती कोण करेल हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की 'केन्द्र सरकारने कॉंग्रेस मुख्यमंत्र्यांना आदेश दिले आहेत की, जिथे कॉंग्रेस उमेदवाराला जिंकण्याची अपेक्षा अतिशय कमी आहे त्या मतदारसंघात पोलीस पाठवावेत म्हणजे या वेळी पोलीस व लष्कराचा उपयोग देखील निवडणुका जिंकण्यासाठी होणार असे दिसते. त्यांचा उपयोग होणार म्हणजे मतदान केन्द्रे ताब्यात घेण्याचा गुंड प्रयत्न करतील तेव्हा ते त्याकडे दुर्लक्ष करणार. काही सूत्रांचा हवाला देऊन संडे ऑब्झरव्हर पुढे लिहितो की काही दिवसापूर्वी कॉंग्रेस पक्षाने सराइत गुन्हेगारांना, पक्षाचे सदस्य केले. याचा उद्देश मतदान केन्द्रे काबीज करण्यासाठी त्यांचा उपयोग व्हावा. संडे ऑब्झरव्हरच्या या माहितीला पुष्टी मिळते ती २ डिसेंबर ८४ च्या 'आर्गनायझर'मधील बातमीने. म्हटले आहे की 'मोठ्या प्रमाणात इन्सपेक्टर जनरल ऑफ पोलीस व गुप्तचर अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत की कॉंग्रेस (आय) ची माणसे जेव्हा मतदान केन्द्रे काबीज करतील व मतदान पेटघा पळवतील तेव्हा त्यांनी हस्तक्षेप करू नये.'

कदाचित यामुळेच मुख्य निवडणुक आयुक्त श्री. आर. के. त्रिवेदी यांनी दि. २६ नोव्हेंबर ८४ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात सत्ताधारी पक्षाला आवाहन केले की 'निवडणुकीतील गैरप्रकार टाळण्यासाठी सरकारनी शक्य ते सर्व प्रयत्न करावे– सरकारने या पुढे आर्कषित करण्याऱ्या घोषणा व सवलती जाहीर करू नये आगामी निवडणुकीत मतदान केन्द्रे काबीज करण्यासारख्या घटना घडू नयेत म्हणून कडक उपाय योजण्याचा प्रस्ताव आयोगापुढे आहे कारण मतदान प्रक्रियेत असे प्रकार होणे ही आयोगाला चिंतेची बाब वाटते.

मुख्य निवडणुक आयुक्तांनी व्यक्त केलेली भीती व चिंता आगामी निवडणुकात काय होऊ घातलेले आहे हे स्पष्टपणे दाखवते पण असे झालेच तर ती या देशातील लोकशाहीच्या दृष्टीकोनातून अतिशय वाईट बाब ठरेल. □


अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
• वि. ग. कानिटकर
भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.
सविस्तर योजनापत्रक मागवा.
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



# वटवृक्ष

कडबाकुट्टी यंत्राच्या मागं बसलेली गाय पुन्हा हंबरली. खूप खोलवरून आलेल्या एखाद्या करुण हाकेसारखा आवाज...क्षणभर सगळी शांतता भंग पावली.

चहाचे घोट घेता घेता आनंदची नजर गाईवर स्थिर झाली. निर्विकार दृष्टीनं तो तिच्याकडंच पहात राहिला. ओसरीवर काही तो एकटाच नव्हता, तरीही भीषण शांतता पसरली होती. आबासाहेबांच्या ओसरीवर अगदी आतून बाहेरपर्यंत एखाद्या शामियान्यासारखी ही शांतता ताणली होती आणि गाईचं हंबरणं त्याला मधूनमधून उसवत होतं.

खाटेवर पालथी मांडी घालून बसलेल्या आबासाहेबांनी शांततेचा भंग केला. 'दुष्काळानं अशी धुळधाण केलीय डाक्टरसाहेब, की वाटतंय जान-माल सगळयाचं वाटोळं करून टाकणार, परमेश्वराची कधी कृपा होणार कुणाला ठाऊक...निदान माणसाच्या तोंडचा घास तरी राहू देत एवढंच त्या वरच्याला मागणं.'

आनंद काहीच बोलला नाही. आपल्याच मूक वर्तुळात लपेटून राहिला. चहाचा ग्लास रिकामा झाला होता, तरी तसाच हातात धरून काही तरी गूढ विचारात तो बसून राहिला होता...नाही, कोणताच विचार नाही. तो एक अनामिक आळसहीन आळशीपणा होता, जो आपल्यावर शांत क्षणांच्या वेळी पसरतो. जास्त करून अशा वेळेला, जेव्हा आपण अगदी एकटे नसतो; पण मधून मधून, थांबून थांबून एखादी उदास चर्चा चाललेली असते.

पळण्याच्या आवाजाने त्यांचं लक्ष वेधलं. नागडा-उघडा बबलू आतल्या खोलीतून ओसरीकडे धावत येत होता. हा जेव्हा पळतो तेव्हा त्याचं तोंड नेहमी एखाद्या गुहेसारखं उघडं राहतं, चेहरा अगदी भावशून्य दिसतो, पावलांच्या तालावर कापसासारखे गाल हलतात, कपाळावरच्या केसांचा झुपका थरथरतो आणि करदोटा टिन-टिन वाजतो.. आणि धुळीवर पाय आपटल्यानं धुळीचे लोट उठतात. बबलूच्या मागं उडणारे धुळीचे लोट पाहिल्यावर वाटतं की, रणांगणात सर्वस्व हारून नंगा पळून आलाय.

बबलू पळत पळत आनंदच्या जवळ आला आणि डोकं खाजवून सांगायला लागला, 'दाक्तलसाहेब आमची शुन्दली गाय खूप आजाली आहे. मलतुकडी झालीये, बघा ना!

आनंदनं त्याच्या गालावर प्रेमानं एक चापट मारली आणि तो उठला. सुन्द्रीजवळ गेला. ती कडबाकुट्टी यंत्राच्या मागं बसली होती. गावच्या दुष्काळाला झेलत आणि सारखी चाऱ्यासाठी हंबरत.

तो गाईच्या मानेवरून हात फिरवत तिला तपासल्याचं नाटक करू लागला. त्याला नेहमीच असं नाटक करावं लागतं कारण कधी बबलूजींची कुत्री 'आजाली' पडते. कधी माजर तर कधी आणि काही. आबासाहेब हसून समजावत. 'अरे हे काही जनावरांचे डाक्टर नाहीत! माणसांचे डाक्टर आहेत माणसांचे! माणसांना तपासतात जनावरांना नाही.' बबलूजी ते सगळं व्यवस्थित ऐकून समजावून घेत असत; पण पुढच्या वेळेपर्यंत पुन्हा विसरून जात.

आनंद गाईला तपासण्याचं नाटक करत राहिला...बबलू एकटक आशाळभूत नजरेनं त्याच्याकडंच पहात होता. काही क्षण त्यांच्या भोवती अडखळून राहिले होते.

आनंद नाटक करता करता गाईच्या डोळयात पहायला लागला. (बबलूला कावीळ झाली होती तेव्हा बोटांनी त्याच्या पापण्या उघडून पहात होता.. अगदी तसा)

डोळ्यात शांत असं काही तरी लुकलुकत होतं, काय? अश्रू? नाही! मग? एक मूक निवेदन? याचना? आनंद एकदम गोंधळून गेला. एक विचित्र असा विचार त्या गोंधळातूनच मनात आला...आता त्याच्यासाठी एक आणखीन असाध्य रोग होता—दुष्काळ!

तो परत येऊन खुर्चीत बसला. एकटक त्याच्याकडंच पहात बबलूपण जवळ आला. चेहऱ्यावर एक मूक प्रश्न होता. 'ठीक होईल बबलूजी' चुचकारत आनंदनं त्याला मांडीवर घेतलं; पण त्याच्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह जसंच्या तसंच राहिलं. बराच वेळ तोच विचार करत आनंदकडे टकामका बघत राहिला. मग हळूहळू चेहऱ्यावरचा तो भाव मावळत गेला. तापलेल्या जमिनीवर पडलेल्या पाण्याच्या थेंबासारखा. 'दाक्तल'बाबूंच्या मांडीवरून उतरून जिकडून आला होता तिकडंच तो पळाला. त्याला नागडा पळताना पाहून आनंदच्या ओठांवर हसू पसरलं. आबासाहेब पण हसले, 'आगाडी दाखवत आले होते साहेब. पिछाडी दाखवत पळाले. हॅः हॅः हॅः! फार खट्याळ आहे पोरगं... म्हणतो की, तुमच्यासारखाच डाक्टर होणार आहे.'

'तुमच्यासारखाच!' धूळ उडवणारी गरम हवा, त्याबरोबर येणारा एक गावठी वास, उदास अशी शांतता आणि त्या शांततेचा मधूनमधून भंग करणारं गाईचं हंबरणं. या सगळ्यात फारच संदिग्ध आणि काहीसे निरर्थक असे ते शब्द वाटले...तुमच्यासारखाच! आनंद विचार करतच होता तेवढ्यात त्यानी ऐकलं, आबासाहेब म्हणत होते, 'मी म्हणलं आधी मन लाऊन चांगला अभ्यास करा, म्हणजे काही तरी व्हाल. दिवसभर मातीत खेळून कोणी डाक्टर होत नाही.'

'हे वयच खेळायचं आहे!.. आणि डॉक्टर होणं म्हणजे असं काय अवघड आहे! छोकरा हुशार आहे, नक्की होईल!' म्हणत आनंद पायात चप्पल घालू लागला. 'माझ्या सारखाच?' संदिग्धतेशी जोडलेल्या उत्सुकतेच्या तीराला स्पर्शून मन परतलं. याच्यावर थांबता थांबता तो अचानक बदलला होता. हां! मनाच्या एका कोपऱ्यात निःशब्द भावनेप्रमाणे एक विचार मात्र आला की, जेव्हापर्यंत तो या धुळीच्या स्पर्शापासून दूर होता तोपर्यंत त्याला 'या' समाजातल्या रोगांची भीषणता माहीत नव्हती. चप्पल घालून तो उठला आणि जाण्यासाठी परवानगी मागितली.

आबासाहेबांच्या ओसरीच्याबाहेर थोडीशी रिकामी जागा आहे, त्याच्यानंतर एक छोटासा वाकडा उतार, तो अगदी कच्च्या रस्त्याच्या एका टोकाला जाऊन मिळतो.

उतारावरून उतरता उतरता डॉक्टरनी समोर एक नजर टाकली. समोर दुष्काळ आणि कचेरीच्या फायली, दोन्हीच्या मारानं रिकामी पडून राहिलेली जमीन होती...... नजर लांब लांबपर्यंत सरकत गेली... कुठं काही नाही!... आनंद रस्त्यावर आला! ...नाही! कुठंच काही नाही!...

धुळीमधून पाय ओढत जाताना दुष्काळाचं हे सावट आणि त्याचं कारण काय असावं या विषयीचे अनेक विचार अंतर्मनात उसळत होते आणि चेहऱ्यावर काळजीनं आकसलेल्या स्वरूपात ते उमटले होते...कपाळावर तीन खोल आठ्या, दोन्ही भुवया जवळ आलेल्या, आकसलेले डोळे, गालापासून नाकापर्यंत आणि डोळ्यांपासून कानांपर्यंत क्रमानं कमी कमी होत गेलेला पायवाटेसारखा उंचवटा!... काही वेळपर्यंत त्याच्या चेहऱ्याची अवस्था अशीच राहिली... आणि अशा अवस्थेतच आपल्या महत्त्वाकांक्षेविषयीची ही काळजी त्याला हास्यास्पद वाटली. चेहऱ्याचे स्नायू ढिले सोडत तो परत हसला. पहिल्यांदाच आपल्या काळजीचं हसू आलं त्याला. प्रथमच असं वाटलं होतं की हा विचार करणं किंवा असा कुठलाही विचार करणं (जो आनंद नेहमी करत असे)त्याच्या भोवतालच्या परिस्थितीच्या रचनेमध्ये हास्यास्पद आहे... बापरे! किती मोठ्या महत्त्वाकांक्षा होत्या त्याच्या. वैद्यकशास्त्राच्या बाहेर किती लांबपर्यंत पसरली होती त्याची काळजी! सगळीकडं अडचणीच दिसत होत्या आणि दिसत होतं 'समाधान कसं होणार'चं प्रश्नचिन्ह!...

शहरातून अचानक आनंद जेव्हा अशा मागास आड बाजूला आला होता, तेव्हा वाटत होतं की एक प्रेरणा बनून लोकांच्या चैतन्याला ओढून या आड भागात आणेल, सगळ्या अडचणी चुटकीसरशी दूर होतील. म्हणूनच किती उत्साह होता त्याच्यात. एकाकीपणा आणि साधनांची गैरसोय तर तेव्हाही होती; पण त्या एकाकीपणाने. निराशेच्या धारदार पंजानी त्याच्यावर कधी वार केला नव्हता. सतत ही आशा त्याचा दीप प्रज्वलित ठेवत होती की एक दिवस विजयसारखा समर्थ आणि साधन—संपन्न मित्र सुद्धा या आड भागात त्याच्या साथीला असेल; पण आता...त्या आशेचा चक्काचूर होऊन गेलाय आणि त्याच्यावर निराशा आपलं साम्राज्य पसरवायला लागली आहे. म्हणूनच साऱ्या महत्त्वाकांक्षा, स्वप्नं, वैद्यकीय क्षेत्रातल्या साऱ्या शक्यता पण 'बिन पंखांची उडान' असल्यासारख्या वाटतायत ...आणि हे सगळं झालं कशामुळं! फक्त एका चिठ्ठीमुळं! एका ठिणगीतच सगळं काही खाक झालं .. विजयची कालची चिठ्ठी, नको असताना, नकळतच मनावर उमटत गेली—

'त्या आडभागात जाऊन त्यांच्यासाठी आत्तापर्यंत जे काही तू केलेस ते पुष्कळ झालं, तुला डॉक्टर करण्यामागं घरच्यांच्या ज्या अपेक्षा आहेत, त्या पण पुऱ्या कर, त्यांच्या दृष्टीनं सुद्धा तुझं काही तरी कर्तव्य आहे हे लक्षात ठेव!'

आता... खरंच त्याला शहराकडं परतलं पाहिजे? अगदी अनोखा असा एक विचार ...मनाच्या पडद्यावर एकाच वेळेस अनेक चित्रं उमटली... आतल्या आत दुःखी आई, काहीसा चिडलेला रमेशदादा, उदास डोळे केलेली शोभाताई, हास्य विनोद करणारे परिचित लोक... आणि एक खुपणारं मौन घेतलेले बाबा! कारण काय? तर फक्त इतकंच की मागास—खेडेगावात 'प्रॅक्टिस' करण्याचा निर्णय त्यानं सांगितला होता. इतक्या साध्या गोष्टीसाठी सगळ्यांच्या 'मूडस्'ची इतकी उलथा पालथ होण्याचं काय कारण होतं, आनंदला काहीच समजत नव्हतं...आता थोडंफार समजतंय गेल्या दीड वर्षात आणि विशेषतः गेल्या दीड दिवसात समजुतदार झाला होता ना! पूर्वीच्या नक्षल विजयसारखा समजुतदार हः! हः! हास्यामुळं ओठाचा एक कोपरा तिरका झाला. परत अचानक सावरून चारीकडं पाहिलं. कोणी पहात तर नाही ना?... नाही, कोणी नाही... अजबच आहे तो पण. कोणी त्याला आपली आपणच काळजी करताना, हसताना, ओठाचा कोपरा तिरका करताना

पाहिलं तर त्याला वेडाच म्हणतील ना !

खरंच परत गेलं पाहिजे त्याला ?... अगदी व्यक्तिगत असून सुद्धा हा प्रश्न अशा एखाद्या अनोख्या व्यक्तीसारखा वाटत होता. जी कशाच्या तरी शोधात परत–परत फिरून काही विचारायला येते. अगदी वैयक्तिक असून सुद्धा अनपेक्षित आणि नकोशा वाटणाऱ्या त्या प्रश्नाबरोबर त्याचं मन कुठं कुठं भटकून आलं कुणास ठाऊक ! संबंधित अशा सर्व लहान मोठ्या गोष्टी त्याच्या मनानं चाळल्या. आपण केलेलं, पाहिलेलं, ठरवलेलं सगळं काही काहीकाळ त्या प्रश्नाच्या चौकटीतच एकवटत गेलं !... अचानक त्याची तंद्री तुटली तर त्यानं पाहिलं, देवळाबाहेरच्या ओटयाजवळ पांडुरंग, परशुराम आणि सुरेशराव स्वागतासाठी उभे होते. काही क्षण आनंद चपापला. वाटलं की विचार करत असताना आपण नक्कीच काहीतरी वेडयासारखं कृत्य करत असू आणि या लोकांनी पाहिलं असेल; पण पुढच्याच क्षणी सावरून रामराम केला आणि सगळयांबरोबर ओटयावर जाऊन बसला.

'मैनपूरहून केव्हा आला ?' सुरेशरावांनी विचारलं.

'सकाळी बारा साडेबाराच्या दरम्यान ! फार कंटाळा आला होता, म्हणून तुम्हा लोकांना भेटण्यासाठी येता आलं नाही.'

'तुम्ही तर परक्यासारखंच बोलताय, एक दिवस भेटता नाही आलं तर काय मोठा गुन्हा झाला' सुरेशराव हसत म्हणाले.

आनंद खजिल झाला. चष्मा काढून रुमालानं काच साफ करू लागला. 'खरं तर दिवसभराचा कार्यक्रम अगदी धावपळीचाच झाला, त्या भागात वैद्यकीय सेवेची खूपच गरज आहे. डॉक्टर एकपण नाही आणि रोगी मात्र भरपूर. पार थकून जायला होतं.'

मधेच पांडू बोलला 'हे बगा डाक्टरसाहेब आमी बाकी आता तुमाला आगदी बांदुनच ठेवनार. मैनपूर, नदीमासारख्या भागात आठवडा-आठवडा धावपळ करून तुमी तब्येतीचे हाल करून घेता, आता आमाला ते सहन होनार नाही हां !'

पांडूच्या लटक्या रागानं भरलेल्या चेहेऱ्यावर स्नेहाचा समुद्र उसळया मारत होता. अशी सहानुभूती पाहून आपल्या जीवनाच्या मोठ्या सार्थकतेचा भास डॉक्टरना झाला... नाही, जीवनाच्या सार्थकतेपेक्षा आपल्या स्वत:च्या सार्थकतेचाच जास्ती !.. तो हलकासा हसला. सुरेशराव आणि परशुराम सुद्धा हसायला लागले.

सुरेशराव पुन्हा आनंदला म्हणाले, 'काल चिठ्ठी तर तुम्हाला मिळालीच असेल. रमेश बरोबर मी पाठवली होती.' (आनंदची पत्रं सुरेशरावांच्या पत्त्यावर येत असत.)

'हां !' त्यानं थोडक्यातच उत्तर दिलं.

'पोस्टमन म्हणत होता विलायतेसनं आलीये.'

'हो ! तिकड माझा एक मित्र असतो. मेडिकल कॉलेजला माझ्यापेक्षा एक वर्ष सिनियर होता,... विजय.'

'हां–हां, सांगितलं होतं तुमी एकदा!... काही विषेश का आपलं सहज हाल हवा विचारायसाठी ?' सुरेशरावांनी अशा सहज उत्सुकतेनं विचारलं की जी विलायतेहून आलेल्या चिठ्ठीविषयी कोणाही खेडूत माणसाला वाटेल.

जास्त काही बोलण्याचा आनंदला एक विचित्रसा कंटाळाच आला होता; पण मध्यम वयाच्या सुरेशबाबूंच्या चेहेऱ्यावर एखाद्या बालकासारखी उत्सुकता पाहून म्हणाले, 'विषेशच समजा ! महिन्याभरासाठी भारतात येणार आहे. गावात काही तरी जमीन विकायला निघालीये ती खरेदी करेल. आणि काही कंपन्यांचे शेअर्स खरेदी करण्याचा पण विचार आहे... कॉलेज जीवनात तर अगदी नक्षलवादी होता, नंतर सिरियसली अभ्यास केला, आणि माझ्याबरोबर बसून गरिबांच्या सेवेसाठी मोठमोठे कार्यक्रम आखायचा. परदेशी जाताना सुद्धा म्हणायचा की जरा सर्व सोईंनी संपन्न होऊ या आणि मग आपली मिशन पुरी करू या. आता काय झालं कोणास ठाऊक !' थोडा वेळ थांबून तो म्हणाला 'वाटतंय, तो सगळा पुढारी लोकांच्या आश्वासनासारखाच प्रकार होता... नाही तर जसं एखाद्या चांगल्या चुंगल्या राजाच्या शरिरात वाईट प्रेतात्मा घुसावा आणि तो वाईट होऊन जावा त्या गोष्टीसारखं काही तरी.' सांगता सांगता आनंद हसू लागला. समजल्या – नसमजल्याच्या मधल्या अवस्थेत ते तिघेही हसले. थोडसं हसून सगळेजण मुर्खासारखे डाक्टरसाहेबाच्या तोंडाकडं बघत राहिले... डॉक्टरना थोडा राग आला. त्यांचा नाही, स्वत:चाच ! दीड वर्षे लोटली तरी का असा परका शहरीपणा, आणि शिकलेपणाचं वेगळेपण त्यांच्या बोलण्यात येतं ? का अजूनसुद्धा त्यांच्या बोलण्यात असं काही तरी शिल्लक आहे की जे खेडयातल्या या लोकांच्या सभेत त्याला उंच स्थान देतं, सगळयांच्यात मिळून मिसळून देत नाही ?

थोडा वेळ शांतता राहिली. आनंद उगाचच चष्म्याची काच पुसत आणि बाहीची बटनं काढत–बंद करत, हवा आणि धुळीच्या मध्ये पसरू लागलेले अंधाराचे तुकडे पहात राहिला. आणि मग पाटलांच्या घरी जायचंय म्हणून सांगून त्यांना राम–राम करून निघाला.

तोपर्यंत पूर्ण अंधार पसरला होता ! काळोख पूर्णपणे जमिनीवर पसरून पानं आणि हवेबरोबर जांभया देऊ लागला होता.

संभ्रमात पडलेला आनंद चालला होता. मधून मधून एखाद्या कुत्र्याच्या रडण्याच्या आवाजानं तंद्री भंग पावत होती आणि पुन्हा आपल्याच मनाच्या आठवणी आणि काळजीमध्ये लपेटून जात होता. नाही ! लपेटला कुठं होता ! त्या आठवणींच्यात एक व्यापक इतिहास कोरला जात होता, आणि त्याला सार्थकता देणाऱ्या निष्कर्षांचे बाहू पसरून आनंद त्यात ओढला जात होता .. असा काही ओढला जात होता की, शहराकडं परत जाण्याच्या विचारावरून योग्य अन् अयोग्यच्या दोन्ही शिखरांना बरोबरीनंच स्पर्शून त्याचं मन चाललं होतं... विचित्र संभ्रम. लंबकासारखं एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिरणं...

'डाक्टरसाहेब' जिजाबाच्या आवाजानं त्याला विचारांच्या तंद्रीतून बाहेर काढलं. तो एकदम दचकला. ओसाड माळावरच्या, कच्च्या रस्त्याकडेच्या, या वटवृक्षाच्या बाहेर आलेल्या मुळयांवर तो केव्हा येऊन बसला तेही त्याला समजलं नाही. पाहिलं तर जिजाबा कंदिल घेऊन म्हणत होता, 'हितं काय करताय ? कुठं कुठं हुडकून आलो तुमाला. लवकर चला. दिना काकीला लइच तरास व्हाया लागलाय. सारकी तुमास्निच हाळया मारतीया. आनंदा बाळा, आनंदा बाळा.'

सगळी काळजी एका झटक्यात निघून गेली. आपली, आपल्या जीवनाची परत मोठी सार्थकता त्याला जाणवली. शहराकडं परतण्याचा विचारसुद्धा त्याला यापुढं व्यर्थ वाटला. खरंच, अगदी व्यर्थ ! वाटलं की, आतापर्यंत एकटं आणि असमर्थ असल्याचा विचार मनात सारखा आणून तो स्वतःला फसवण्याचा आणि धोका देण्याचा प्रयत्न करत होता... नाही, या गरिबांच्या विशाल हृदयात गुंतत जाऊन परत बाहेर पडणं आता त्याला शक्य नाही. खूप खोलवर गेलीत त्याची मुळं. खूप लांबवर पसरलीये त्याची सावली... या वटवृक्षासारखी ! आता आपली मुलं काढून घेणं, आणि आपली सावली सावरून घेणं त्याच्या हातात आहेच कुठं... आणि अजून तर खूप काही करायचं शिल्लक आहे. या लोकांच्या मनाच्या आणि हृदयाच्या इतका जवळ आहे तो की, त्यांच्या विचारांचे धागे संयोजित करून शेकडो विजय तयार करण, आपल्याला साथ देणारी चेतना निर्माण करणं मुळीच अशक्य नाही. असा विचार करणं इतके दिवस त्याला ‘ बिन पंखांची उडान ’ असल्यासारखं का वाटलं ?

काही क्षणात आपली किंमत डॉक्टरना कळली आणि ते झट्दिशी उठून उभे राहिले.

‘ केव्हापासून त्रास व्हायला लागलाय ?’

‘ तासभर झाला असंल बगा. ’ जिजाबा बरोबर ते भरभर चालू लागले. अंधाऱ्या रस्त्यावरून चालताना कंदिलाचा उजेडच पुष्कळ होता.

चालता चालताच त्यांनी खिशातून ती चिठ्ठी काढली आणि त्याचे तुकडे तुकडे करून हवेत उधळून दिले. □

**मूळ हिंदी कथा : संजीवकुमार**
**( पाटना )**
**मराठी अनुवाद : बि. जे. अविनाश**
**( कोरेगाव )**

---

## पुस्तके

# ‘ मला उध्वस्त व्हायचंय ’

## स्त्रियांच्या आत्मकथेत लक्षणीय भर

आत्मचरित्र म्हणजे साधारणतः त्या व्यक्तीने स्वतःच स्वतःशी केलेला संवाद असतो, आयुष्याच्या संध्याकाळी स्वतःच्याच आयुष्याचा घेतलेला आढावा असतो. आपल्याच यश–अपयशांची कारण मीमांसा असू शकते. चांगले आत्मचरित्र आत्मस्तुतीपासून अलग असते तसंच खोट्या आत्मवंचनेच्या मार्गाला जात नाही. चांगले आत्मचरित्र व्यक्तीच्या आयुष्याचा जमा–खर्च तटस्थपणे मांडत असते. अशी अलिप्त वृत्ती ही आत्मचरित्राची आवश्यकता ठरते. कारण अलिप्त नसणारी अशी वाङ्मयीन कृती कितीही चांगली असली तरी गुणवत्तेच्या कसोटीवर उतरत नाही. अलिप्ततेच्याच जोडीनं शैलीतलं मोकळेपण आत्मचरित्रात आवश्यक ठरतं. मोकळेपणानं लिहिलेलं आत्मनिवेदन टोकाच्या सुख-दुःखाचं, गहिऱ्या-मनस्वी भावभावनांच अर्थपूर्ण चित्रण करू शकतं. एका मर्यादेपर्यंत आपल्या खाजगी घडामोडी शब्दातून व्यक्तवू शकतं. आपल्या सामाजिक संदर्भांचे धागेदोरे अशा वैयक्तिक संबंधांना नेऊन भिडवू शकतं.

आत्मचरित्र हा साहित्यातला एक संपन्न वाङ्मयप्रकार मानला जातो. परकीय साहित्यातही शेकडो वर्षांपूर्वी एखादा रूसो आपल्या पापपुण्याचा हिशोब ‘ कन्फेशन ’-मध्ये देतो. अलीकडचा नेरूदासारखा कवी आपल्या सामाजिक बांधीलकीचा जीवन-प्रवास आठवणींतून सजीव करतो. मराठीतही ‘सांगत्ये ऐका’ सारखी चांगली आत्मचरित्र ह्यापूर्वीच आलीयत. ‘ मला उध्वस्त व्हायचंय ’ हे मलिका (की मालिका ?) अमरशेखचं पुस्तक हे मराठी वाङमय दालनात आलेलं एक नवं आत्मचरित्र.

आत्मचरित्र हा उत्तर आयुष्यात मागे वळून घेतलेला आढावा असला, तरी क्रीडाक्षेत्रातली महनीय माणसं आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच आत्मचरित्रं लिहिताना दिसतात. एकूण क्रीडा क्षेत्रातील उमेदीची मर्यादित वर्षं पहाता हे स्वाभाविक वाटतं. काही दलित साहित्यिक आपल्या पूर्वायुष्यातले आगळे–वेगळे अनुभव आत्मचरित्राच्या माध्यमातून मांडताना दिसतात; पण चांगल्या आत्मचरित्रांच्या कसोटीला त्यातलं एखादं दुसरंच उतरतं. इथे मलिका अमरशेखसारखी तरुण स्त्री वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी आपल्या बालपणाचा, तारुण्याचा, बारा वर्षाच्या वैवाहिक जीवनाचा मागोवा घेऊ पहाते तेव्हा सुजाण वाचकांचं लक्ष त्याकडे वेधलं जाणं अगदी स्वाभाविक ठरतं.

मलिका, अमरशेखसारख्या ख्यातनाम कलाकाराची धाकटी मुलगी. वडील बार्शीचे मुसलमान. साम्यवादी पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते. आई, हिंदू सारस्वत ब्राह्मण. अशा वेगळ्या घरात जन्माला आलेली मलिका, बऱ्याचदा अंथरूणाला खिळलेली. त्यामुळेच की काय काहीशी एकाकी, स्वप्नाळू, मनस्वी. कवितेच्या विश्वात वावरणारी; पण एका सुस्थिर घरात वाढलेली. तिच्या बालपणाच्या आठवणींमध्ये तसं आगळं वेगळं काहीच नाही. वेगळेपण म्हणजे घरातलं कलासक्त वातावरण. मोठ्या लोकांची ये–जा, वडलांचे गावोगावचे दौरे असं काही. त्यातही काही क्षण तिच्या मनात जागा करून राहिलेत. लहानपणी झालेली प्ल्यूरसी, सातरस्त्यावरचं घर, भाईंच्या कार्यक्रमावर फिदा होऊन एका जवाहिऱ्यानं त्यांना दिलेला किंमती खडा, सुर्वे–करंदीकराच्या काव्य मैफिली, प्रचंड देहाचे नि मनमोकळे वागणारे अत्रेकाका, भाईंचा अपघाती मृत्यू आणि कॉरोनॉर कोर्टात दिदीनं ‘ माणुसकी ’ हा धर्म म्हणून लिहायला भाग पाडणं. या साऱ्या आठवणींची चित्र तिच्या मनात ताजी आहेत.

पण मलिकाच्या आयुष्यात परिवर्तनाचा क्षण येतो तो नामदेवच्या ओळखीमुळे. नामदेव म्हणजे दलित पँथरचा नामदेव ढसाळ. तिचा मेव्हणा. अनिल बर्वेमुळे तिचा त्याच्याशी परिचय होतो. तोही अगदी नाटयपूर्ण परि-

स्थितीत. नामदेवनं ढाले, पवारबरोबर संघटना काढलेली. संघटनेच्या पहिल्याच सभेत हा गोंधळ. त्यातून नामदेववर अश्लील भाषण केल्याबद्दलचं पोलिसांचं समन्स होतंच; पण त्यानं भाषण केलं नि पोलिसांनाच गुंगारा देऊन, तो बाहेर पडला नि अनिल बर्वेबरोबर मलिकाच्या घरी येऊन पोहोचला. त्या भेटीचं, नामदेवचं तिनं प्रभावी शब्दात चित्रण केलंय. उषाकिरणच्या पायथ्याला झोपडीत राहणाऱ्या, दिवसभर गांजा ओढून रात्री टॅक्सीत झोपून राहणाऱ्या, झपाटल्या वादळागत फिरणाऱ्या आणि सामाजिक जाण जागी ठेवत कवितेशी संगत धरणाऱ्या नामदेवच्या ती प्रथमदर्शनीच प्रेमात पडली आणि थोडयाफार अनुनयानंतर त्याची परिणीती म्हणून तिनं नामदेवशी विवाहही केला.

इथपर्यंतच मलिकाचं आयुष्य सरळ होतं. वडिलांचा मृत्यू सोडल्यास दुःख वाटयाला आलं नव्हतं; पण मलिकाच्या आत्मचरित्राचा पुढचा बारा वर्षांचा सांसारिक जीवनाचा भाग म्हणजे प्रेम, तणातणी, दुरावा, पुन्हा प्रेम, भांडणं, संबंध संपवणं, पुन्हा जुळवून घणं ह्याचाच सारा इतिहास आहे. नामदेवचं व्यक्तिमत्त्व तिच्याहून वेगळं. वादळी संघटना बांधू पाहणारं. पोलिसांना पाठीवर घेऊन फिरणारं. फोरासरोडवरच्या बकालवस्तीतल्या एकखणी घरात राहणारं. अशा माणसाशी काहीशा मध्यमवर्गीय संस्कृतीत वाढलेल्या, भावनाविवश, स्वतःच्या व्यक्तिमत्वाची जाण असलेल्या मलिकाचा संसार म्हणजे मतभेद, भांडण याशिवाय दुसरं काय असू शकणार होतं? पण तिनं ते विलक्षण मोकळेपणी मांडलय. नामदेवची प्रसिद्धी, त्याच्या विरुद्धचा अपप्रचार, त्याने बदललेल्या भूमिका, पाटर्या, त्यातून संघटनेत पडलेली फूट, आर्थिक सुबत्ता, ओढगस्ती, विकलेले दागिने, कार्यकर्त्यांची जेवणीखाणी, घराची दोन बहिणींनी पार्टिशन करून केलेली वाटणी ह्या साऱ्याच उलट-सुलट घटनांची प्रतिबिंब तिच्या आत्मचरित्रात उमटलीयत आणि ह्याच्याच जोडीला, ती म्हणते त्याप्रमाणे, तिच्या नवऱ्याचं पिणं, भानगडी, तिच्या वाटयाला आलेली मारहाण, नि इतर वैयक्तिक छळ यांचीही वर्णनं ह्या आत्मनिवेदनात जागोजागी आली आहेत.

## व्यथा व्यक्तिगत पातळीवरच

मराठी स्त्रीच्या आत्मवृत्तात मोकळेपणालाही मर्यादा राहतात. अपवाद फक्त हंसा वाडकरचा; पण त्या दृष्टीनं पाहिलं तर मलिकाचं आत्मचरित्र विलक्षण मनमोकळं आहे. ह्या मोकळेपणातूनच तिने स्वतःच्या वयात येण्याच्या अनुभवाबद्दल लिहिलंय, तर आपल्या पहिल्या शारीरिक अनुभवाबद्दलही ती धीटपणे म्हणत्येय, 'तो पहिला अनुभव त्रासदायकच होता. ह्या कसरतीला लोक शरीरसुख का म्हणत असावेत हा प्रश्न पडला!' असं अनुभवांचं मोकळं चित्रण ह्या आत्मचरित्रात जागोजागी दिसतं. मराठी स्त्रियांच्या आजवरच्या आत्मनिवेदनाचं स्वरूप पहाता हे मोकळेपण वेगळं वाटतं. अधिक वास्तववादी वाटतं आणि ह्या मोकळेपणाचं म्हणून तर प्रकाशकानं खळबळजनक असं वर्णन करून मराठी वाचकांचं लक्ष ह्या पुस्तकाकडे वेधलं असावं.

ह्या आत्मनिवेदनातून व्यक्त होणारी मलिकाची भूमिका अधिक करून एका स्त्रीची आहे. एक स्त्री म्हणूनच ती आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीकडे न्याय मागत्येय. इथल्या साऱ्या कुंठित झालेल्या स्त्रियांच्या दृष्टीनं तिला ते अधिक महत्त्वाचं वाटतं. स्त्रीला नवऱ्याच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी तिचा आक्रोश आहे. त्यासाठी तिला उध्वस्त व्हायचंय; पण मलिकाची भूमिका ह्या आत्मनिवेदनातून सफळ झाल्याचं जाणवत नाही. स्त्री मुक्तीसाठीचा हा व्यापक आक्रोश न ठरता वैयक्तिक पातळीवरचा संताप, आदळआपट वाटतो. नवऱ्याचा जाच, मारहाण ही दुःखं काय भारतीय स्त्रीला नवीनवखी नाहीत. मलिकाची दुःखंही ह्या पारंपारिक पठडीहून काही वेगळी नाहीत. ही दुःखं इतक्या वेगवेगळ्या माध्यमातून कलाकृतीतून आजवर व्यक्त झालीयत! म्हणूनच मलिकाच्या ह्या आक्रंदनाला वेगळं सार्वत्रिक परीमाण प्राप्त होत नाही.

त्याशिवाय सामाजिक क्षेत्रात वावरणाऱ्या, वादळी व्यक्तित्वाच्या माणसाशी वैवाहिक संबंध जोडले गेलेल्या सरळसाध्या, भावनाप्रधान, आपलं व्यक्तित्व जपू पहाणाऱ्या स्त्रीची कैफियत याहून वेगळी काय असू शकणार आहे? नेटका-सुखी संसार करू पहाणाऱ्या घरगुती स्त्रीहूनही मलिकाची वैयक्तिक भूमिका अशी किती वेगळी आहे? शिवाय तिच्या कैफियतीला नामदेवाच्य दृष्टीनं दुसरीही काही बाजू असू शकेल. त्या दृष्टीनं श्री. जयंत प्रधान यांनी दलित चळवळीवरच्या आपल्या अलीकडच्या लेखात मलिकाविषयी लिहिलंय तेही विलक्षण बोलकं आहे. ते म्हणतात, 'तिला सुस्थिर आयुष्याची, उच्च रहाणीची सवय होती. नामदेव म्हणजे घरी-दारी चळवळ. मलिकाचं खाजगी जीवन नाहीसे झाले. कोणतीही बाई हे फार काळ सहन करणे कठीण होते-तसला पिंड नसताना. तिला स्वतःचे वेगळे करिअर करायचे होते. तिचे नामदेवशी खटके उडू लागले. कार्यकर्ते त्यांना मिळालेल्या वागण्यापासून नामदेवच्या घरापासून तुटू लागले!' जयंत प्रधानांनी मांडलेल्या ह्या बाजूचाही ह्या आत्मचरित्राचे संदर्भात विचार व्हायला हवा.

मलिकाची आत्मकथा प्रकाशकांनी म्हटलंय त्याप्रमाणे खळबळजनक आहे यात शंका नाही. कुणाही स्त्रीनं मराठीत असं उघडं आत्मचरित्र अद्याप लिहिलेलं नाही. त्याची भाषा चांगली कसदार आहे. वर्णन, व्यक्ती चित्रं नेटकी नि विलक्षण वाचनीयही आहेत; पण त्यातल्या कथा-व्यथा व्यक्तिगत पातळीवरच रहातात. सामाजिक चळवळीत वावरणाऱ्यांच्या व्यक्तिगत जीवनावर ती प्रकाश टाकत असली तरी तीही बाजू फारशी नवी, निराळी नाही. स्त्री मुक्तीच्या दृष्टीनं पाहिलं तर त्यातून जाणवतो तो फक्त आवेश नि भावनांचा उद्रेग. स्त्री मुक्तीची व्यापक प्रातिनिधीकता त्याला मिळत नाही. तसेच चांगल्या आत्मनिवेदनाला आवश्यक असलेली अलिप्तता इथे जाणवत नाही की लेखिकेच्या वैचारिक परिपक्वतेचा प्रत्यय येऊ शकत नाही.

ह्या साऱ्या मर्यादा विचारात घेतल्या तरी सुजाण मराठी वाचकानं हे आत्मचरित्र एकदा तरी वाचावं हे मात्र निश्चित. मराठी स्त्रियांच्या आत्मकथेतली एक लक्षणीय भर म्हणून.

**—अशोक प्रभाकर डांगे**

**'मला उध्वस्त व्हायचंय'**
**मलिका अमरशेख**
**मॅजेस्टिक बुक स्टॉल**
**पृष्ठे : १२६, कि. रुपये : तीस**

# फकीर–वेळ

नंदकुमार शेंडगे यांच्या कविता नियतकालिकांतून समोर आल्या होत्या, तेव्हाच त्यांच्या वेगळेपणाने मन वेधून घेतले होते. वेगळेपणा होता तो प्रतिमांत आणि अभिव्यक्तीत. विषयातही तेवढाच धक्कादायक नवेपणा येईल तर ही कविता एक नवे क्षितिज मराठी कवितेला देईल असेही वाटले होते.

आता त्यांचा पहिलाच छोटासा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. नावापासूनच वेगळेपण घेऊन. कवितासंग्रहांची नावेसुद्धा 'गोड' (?) असावीत या समजुतीने अजून कवींना (आणि प्रकाशकांनाही) पछाडले आहे. त्या भानामतीची छाया येथे नाही. किती चकित करणारे नाव आहे– 'फकीर-वेळ'. त्यातला फकीरसुद्धा बऱ्याचजणांना खटकणारा. एक शब्दफेकू दोस्त म्हणाले, 'दरवेशी–वेळ' का नाही ? हे एक बरे झाले. मोठ्या पेपरात नसेना का, खाजगीत का होईना या पुस्तकाच्या नावाने थोडी नेहमीच्या रस्त्यावरची धूळ उडवली. हेही नसे थोडके.

'फकीर–वेळ' ही कविता मात्र निराश करते. त्यातली 'फकीर', 'विदेही', 'दरवेशी', 'जुई' अशी प्रतिमांची गल्लत कवीला आपली माती अजून सापडली नसावी असा संभ्रम निर्माण करते.

पण हा संभ्रमच. 'बरगड्यांचा पियानो' अशी भयचकित करणारी प्रतिमा या सगळ्या कवितांच्या केंद्रस्थानी आहे. वेदना आणि करुणा यांचं एक विलक्षण रसायनगीत हा लोकविलक्षण पियानो वाजवतो आणि त्याच्या भयद सुरांनी ही सगळीच कविता थरारून गेलेली आहे. इथे कवीच्या मनात उगवतो तो संध्याकाळचा अस्तकाल. इथे कवी शोधतोय एक शहर-पण कुठे आहे ते शहर ? ते तर कधीच वाहून गेले आहे–

माझ्यातून गस्त घालणारे शहर,<br>काळोखाच्या पुरात वाहून गेले...<br>मग काय करायचे ?–

'घोडा वळेल...तो गाव मी माझा समजेन' पण हेही शक्य नाही–कारण–

'मला सापडली नाही अशी कोणतीही वसाहत<br>जिथे उगवून आलेय एखादे स्वप्नाचे सळसळणारे झाड'

आणि

'माझ्या स्वप्नाच्या शहरावर<br>काळोखाचे भरगच्च शेवाळ उगवून येतेय'

मग स्वतःच एक घर तरी बांधावं ? पण घराची आठवणही नको तितकी भयानक–

'दिवसाचे आकाश कधीच पेटलेय...<br>धडाधड जळताहेत माझी स्वप्ने<br>आणि माझे एकुलते एक कौलारू घर'

वेदना आणि करुणा यांची मूर्ती म्हणजे आई. श्री. शेंडगे यांची 'आईची कविता' मुळातूनच वाचली पाहिजे तर कवीला दिसणारी व्यक्तिजीवनातील रूपकथा (myth) शेंडग्यांच्या कवितेत ठायी ठायी भेटते आणि अशा एखाद्या कवितेत ती एक चकित करणारे काव्यरूप घेऊन येते हे पटेल.

'तिच्या सोशिक गात्रांतून<br>वर्षानुवर्षं ठिबकतोय पाऊस'...

अशी मर्ढेकरोत्तर कवितेतील neo-romantic, तरी सहज साधी सुरुवात करून आई एका राणीची गोष्ट कशी सांगायची इथे कवि येतो. ती गोष्टही 'चौदा चिमण्या एका राणीच्या डोळ्यात चिवचिवल्या' अशी साधीसुधी आणि तरी रूपकथेशी (myth शी) सांधा जोडणारी आहे. आणि ही केंद्रस्थानी आलेली रूपकथा कवितेचा शेवट केवढा अचंबित करून जाते–

'राणीची जागा तिने घेतलेली<br>असे भास–आभास मी पहायचो<br>तेव्हा आई आकाश दूर सारून<br>ईश्वर शोधीत असताना दिसायची'.

रूपकथा (myth) हे श्री. शेंडगे यांच्या कवितेचं लक्षणीय वैशिष्ट्य आहे. घोडे, उंट, वाळवंटे, पाखरे, रस्ते, शहरे यांच्या किती तरी रूपकथा (myths) त्यांच्या कवितांतून आहेत. पहिलाच संग्रह असल्याने त्या रूपकथांचे स्वरूप अजून कच्चे आहे. या त्यांच्या तशिष्टघपूर्ण शैलीचा पाठपुरावा त्यांनी केला वॅर त्यांच्या यापुढील कवितांबद्दल मोठ्या आणि भरीव अपेक्षा बाळगता येतील.

**शांताराम रामचंद्र शिंदे**

# दलित प्रेम कविता : उत्पात

शरणकुमार लिंबाळे यांचा उत्पात हा कवितासंग्रह दलितसाहित्यात एक वेगळाच आविष्कार घडविणारा आहे. दलितसाहित्यात प्रामुख्याने वेदना आणि विद्रोह हेच प्रकर्षाने जाणवतात. दलितकविता आक्रस्ताळी व आक्रोश करणारीच बव्हंशी आहे; पण लिंबाळे यांची कविता वेदना–विद्रोहापलीकडे दलित-जीवनाच्या सुखदुःखाचीही दखल घेत आहे, हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

उत्पात या कवितासंग्रहातील प्रेमकविता एका वेगळ्या धर्तीच्या आहेत. दलित-जीवनातही प्रेम, माया, ममता असते त्याचा अविष्कार या काव्यसंग्रहात आहे. दारिद्र्य, दुःख, दास्य व दैन्य अशा वातावरणात प्रेमाची कविता ही 'उग्रउत्कट' वाटते.

घमेल्या पकडून घमेल्या फेकताना<br>तोंडावरचा थकवा नळावर धुताना<br>गाडीवरची पाव-भजी खाऊन<br>चुना-तंबाखू चोळताना<br>तू मला दिसलीस.

अशी ही प्रेयसी आहे. ही प्रेयसी काबाडकष्ट करणारी आहे. ती वास्तव वाटते. ती मानवी वाटते. इथे कवीने खोटी प्रेयसी रंगवली नाही. ती परी नाही की, अलौकिक सौंदर्यसम्राज्ञी नाही.

मरमर काबाडकष्ट करावे, उपाशी–तपाशी जगावे. जगत असताना एक-दुसऱ्याच्या कामी पडावे; हा खरा दलित-जीवनाचा आविष्कार आहे. इथे ढोंग नाही की, डौल नाही. विलास नाही की, श्रीमंतीचा दिमाख नाही. इथे माणूसपण आहे.

पोटासाठी परिश्रम करीत असताना, आपल्या प्रेयसीच्या गालावरून निथळणारा घामाचा थेंब पाहून कवीला तो तीर्थापेक्षाही पवित्र असल्याचा दिव्य भास होतो ही नोंद काव्याची उत्कटता वाढविणारी आहे.

कुणी दिलेली जुनी साडी ही<br>किती खुलून दिसते तुला<br>मागून आणलेला ब्लाऊज<br>शोभून दिसतो रानफुला

या शब्दांना दुःखाचा सोस आहे. मायेचा ओलावा आहे. शहराबाहेरील, गावाबाहेरील झोपडपट्टीतीलही परिस्थितीने फाटलेली माणसं दिलदार मनाची वाटतात. पोटासाठी अन्नाची भीक मागावी लागते. मागून आणलेल्या भाकरीच्या शिळया-उष्टया तुकडयावरच रोजची गुजराण करावी लागते. नेसण्यासाठी अशीच जुनी-पानी वस्त्रे कुणी तरी दिलेली असतात. अशा जुन्या वस्त्रात कवीची प्रेयसी खुलून दिसते. ती रानफुलासारखी वाटते. या कवितांमध्ये सच्चे प्रेम आहे. गरीबी आहे. दलितता आहे. मनाचा मोठेपणा, खरेपणा आहे. कविता त्यामुळे वास्तव वाटते. ती काल्पनिक-गूढ-रंजनवादी ठरत नाही. दलितसाहित्यिकांना दलितजीवनातील प्रेम, सुख याचा शोध घ्यावयाचा आहे. जीवनाच्या सर्वांगांना तिला स्पर्श करावयाचा आहे जीवनातील अनेक कडू-गोड अनुभवांची दखल घ्यावयाची आहे.

या कवीने जसे दलित स्त्रीवर प्रेम केले आहे, तसे सवर्ण स्त्रीवरही प्रेम केले आहे. कवीच्या तारुण्यावर खुष होऊन सवर्ण तरुणीने प्रेम केले आहे; पण जेव्हा आपला प्रियकर अस्पृश्य आहे हे कळते, तेव्हा मात्र ती त्याचा त्याग करते. तिचे प्रेम फसवे असते. तरी पण कवी आपण उच्च कुळातील तरुणीवर प्रेम केले होते ह्या एका आठवणीवर जगू इच्छितो.

माझी
जात चोरून ठेवलेली रखेली
जात कळाल्यावर जातभाईबरोबर पळते.

हा जातीचा कडु अनुभव कवीला येतो. इथे कर्णाची आठवण होते. सूतपुत्र म्हणून कर्णाला द्रौपदीने नाकारले होते. कर्णाच्या तारुण्याचा हा अपमान होता. तोच अनुभव कवीच्या वाटयाला येतो. केवळ अस्पृश्य म्हणून तो नाकारला जातो. कवी म्हणतो–

माझे पौरुष ॲसिड ॲसिड
भोगू इच्छिते इथल्या हरेक मादीला
जिने नाकारले मला
क्षुद्र म्हणून

कवीचा जळफळाट असा विद्रोहाच्या रूपात प्रकट होतो. कवी पेटून उठतो. त्याच्या मनामध्ये आपल्याला हीन लेखणाऱ्या प्रवृत्तीबद्दल अतिटोकाचा द्वेष वाटतो. ही प्रवृत्ती त्याला नेस्तनाबूद करावीशी वाटते. त्याला माणूस म्हणून आपली किमत व्हावी असे प्रामाणिकपणे वाटते. आपल्या माणूसपणाची कदर न करणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध तो सूडाने पेटतो.

शरणकुमार लिंबाळेंनी प्रेयसी-मैत्रीण यांच्या प्रेमाबरोबरच आई-वडील, आजा-आजी या नात्यांच्या प्रेमाचीही दखल घेतली आहे. मागून आणलेली भीक प्रेमाने भरवणारी आजी आहे. वाडे झाडून मिळालेले मुसरे आपल्या प्रियकराला देणारी मैत्रीण आहे हमाली करून खाऊस पैसे देणारा प्रेमळ बाप आहे. दारोदार फिरून टाळू भरण्यासाठी तेल मागणारी आई आहे. या सर्व प्रेमाच्या नात्यांचे या काव्यसंग्रहात दर्शन घडते.

या काव्यसंग्रहाला डॉ. गंगाधर पानतावणे व नरहर कुरुंदकराची प्रस्तावना आहे. मुखपृष्ठही अर्थपूर्ण आहे; पण मुखपृष्ठाची छपाई थोडी घसरली आहे. त्यामुळे काव्यसंग्रहाचे सौंदर्य मार खाल्ले आहे. तसा काव्यसंग्रह खूपच आशादायी वाटतो.

–राहुल कांबळे

उत्पात : शरणकुमार लिंबाळे
परिवर्तन प्रकाशन
पृष्ठे ६४, किंमत ८


# WASP PUMP FOR EVERY PURPOSE

1. **High pressure pumps to work against 600 kg / $cm^2$**
2. **Deepwell Pumps to draw water from 100 meters depth.**
3. **Pumps for pumping Chemicals, Acids and Corrosive Liquids.**
4. **High Pressure Multistage Pumps.**

## M/s. Water Supply Specialists Pvt. Ltd.

House of "WASP" Pumps,
151, Thambu Street,
P. B. No. 1707, Madras - 600 001.
Telephone Nos. 23436 & 27225
Telegram : PUMPMEN.

# सुशिक्षित स्त्रियांचे प्रश्न

**मंगला गोडबोले**

एस. एन. डी. टी. च्या महिला मार्गदर्शन केंद्रातर्फे मंगळवार दिनांक ११ डिसेंबर रोजी दुपारी 'सुशिक्षित स्त्रियांचे प्रश्न' या विषयावर डॉ. अनिल अवचट यांच्याशी चर्चेचा कार्यक्रम ठेवला होता. सुंदर स्त्रियांशी मैत्री करायला मला आवडत नाही. कारण त्यातील बहुतेकींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झालेला नसतो, त्या अप्रगल्भ असतात अशा अर्थाचे त्यांचे काही विचार 'फेमिना'मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून काही भुवया उंचावल्या गेल्या होत्या. कोणाही व्यक्तीला आपले व्यक्तिगत विचार जाहीर मांडण्याचं स्वातंत्र्य असतंच; पण ते विचार मांडणारी व्यक्ती, तिच्या सामाजिक जाणिवा, कार्य लोकांच्या नजरेत भरणारं असलं तर त्या विचारांची दखल वेगळ्याप्रकारे घेतली जाते. गेली काही वर्षे समाजातल्या वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या शोषित, नडलेल्या गटांचा आस्थापूर्वक विचार, अभ्यास व लेखन करण्यासाठी डॉ. अवचट सिद्ध झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या प्रश्नाकडे बघण्याची त्यांची दृष्टी कशी आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा होती म्हणून या कार्यक्रमाला हजेरी लावली. या विषयावर आपण पहिल्यांदाच बोलत आहोत व फार मूलभूत विचारमंथनाची अपेक्षा करू नये असा बचावाचा पवित्रा अवचटांनी भाषणाच्या सुरुवातीलाच घेतला होता. तसंच संयोजकांनीही व्याख्यानापेक्षा चर्चेची, संवादाची अपेक्षा व्यक्त केलेली होती. त्यामुळे मूळचं प्रतिपादन आणि प्रश्नोत्तरं यातून जे काही थोडंफार (फार थोडं) हाती लागलं ते समोर ठेवत आहे.

सुंदर स्त्रियांभोवती सौंदर्याचं वलय समाजच निर्माण करतो. अगदी लहानपणापासून सुंदर मुलीला सतत तिच्या सौंदर्याची जाणीव करून दिली जाते. त्यामुळे कुठलीही किंमत देऊन ते टिकवणं जरुरीचं आहे असा तिचा ग्रह होतो. सौंदर्याचा गंड एकीकडे आणि इतरांशी जमवून घेण्याचा सराव, सवय नसणं दुसरीकडे. यामुळे समाजाच्या मूलस्त्रोताशी एकरूप होऊन त्याचा व स्वतःचा विकास करण्याची प्रेरणाच तिला कधी मिळत नाही. या शारीर सौंदर्यातलं तात्पुरतं काय आणि टिकाऊ काय याचा विवेकही उरत नाही. समाजानं तिला देहावरून ओळखण्याची तिला इतकी सवय होते की ती स्वतःही स्वतःला देहावरूनच ओळखते. शारीर सौंदर्याच्या बहराची काही वर्षे उलटली की मात्र तिची (व कित्येकदा तिच्या जीवनसाथीदाराची) परिस्थिती फारच दयनीय होते. नवीन काही घडवण्याची वेळ निघून गेलेली असते व गेलेल्या सौंदर्यासाठी हळहळण्यात किंवा कृत्रिमपणे ते परत मिळवण्याच्या धडपडीत तिचं उर्वरित आयुष्य जातं. आजची सर्वसाधारण सुशिक्षित स्त्री अर्थार्जनासाठी घराबाहेर पडते तेव्हा स्त्रियांचं जीवन सुधारल्याचा आभास होतो; पण पोटासाठी करण्याचं ते विशिष्ट काम सोडलं तर एरवी त्यांचं मनोविश्व फारच संकुचित असतं. त्यांचं वाचन गुलशन नंदा किंवा त्याचे मराठी अवतार व. पु. काळे यांच्यातच गुंतलेलं असतं. वैचारिक पातळीवर त्रास देणारं, धक्का देणारं आव्हान देणारं असं काहीही त्यांना नको असतं. थोडक्यात म्हणजे आजची सुशिक्षित स्त्री पैसा कमवू शकते एवढी एकच गोष्ट कालच्या, चूलमूल करणाऱ्या स्त्रीपेक्षा, तिच्यात जास्त असते. एरवी ती प्रवाहपतितच असते. ती जर केवळ कुटुंबवती, गृहिणी असेल तर सासरचा अन्याय निमूट सोसते किंवा अगदी असह्य झाला तर स्वतःचं जीवन संपवते; पण अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची, सामुहिक प्रयत्न करण्याची प्रेरणा तिचं शिक्षण तिला देत नाही. जर करियरिस्ट असेल तर शिक्षण घेतानाच्या काळातली तिची महत्त्वाकांक्षा वास्तवात आल्याचं तिला क्वचितच बघायला मिळतं. इंजिनियर, जिऑलॉजिस्ट, पत्रकार अशा अनेक स्पर्धात्मक व्यवसायातल्या स्त्रिया आपल्या कुवतीपेक्षा पुष्कळसं कमी प्रतीचं काम वर्षानुवर्षं करतात; पण एखाद्या कामासाठी वाहून घेणं, त्यात उडी टाकणं त्यांना जमत नाही. आपली सामाजिक—व्यावसायिक चौकट त्यांना तशी मुभा देत नाही. कामाच्या वेळा, दौरे, प्रत्यक्ष कामगारांशी संपर्क, राहण्याच्या सोयी, सुरक्षितता असे अनेक प्रश्न त्यांची अडवणूक करतात. यातल्या व्यावसायिक प्रश्नांसाठी तर सोडाच, पण खुद्द स्त्रियांच्या प्रश्नांसाठीसुद्धा स्त्रिया फारशा एकत्र येत नाहीत. काही ठिकाणी काही गट व्यक्तिगत प्रश्न, इंडिव्हिज्युअल केसेस, हाताळतात; पण एकूण सामुहिक किंवा संस्थात्मक पातळीवरचं काम आज जवळजवळ होत नाही. स्त्रियांच्या प्रश्नांसाठी संस्थात्मक प्रयत्न करणारे कर्वे, फुले, आगरकर हे पुरुषच होते. उलट स्त्रिया मात्र आजही स्वतः शिकल्या, अर्थार्जन करून अपेक्षित त्या दर्जाचं जीवन जगू लागल्या की इतर स्त्रियांच्या प्रश्नांविषयी बेफिकीर होतात. प्रस्थापितांविरुद्ध झगडणारी अनेक दलित, शोषित माणसं आयुष्याच्या मध्यावर स्वतःच प्रस्थापित होतात असाच काहीसा हा प्रकार आहे. अशा अर्थाचे विचार डॉ. अनिल अवचट यांनी मांडले.

## येवढी तुच्छता, आकस का ?

या विचारात फार नवं काही नव्हतं तसंच नंतरच्या प्रश्नोत्तरातही नव्हतं. सुरुवातीलाच कोणीतरी विचारलं की, स्त्रिया आपल्या कुवतीपेक्षा कमी दर्जाची कामं करतात, याला व्यवस्थापनाचे पूर्वग्रह कारणीभूत नाहीत काय? उत्तर आलं की, ते तर आहेतच. व्यवस्थापनांनं याबाबत अधिक उदार, समंजस दृष्टिकोन घ्यायलाच हवा; पण त्याचबरोबर स्त्रियांनीही पुरुषाचं—म्हणजे अखेरच्या पातळीवर बलात्काराचं भय—सोडायला हवं. बलात्कार हा इतर अपघातांसारखा एक अपघात मानायला हवा. विकासाची प्रेरणा सुशिक्षित स्त्रीमध्ये का नाही हा पुढचा प्रश्न होता. उत्तरादाखल डॉ. अवचट म्हणाले की, शिक्षणामुळे स्त्रीच्या डोळ्यासमोरचं जीवनाचं चित्र—मॉडेल—काहीच बदललेलं नाही. गृहिणीपण, मातृत्व यांची चुकीची मॉडेल्स डोळ्यापुढे ठेवल्यामुळे देहाच्या, बुद्धीच्या ऐन ताकदीची पंधरा—वीस वर्षं स्त्रिया स्वतःला संसारात गाडून घेतात. गृहकृत्यदक्षता, सुगरणपणा, मुलांचा अभ्यास याला अवास्तव महत्त्व दिल्यानं त्यांना

स्वतःकडे बघायलाच फुरसत नसते. घर फंक्शनल असावं, तो प्रतिष्ठेचा विषय झाला की, त्यात स्त्रीचा बळी अटळ आहे. म्हणून विकासाच्या प्रेरणा क्षीण होत जातात. आणखी एका प्रश्नकर्तीनं नोकरी करणाऱ्या पुरुषांचं विचारविश्व संकुचित नसतं का असा सवाल टाकला, तर हे विश्व संकुचित राहाण्याला आपलीच कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, पुरुषी वर्चस्व जबाबदार असल्याचं आणखी एकीनं लक्षात आणून दिलं. हा स्त्रिया विरुद्ध पुरुष असा सामना नाही असा खुलासा करून अवचट म्हणाले की, वरवरचं, सुखासीन, झगमगीत जीवन स्वीकारायचं की अधिक मूलभूत, मानवी संबंधांवर आधारित अशी जीवनाची दिशा पत्करायची हा खरा सवाल आहे. दलितांच्या घरातली स्त्री कित्येकदा अधिकच दलित असलेली आढळली म्हणून स्त्रियांचा प्रश्न हा आपल्या विचाराचा विषय बनला. एकूणच स्त्रिया विविध दडपणांखाली वावरतात, सुंदर स्त्रियांवरची दडपणं वाढतात, ती आणणारे पुरुष व समाज बदलावे लागतील आणि तो बदल करण्यात स्त्रियांना मोठ्या प्रमाणावर संघटित प्रयत्न करावे लागतील असंही त्यांनी वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात सांगितलं. यावर माझ्या मागे बसलेली एक मुलगी तिच्या मैत्रिणीच्या कानात कुजबुजली, 'मग हे भाषण पुरुषांच्या सभांमध्येच करा की!' यावर अधिक भाष्य करण्याची जरूर आहे का?

सुशिक्षित स्त्रिया प्रवाहपतित आहेत यात व्यक्तिशः मला आश्चर्याचं काही वाटत नाही. एकतर सुशिक्षित हा शब्द फसवा आहे. समजा ५० वर्षांपूर्वी ५०, ६० टक्के बायका फायनल पास असतील, ३० वर्षांपूर्वी तेवढ्याच मॅट्रिक व आज समजा बी. ए. किंवा बी. एस्सी. पास असतील तर यात दर्जात्मक फरक आहेच कुठे? २००० साली ५०, ६० टक्के शहरी स्त्रिया डबल ग्रॅज्युएटही होतील. जोवर यात व्यक्तीची निवड किंवा नियोजन नाही तोवर पुढले परिणामही व्यक्ती नियंत्रित करू शकणार नाही. अर्थार्जनाची निकड आणि परिस्थितीचा रेटा हा युगधर्म आहे. त्यामुळे त्याही बाबतीत एकटी दुकटी व्यक्ती काही करू शकणार नाही. या सर्वांत मला खरोखरच आश्चर्य वाटतं ते एकाच गोष्टीचं. स्त्रीशिक्षण हे इतकं जुनं, सरावाचं झालं तरीही आपल्या समाजाचा सुशिक्षित स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन इतका तुच्छतेचा, आकसाचा, अनादराचा का असावा हे मोठंच कोडं वाटतं. पुण्यामुंबईतल्या वाचकांना हे अतिरंजितही वाटेल; पण जरा तालुका पातळीवर जाऊन बघावं. शिकलेली बाई, न शिकलेल्या बायकांच्या आणि पुरुषांच्या डोळ्यात सतत सलत असते. व्यवहारात ती कुठे कमी पडेल आणि आपण कधी तिची चेष्टा करू यासाठी सगळे टपल्यासारखे वाटतात. एकीकडे सुशिक्षित स्त्रीबद्दल समाजाला सहानुभूती नाही आणि दुसरीकडे तिनं समाजासाठी काही तरी करावं अशी उघडछुपी इच्छाही आहे असा हा तिढा आहे. खुद्द सुशिक्षित स्त्रीला आपल्याला काय हवंय हे कळत नाहीये. पैसा हवाय? प्रतिष्ठा हवीये? पारंपरिक कुटुंबजीवन हवंय? समाजात मिसळायचंय? का समाजापासून फटकून आपलं बेट करून राहायचंय? का सगळ्यातलं थोडं थोडं हवंय? त्या दिवशी अवचटांनी या सगळ्या प्रश्नांची उत्तरं दिली नाहीत. ती अपेक्षाही नव्हती; पण श्रोत्यांमधल्या बहुसंख्य तरुण मुलींना हे प्रश्न जरी जाणवले असले तरी तेही यश कमी नाही. □

---




**शोभा भागवत**

# शिस्त आणि शिक्षा

---

एका चांगल्या सुजाण आईचं आपल्या सातवी आठवीतल्या मुलीला समजावणं चालू होतं—अग, जोपर्यंत तू तुझं कपड्यांचं कपाट नीट लावत नाहीस तोपर्यंत तुला परीक्षेतही चांगले मार्क मिळणार नाहीत आणि नाचही चांगला करता येणार नाही. ह्या सगळ्यांचा एकमेकांशी संबंध असतो. ती एक वृत्ती असते ती सगळीकडे उपयोगी पडते.

ही गोष्ट अशी कुणा पालकांनी मुलांना समजावून दिलेली मी अजून ऐकली नव्हती. लहानपणी ह्या व्यवस्थितपणाचं शिस्तीचं खास महत्त्व वाटत नाही; पण मोठेपणी कामं वाढली, जबाबदाऱ्या वाढल्या, स्वतःचं जगणं स्वतःच्या हातात आलं की शिस्तीचं मोल कळायला लागतं. घरातली हवी असलेली वस्तू नेमक्या गरजेच्या वेळी सापडत नाही, शोधण्यात वेळ जातो, मनस्ताप होतो, पैसा खर्च होतो. मग लक्षात येत की जागच्या जागी वस्तू ठेवण्याची सवयच आपल्या हाताला नाही.

शिस्तीनं वेळ खूप वाचतो. वेळच्या वेळी सगळ्या गोष्टी होत गेल्या की, घोळ रहात नाहीत. गोंधळ होत नाहीत आणि जगण्याला एक चटपटीतपणा येतो.

ही शिस्त मुलांना कशी लावायची? कारण मुलं झाल्यावर आपण आता पुरेसे मॅच्युअर झालो असं आपण सहजपणे समजू लागतो. त्यामुळे स्वतःला नवी शिस्त लावणं वगैरे जमत नाही; पण मुलाला मात्र नीट वळण लागलं पाहिजे. तो शिस्तशीर व्हायला हवा ही अपेक्षा जवळजवळ सर्वच आईवडलांची असते.

मग शिस्त लावायचा अट्टाहास सुरू होतो. शिस्त आणि शिक्षा यांचंही सख्खं नातं शिक्षा केली नाही तर मुलं बिघडतील अशी मनात भीती असते; पण खरं आढळतं ते असं की मुलं बिघडतात ती शिस्त लावली नाही म्हणून नव्हे तर मुलांकडे पुरेसं लक्ष दिलं नाही म्हणून बिघडतात.

कधी कधी आपण फारच लक्ष देतो मुलांकडे. असं म्हणतात की मुलांकडे पुरेसं दुर्लक्षही करता आलं पाहिजे त्याची त्यांना गरज असते. नाही तर सततच मोठ्या माणसाच्या डोळ्यांखाली वाढायचं म्हणजे किती त्रासाचं होईल.

पण या बाबतीत पालकांच्या हौसेला तोड नसते. मुलांचा अभ्यास घेता यावा म्हणून पहाटे लवकर उठून पटापटा सगळा स्वयंपाक तयार करून अभ्यासाच्या वेळी मोकळी रहाणारी आई असते. मुलीच्या अभ्यासात तिचा इतर गोष्टीत वेळ जाऊ नये म्हणून ती अंघोळीला जाण्यापूर्वी बायरूममध्ये तिचे कपडे ठेवणारी आई असते.

यामागे एक भावना अशी असते की

आपण अभ्यास घेतला नाही तर मूल नापास होईल. ते बिघडेल. ही अगदी चुकीची समजूत वाटते की मुलाचा अभ्यास घेतला नाही तर मूल बिघडतं.

आपण असा अभ्यास किती काळ घेऊ शकणार आहोत याचा विचार करायला हवा. शेवटी मुलाचा अभ्यास त्याचा त्यानं करायचा आहे. मी मानगुटीवर बसून तो ठोकून ठाकून करून घेणं हे त्याला परावलंबी करणं आहे. त्याचं त्याला कळायला हवं. अभ्यास करायला हवाच.

त्यासाठी अभ्यास ही गोष्ट कंटाळवाणी राहता कामा नये. हसत खेळत अभ्यास व्हायला हवा. तो करता करता मुलाचा आत्मविश्वास वाढायला हवा. स्वतःच्या कुवतीचा अंदाज त्याला यायला हवा.

हे सगळं घडावं कसं ? आतून पटलं तर हे घडतं शिस्त वरून लादून येत नाही. आतून स्वयंशिस्त यावी लागते.

आपल्याला काय आपल्याला पालकांनी कमी गोष्टी शिकवल्या का ? त्यातल्या किती आपण मनापासून घेतल्या ? अंगी मुरल्या ? आपल्याला ज्या पटल्या त्याच. आपल्याला गोष्टी पटतात त्या त्या अनुभवातून स्वतः गेलं तरच. कुणीतरी बोललं आणि शिस्त आली असं होत नाही.

पालकांना मात्र सतत वाटतं की शिक्षा केली की शिस्त आलीच पाहिजे; पण हे एवढं सोपं समीकरण नाही.

एक गोष्ट आहे. एक शिबीर चालू होतं शिबीरासाठी लांबून लांबून लोक येत होतं. शिबीर चालू असताना एक चमत्कारिक गोष्ट घडली. शिबीरातल्या वस्तू चोरीला जात होत्या. आठ–दहा दिवस हा प्रकार अनुभवल्यावर लोकांनी तक्रारी करायला सुरुवात केली. त्यांना कोण वस्तू चोरतो तो चोरही माहीत होता. त्यांनी त्याचं नाव शिक्षकांना सांगितलं. शिक्षकांनी गुरुनी–लक्ष दिलं नाही. पुन्हा सर्वांनी मिळून त्या चोराचं नाव सांगितलं तरी गुरू गप्प बसला. काही दिवसांनी हे असह्य झालं. तेव्हा सर्वजण म्हणू लागले, तुम्हाला काही पर्वा नाही– आमच्या वस्तू चोरीला जातात आम्हाला त्रास होतो आणि त्यावर तुम्ही गप्पच बसता. तेव्हा आम्ही सर्वजण चाललो. आम्हाला नको हे शिबीर. हवं तर तुम्ही आणि तुमचा तो चोर रहा दोघे शिबीरात,

गुरू शांतपणे म्हणाले–

'खरंच ! तुम्ही हे शिबीर सोडून जा. त्याला एकट्याला राहू दे. कारण असं आहे की तुम्हाला बरं काय वाईट काय कळतं आहे. तुम्हाला शिबीराची गरज नाही. ते फक्त त्याला कळत नाही तेव्हा त्यालाच राहू दे. शिबीर त्याच्यासाठीच आहे.'

हे ऐकून त्या चोराच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी यायला लागलं आणि त्यानं गुरूंची आणि सर्वांची क्षमा मागितली.

ही शिस्त–शिक्षेशिवाय–मनाला भिडेल अशी– स्वतःबद्दल विचार करायला भाग पाडेल अशी ही आपल्या मुलांमध्ये कशी यावी ? आपल्या शिस्तीच्या कल्पना काय ? शिस्त म्हटली की शिक्षा आलीच का ? कशासाठी शिस्त लावायची ?

शिस्त ही एक वृत्ती आहे आणि ती सबंध जीवन व्यापून राहते हा संबंध कळला तर शिस्त अंगी बाणणं कदाचित सोपं जाईल. अधिक अर्थपूर्ण होईल. □

---

रंगभूमी

## विद्याधर पुंडलिकांचे नवे नाटक

# ' श्रद्धा '

वि. भा. देशपांडे

' श्रद्धा ' हे विद्याधर पुंडलिक यांचे नवे नाटक. या नाटकासाठी त्यांनी घेतलेला कालखंड १९७५ ते ८० असा पाच वर्षांचा आहे. या विशिष्ट कालखंडाला आपल्या जीवनात विशेष महत्त्व आहे. अनेकांना या कालखंडातील महत्त्वपूर्ण घटनांचे ताण, त्यातील विरोधाभास, कल्पनातीत गोष्टींमधली नाट्यपूर्णता तपशीलात स्मरणात असेल. विशेषतः तेव्हाच्या पंतप्रधान इंदिराबाई यांनी देशावर लादलेली आणीबाणी, त्यांच्या निर्णयाला झालेला विरोध, जनता पक्षाची राजवट आणि शेवटी झालेली होलपट अशा घटनांनी हा काळ व्यापलेला होता. अनेक ताणांनी मानवी जीवनातील विविध प्रश्नांना आपल्याला सामोरे जावे लागले होते.

अशा तणावपूर्ण काळात एक ध्येयवादी प्राध्यापक माधव देशमुख आपल्या तत्त्वांना, निष्ठांना घट्ट असतो, तेव्हा त्याच्या जीवनातील संघर्षमय, आव्हानात्मक प्रसंगाच्या वेळी काय घडते त्यावर नाटकाची रचना झाली आहे. या प्राध्यापकाच्या जीवनात श्रद्धा हे मूल्य आहे. किंवा उलटया अर्थाने असे म्हणता येईल की, ज्या जीवनमूल्यांवर तो निष्ठा ठेवून प्रत्यक्ष तसे आचरण करीत आहे त्यामध्ये श्रद्धा हे श्रेष्ठ मूल्य आहे. ही श्रद्धा जीवनावरची आहे, त्यातल्या तत्त्वांवरची आहे, निष्ठांवरची आहे. तिची व्यापकता किंवा कक्षा आणखीही वाढवता येण्यासारख्या आहेत. पुंडलिकांनी नाटकासाठी जो प्रत्यक्ष काळ घेतला आहे त्यावरून आरंभी असे वाटते की, त्या काळातील घटनांशी संबंधित अशा अनेक लहानमोठ्या ताणांवर नाट्यभाग उभा राहील. परंतु तसे घडले नाही. '७५ ते '८० मधील घटना पुढच्या भागात ( दुसऱ्या अंकात ) पार्श्व-

भूमी म्हणून राहिल्या. या पार्श्वभूमीवर या प्राध्यापकाच्या कौटुंबिक जीवनातील काही संघर्षप्रसंग आपल्या समोर आले. म्हणजे आरंभाला असे वाटत होते की '७५ ते '८० या कालखंडातील अतिशय अस्वस्थ अशा कालखंडातील राजकीय जीवनाचे विदारक चित्र आपल्याला पाहायला किंवा अनुभवायला मिळणार. तर तसे न होता राजकीय पार्श्वभूमीवरचे एक कौटुंबिक नाटक असे याचे स्वरूप राहिले. तेवढेच आणि तितकेच अभिप्रेत असेल तर तसे झाले आहे. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, हाच कालखंड नाटककाराने का निवडला असेल ? या कालखंडात मानवी मूल्यांना जेवढे आव्हान आणि आवाहन निर्माण झाले तितके तुलनेने अन्य आसपासच्या काळात झाले नाही असे गृहीत धरले तर या निर्दिष्ट काळातील ताण्याबाण्याचे चित्र तितक्या ताकदीनं भावले नाही असेच म्हणावे लागेल. तो काळ पार्श्वभूमी म्हणूनच राहिला. कुटुंबताण नाट्यरूपाने अधिकतेने समोर आले.

### नाट्य निवेदनात अडकले

हा प्राध्यापक अन्यायाविरुद्ध झगडणारा आहे. आपल्या तत्त्वांसाठी मोल देणारा आहे. प्राध्यापकांवर होणाऱ्या अन्यायासाठी सत्याग्रह करून तुरुंगवास सोसण्यास तयार होणारा आहे. हा सत्याग्रहासाठी जातोही; पण त्याच्या मित्राला तुरुंगवास घडतो, हा मात्र त्वरित सुटून येतो. ( आणीबाणीच्या काळात अशी एक अपवादात्मक घटना श्री. एस्. एम् जोशी यांच्या संदर्भात घडल्याचे स्मरते. चुकभूल द्यावी घ्यावी. अशा अपवादभूत घटनेचा वापर नाटककाराने केलेला आहे ) असा वापर करण्यात चूक काहीच नाही; पण सत्याग्रहासाठी जाणे आणि सुटका होऊन त्वरित परत येणे यातला मधला जो कालखंड आहे तो फारच थोडा असल्याने त्याचे परत येणे पहिल्या प्रसंगाचा परिणाम उणावते. तसेच त्याचा मुलगा जेव्हा वडिलोपार्जित घर पाडून थ्रीस्टार हॉटेल बांधायचा विचार करतो आणि नंतर कार्यवाहीलाही आरंभ होतो तेव्हा या प्राध्यापकाचा विरोध केवळ शब्दातच राहतो. विरोधासाठी विरोध असे आक्रस्ताळे स्वरूप राहते. आपल्या श्रद्धांचा, मूल्यविवेकांचा कालसापेक्ष विचार याने का करू नये असे वाटून जाते. पिढीतील अंतर हे केवळ वयाचे नसते तर विचारांचे, जीवनदृष्टीचे असते. त्यातून अनेक संघर्ष उभे राहतात. उभयपक्षी तडजोडही अपेक्षित असते. अन्यथा त्यातल्या एकाला कोणालातरी मोडून जावे लागते, संपावे लागते. त्या संपल्यातून हाती काहीच येत नसते. यातला काही भाग नाटकाच्या अखेरीस प्राध्यापकाला भकास वाड्यात एकटा ठेवून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. पण तो पुरेसा परिणामकारक नाही.

विद्याधर पुंडलिकांनी नाटकासाठी निवडलेला विषय हा विचारनाट्याला अधिक जवळचा आहे. तरीही ते पूर्णत: विचारनाट्य नाही. ज्या अर्थाने चक्र, माता द्रौपदी, चार्वाक आदी नाट्यबंधातून ते निश्चित स्वरूपाचे विचारनाट्य घसघशीतपणाने आपल्याला देतात तसे 'श्रद्धा'च्या संदर्भात घडले नाही. कारण हे नाट्य वैचारिक पार्श्वभूमीवरचे कौटुंबिक नाटक म्हणूनच पुढे आले आहे. विशेषत: राजकीय विचारनाट्य अपेक्षित होते तसे नाट्य देण्याची ताकद पुंडलिकांच्या लेखणीत जरूर आहे. सध्या ज्या प्रकारची विनोदी–फार्सिकल–गरम व्यावसायिक नाटके रंगभूमीवर भिन्न भिन्न कारणांनी यश मिळवीत आहेत, त्या मोहात न गुंतता पुंडलिकांनी वेगळ्या प्रकारचे गंभीर प्रकृतीचे नाटक लिहिण्याचा केलेला प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आहे; पण हा प्रयत्न मोठ्या प्रमाणात समाधान का देऊ शकत नाही असा जर आपण विचार करू लागलो तर ध्यानात येते की, यातले नाट्य प्राधान्याने शब्दात किंवा निवेदनात अडकून पडले आहे. दुसरे म्हणजे निवेदली जाणारी घटना ही मुख्य व्यक्तिरेखेच्या विरोधात ठेवणे सतत भाग पडले आहे. त्याच्या श्रद्धेला तडा जाणारी, छेद देणारी घटना एकच आहे असे नव्हे. त्या घटनांची जी काही संख्या, क्रम आहे त्याचा आलेख एकाच रेषेतला आखीव स्वरूपाचा वाटतो. त्यामुळे त्याच्या परिणामांची गुणवत्ताही एकाच रेषेवर ओठंगून राहते !

श्री चिंतामणी या नाट्यसंस्थेने पेश केलेल्या या प्रयोगात प्राध्यापकाच्या ( माधवच्या ) भूमिकेमध्ये चंद्रकांत गोखले होते. त्यांचे काम पाहताना आरंभी असे वाटले की, त्यांना बरेच दिवसांनी मोठी आणि वेगळी भूमिका मिळाली आहे; पण जसजसा त्यांच्या भूमिकेचा उलगडा होत गेला तसतसे ध्यानी आले की, त्यांचा जो एरवीचा अभिनयाचा बाज आहे त्याला जवळ जाणारी अशी ही भूमिका आहे. म्हणजे असे की, ध्येयवादी, निष्ठावान शिक्षकाचाच हा प्राध्यापक झाला असावा अथवा त्या वृत्ती जोपासलेला असावा. त्यामुळे आचारविचारातली सात्त्विकता, पोषाखातही नेहमीचे सदरा, धोतर वगैरे आहेच. चंद्रकांत गोखले यांनी मन:पूर्वक अभिनय करूनही त्या व्यक्तिरेखेचे समाधान पूर्णपणाने मिळू शकले नाही. तीच गोष्ट शीला गुप्ते यांची. बाकीच्या भूमिका ह्या तशा दुय्यम, पूरक होत्या. उदा. मुलगा शेखर (राजन ताम्हाणे), मुलगी नंदा (स्वाती बोवलेकर), प्रा. कदम ( सुनील शेंडे ), जावई श्रीकांत ( विसू कामेरकर ) इत्यादी. ह्या पूरक भूमिकांमध्ये विशेष लक्षात राहिला तो मुलाच्या भूमिकेतील राजन ताम्हाणे. त्याचे दिसणे, वावरणे, संवाद बोलणे सारेच परिणाम घडवणारे, लक्षवेधी ठरले.

नाटकाचे दिग्दर्शक होते कमलाकर सारंग. हे नाव आता व्यावसायिक नाटकांच्या दिग्दर्शकांमध्ये एक लक्षवेधी नाव म्हणून घेतले जाते. सारंगांनी हे नाटक नीटनेटकेपणाने दिग्दर्शित केलेले असले तरी त्यात खास असा कोणताच भाग नाही. या नाटकाच्या दिग्दर्शनाने त्यांच्या यादीत आणखी एक भर पडली एवढेच ! त्यांना या नाटकाचे आव्हान कोणत्या कारणासाठी वाटले ते मात्र समजू शकले नाही. आहे त्यापेक्षा संहितेच्या रचनेचे रेखीवपण त्यांनी करवून घेणे अगत्याचे होते. त्यांना आता व्यावसायिक नाटकाच्या संहितेच्या नेमक्या जागा अधिक माहीत आहेत. त्याचबरोबर प्रयोगाचे जे एक तांत्रिक अंग पार्श्वसंगीत किंवा काही पार्श्वशब्द, गाण्याचा वापर असलेले ध्वनिमुद्रण अतिशय सदोष वाटले.' निदान पुण्याच्या प्रयोगात तरी त्या ध्वनिमुद्रणातील शब्दांना श्राव्यता, स्पष्टता नव्हती. त्यामुळे त्या तांत्रिक अंगाने आपली परिणामकारकताही गमावली; पण हा दोष दुरुस्तीतला आहे. नेपथ्याबद्दलही आवर्जून सांगण्याजोगे काही नाही.

□



# फसलेला-झूठासच

सध्याचे दिवस संपाचे आहेत. दिवसागणिक कुणाचा ना कुणाचा तरी संप चालूच असतो. आज काय गिरणी कामगारांचा संप तर उद्या गोदी कामगारांचा कधी डॉक्टरांचा तर कधी परिचारिकांचा. कुणाचा पगारवाढीसाठी. कुणाचा बोनससाठी. एक ना दोन अनेक कारणं. जरा कुठं खुट्टं झालं की संप. असे हे संपमहाराज सामाजिक जीवन ढवळता ढवळता अलगदपणे घरात कधी प्रवेशते झाले, कुणालाच कळलं नाही आणि हळूहळू बाह्यपरिस्थितीचे पडसाद घराघरातून उमटायला लागत असताना लटक्या संपांना मात्र बहर आला. नवरा साडी घेत नाही म्हणाला, बायकोचा संप. बायको फिरायला येत नाही म्हणाली, नवऱ्याचा संप. सासू रागावली सूनेचा संप. सून काम करत नाही, सासूचा संप...पण 'झूठासच'च्या मुलांची तऱ्हा काही औरच. या मुलांनी चक्क 'नवी आई आणावी' म्हणून संप पुकारला.

पण कुठलाही संप का झाला हे समजून घ्यायला थोडीशी पार्श्वभूमी माहीत असायला हवी. नाही का? तर ही थोडीशी पार्श्वभूमी. बिन्नी (जुगल हंसराज) आणि पिंकी (बेबी पिंकी) ही दोन छोटी मुलं. विजय (धर्मेंद्र) ची ही मुलं. विजयची पत्नी मागंच गेलेली. त्यामुळे मुलांना आईची उणीव पदोपदी भासतेय. मॅडम (ललिता पवार) मुलांचं सारं काही प्रेमानं करतेय; पण शेवटी आई ती आईच. आईची सर थोडीच मॅडमना येणार? तेव्हा मुलांनी वडिलांकडे नव्या आईसाठी झक्कू लावलाय; पण पहिल्या बायकोची आठवण विसरू न शकणारा आणि नवी आई मुलांना नीट वागवेलच याची खात्री नसलेला विजय मुलांच्या मागणीला राजी होत नाही. तेव्हा मात्र एक दिवस मुलं संप करतात. नवी आई आणेपर्यंत खाना, पीना, स्कूल जाना, बाते करना, सबकुछ बंद. मग मात्र वडील विरघळतात आणि लग्नाला राजी होतात. लग्नाला राजी झाले खरे; पण बायको कुठाय? तीही जबाबदारी मुलंच स्वीकारतात. इथं पोरं चिक्कार आगाऊपणा करतात; पण आई शोधून काढतात. मिस् अलका (रेखा) आई म्हणून येते.

आता इथपर्यंत गाडी आल्यावर मुलांनीच स्वखुषीनं आईला निवडलंय तेव्हा मुलांचं आणि नव्या आईचं पटत नाही, नव्या आईच्या जाचाखाली मुलं कोमेजून जाताहेत वगैरे दाखवता येत नाही आणि दाखवायचं म्हटलं तर त्यात नाविन्य काही नाही. कारण असे ढीगानी चित्रपट आलेत. अलकानंही मुलांचा आणि अशा प्रकारच्या संसाराचा स्वीकार मनापासून, जाणूनबुजून केलाय तेव्हा तिची नव्या संसारातील घुसमट वगैरे दाखवणं दूरच राह्यलं. मुलांच्या प्रयत्नांनी विजयही नकळत अलकात गुंतत जातो आणि पहिल्या बायकोची आठवण, नव्या आईकडून मुलांना त्रास होईल वगैरे शंका दुय्यम ठरतात. मॅडमनाही मुलांना नवी आई आलेली हवीच आहे. तेव्हा 'हम दो हमारे दो'च्या सुखी संसारात वीष कालवणंही दूरच. संघर्ष निर्माण करण्यासाठी योग्य अशा सर्व मार्गांची अशी झकास वाट लागल्यानंतर संघर्षाला कुठं वावच राहात नाही; पण नाही. हा संघर्ष निर्माण होतो तो हनीमूनला गेलेल्या विजय–अलकाच्या गाडीला अपघात होऊन झालेल्या विजयच्या मृत्यूनं. म्हणजे मुलांना आई मिळाली तर वडील गेले. वडिलांच्या मृत्यूची बातमी मुलं एकदम स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून अलका विजयसारख्याच दिसणाऱ्या टायगरला 'टेंपररी वडील' म्हणून एक महिन्यासाठी घेऊन येते. तीन लाखाच्या करारानुसार टायगरनं मुलांच्या मनात नफरत पैदा करायची. त्याचाच फायदा घेत अलकानं मुलांच्या जवळ जायचं आणि मुलांना वडिलांच्या मृत्यूची झळ पोचू द्यायची नाही. इथपर्यंत एका छानशा कौटुंबिक, साध्या, सरळ वळणानं जाणारी ही कथा नंतर एक वेगळच वळण घेते आणि सगळा तोलच जातो. कारण टायगर हा एक प्रख्यात गुंड. तेव्हा त्याची गुंडगिरी दाखवायची म्हणजे त्याचा अड्डा हवा, बॉस हवा, कॅब्रेसदृश गाणं हवं, येताजाता केलेली मारामारी हवी...तेव्हा हा सगळा फिल्मी फापटपसारा येतो, तर दुसरीकडे मुलांच्यात नफरत पैदा करणं हा हातचा मळ समजणारा टायगर हळूहळू मुलांच्या प्रेमात गुरफटतो आणि एक दादा चक्क प्रेमळ पिता बनतो.

## ठीक अभिनय

चित्रपटातील दिग्दर्शकाची भूमिका ही जहाजावरीलकप्तानासारखी असं मानलं जातं. त्यामुळेच चित्रपटाच्या मूळ संकल्पनेविषयी खुद्द दिग्दर्शकाचीच गफलत झाली म्हणजे चित्रपटाचं तारू किती आणि कसं भरकटत जातं, याचं 'झूठा सच' हे उत्तम उदाहरण. इस्माईल श्रॉफ या दिग्दर्शकाचा हा चित्रपट. नव्या नव्या कल्पना हाताळण्याचं वेड असलेला आणि या नव्या कल्पना योग्य रीतीनं प्रेक्षकांपुढे मांडण्याचं कसब असलेला हा दिग्दर्शक. हिंदी चित्रपटसृष्टीत आवर्जून नाव घ्यावे असे जे मोजके चित्रपट आहेत, त्यांच्या-

तला एक; पण हाच दिग्दर्शक 'झूठा सच' मध्ये मात्र निराशा करतो. मूळ कथेला फार फाटे फुटल्यानं हा चित्रपट धड ना आईसाठी हट्ट धरणाऱ्या मुलांचा राह्यलाय, धड ना विजयच्या मृत्यूपाठोपाठ मुलांचं भावविश्व उध्वस्त होऊ नये म्हणून धडपडणाऱ्या अलकाचा राह्यलाय, धड ना मुलांची आई आणि बाबा या दोन्ही भूमिकातून वावरणाऱ्या विजयचा राह्यलाय आणि धड ना टायगरच्या जंगलीपणाकडून सुसंस्कृत माणसापर्यंत होणाऱ्या प्रवासाचा झालाय. हे चार वेगवेगळे प्रवाह एकमेकात गुंतवून एक सलग कथानक बांधण्याचं-फुलवण्याचं दिग्दर्शकीय कसबही कुठं दिसत नाही. त्यामुळे या चारी प्रवाहांचा प्रवास सुटासुटाच होत राहतो. चित्रपटाचा नंतरचा अर्धा भाग पूर्वी आलेल्या 'अनोळखी' या मराठी चित्रपटाची आठवण करून देतो. टायगरची व्यक्तिरेखा स्पष्ट करण्यासाठी घुसडलेल्या फिल्मी फापटपसाऱ्यामुळं या चित्रपटाला पहिल्या अर्ध्या भागात मिळालेला कौटुंबिक बाजही निघून जातो आणि हा चित्रपट धड ना कौटुंबिक (उदा. मासूम) ना धड पूर्ण व्यावसायिक (उदा. कुठलाही हिंदी चित्रपट) असा मधल्याच कुठल्यातरी अवस्थेत लोंबकळत राहतो. अलकाची प्रेक्षकांना ओळख होते ती नृत्यगायनातील प्राविण्यानं; पण पुढच्या कथानकात मात्र तिच्या या गुणाचा काहीच सहभाग नाही. अमरीश पुरी, अरुणा इराणी वगैरे व्यावसायिक हुकमी एक्के तर चांगलेच फरफटतात. शेवटच्या मारामारीत तर धर्मेंद्रचा प्रत्येक प्रतिस्पर्धी धर्मेंद्रकडूनच गोळी मारून घ्यायला आल्यासारखा एकापाठोपाठ एक असा पुढं येत राहतो आणि गोळी खाऊन तळ्यात पडत राहतो. याला काय म्हणायचं?

धर्मेंद्र (दुहेरी भूमिका), रेखा, जुगल हंसराज आणि बेबी पिंकी हे 'झूठा सच' चे चार मुख्य कलाकार. सनी दयोलच्या रूपानं आपलं वय जाहीर करणारा धर्मेंद्र चित्रपटासाठी मात्र ते वय स्वीकारायला तयार नाही आणि त्यामुळेच अजूनही नायिकेच्या मागून झाडामागं पळण्याच्या भूमिका करण्याची त्याची उमेद संपलेली नाहीय. अर्थात 'झूठा सच' मध्ये या गोष्टींना वाव कमी असला तरी विशीतल्याच काय, पण पस्तिशीतल्या प्रौढ नायकाच्या भूमिकांमधूनही धर्मेंद्रनं बाद होण्याची वेळ आलीय, हे या चित्रपटावरून स्पष्ट व्हावं. आधीचा कुटुंबवत्सल नायक आणि नंतरचा दादा नायक यांच्यातला फरक त्यानं चांगला दाखवला असला तरी त्याच्या हालचालीतला उसनेपणा मात्र लपत नाही. रेखानं मात्र हळूहळू काळाशी तडजोड करत प्रौढ भूमिका स्वीकारायला सुरुवात केलीय आणि पूर्वीच्या खट्याळ, चंचल, ग्लॅमरस भूमिकांइतकीच ती या प्रौढ, ग्लॅमरहीन भूमिकाही सफाईनं करू शकतेय. जुगल हंसराज ही शेखरकपूरच्या 'मासूम' नं हिंदी चित्रपटसृष्टीला दिलेली एक 'मासूम' भेट. निळ्या डोळ्यांचा आणि विलक्षण संवेदनाशील चेहरा लाभलेला हा बालकलाकार. 'मासूम' मधल्या बालकलाकारांनी हिंदी चित्रपटातल्या बालकलाकारांचा चेहरामोहरा बदलून टाकला असला तरी या बालकलाकारांचं पुढं किती चीज होणार ही धोक्याची जाणीवही करून दिली होती. कारण हिंदी चित्रपटातले बालकलाकार पोरांसारखे कधीच वागत नाहीत. म्हणजे हिंदी चित्रपटात हे बालकलाकार जसं वागतात, त्यातून दिग्दर्शकाला खट्याळपणा सूचित करायचा असला तरी प्रत्यक्षात मात्र तो आगाऊपणा दिसतो आणि या बालकलाकारांच्या आगाऊपणानं 'झूठा सच' मध्ये तर कळसच गाठलाय. त्यामुळेच चित्रपटाच्या पहिल्या अर्ध्या भागातल्या या मुलांच्या अतिशहाणपणा, भोचकपणाच्या पार्श्वभूमीवर नंतरच्या अर्ध्या भागात त्याच मुलांचं लहान मुलांसारखं वागणंच पटेनासं होतं. अर्थात व्यक्तिरेखांमधला हा दोष सुसह्य होतो तो जुगल आणि पिंकीच्या सहज सुंदर अभिनयामुळं !

एका खोट्याला खरं करण्याची नस नेमकी पकडता न आल्यानं संपूर्ण चित्रपटच कसा फसला हे मात्र 'कडवं सच' आहे.

—शुभदा रानडे


५००+५ = ४००+५००

निवडक आणि दर्जेदार राजहंस प्रकाशने
आपल्या संग्रही ठेवण्यासाठी

**राजहंस ऑगस्ट ८४ योजना**

आपण ५०० रुपयांची ठेव ५ वर्षासाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेवल्यास व्याजाच्या मोबदल्यात ४०० रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपणास मिळतील व ५ वर्षानंतर ५०० रु. ची ठेवही परत मिळेल.

**शिवाय**

पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत सभासदांस मिळू शकतील. (पोस्ट खर्च सभासदांचा).

अपेक्षित सभासद नोंदणी झाल्यावर योजना बंद होईल.

**सविस्तर योजना पत्रक मागवा.**

**राजहंस प्रकाशन**
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
वेळः सकाळी ११ ते ५
•
वा. र. गोडे, जोशीवाडी, चितळे पथ कॉर्नर,
४१, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.
वेळः दुपारी २ ते ७

PAN ADS

**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.

एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाची पार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

**मूल्य चाळीस रुपये**

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

# नाट्यपंढरी



## □ प्रिये पहा...

'सौभद्र' हे मराठी रंगभूमीचे सौभाग्य. त्यात कृष्णाची भूमिका वाटणीला येणे हे गायक नटांचे महत्भाग्य ! किंबहुना गायक नटांचा तो बहुमान. कारण एक काळ असा होता की जी कंपनी सौभद्र करीत नाही. ती संगीत नाटक मंडळीच नाही असे समजले जाई.

अगदी बाळकोबा नाटेकर यांच्या पहिल्या कृष्णाच्या भूमिकेपासून आजपर्यंत किती तरी कृष्ण होऊन गेले. कृष्णराव गोरे, गंगाधरपंत लोंढे यांच्या कृष्णाच्या कामाचे, गानअभिनयाचे खूप कौतुक झाले. गेल्या काही वर्षात नटवर्य जयराम शिलेदार, नेवरेकर, मा. भार्गवराम आचरेकर, रामभाऊ मराठे आदी अनेक गुणवंत त्या भूमिकेत गाजले; पण किर्लोस्कर किंवा गंधर्व संप्रदायातून न येताही एका श्रेष्ठ गायक नटाने त्या भूमिकेवर अधिराज्य गाजविले ते म्हणजे सौदागर, स्वरराज छोटा गंधर्व यांनी !

१९४७-४८ च्या सुमारास जुन्या नाटक मंडळ्यांचा मामला संपुष्टात आला होता; पण पंडितराव तर्टे नावाच्या नाट्य व्यवसायातल्या मुरब्बी नि महत्त्वाकांक्षी माणसाने 'भारत नाट्यकला' नावाची संस्था उभारली होती. अनेक नामवंत नट त्यांनी हाताशी धरले होते. सौभद्र, विद्याहरण, मानापमान इत्यादी जुन्या नाटकांचा धडाका सुरू केला होता; पण कलावंताच्या हातात मात्र कधी वेळेवर पैसे पडत नव्हते. एक नट गेला तर दुसरा, हे मालकांचे व्यवहारी धोरण होते. एकदा असाच कृष्णाचे काम करणाऱ्या नटाचा पगार ( हवे तर नाईटस् म्हणा ! ) थकला होता. त्या नटाने सभ्यतेने नि सबुरीने वागूनसुद्धा अखेर त्याला काम सोडावे लागले. अशाच अडचणीत पंडितरावांनी सौदागरांची विनवणी केली नि ते कृष्ण म्हणून उभे राहिले. 'कलाविकास'चा कारभार आटोपला होता. सौदागर कृष्ण म्हणून रंगले ती खरेच अमृतवेळा ठरली. नाही तर त्यांचे स्कूल बाल मोहन नाटक मंडळीचे. आचार्य अत्र्यांच्या सर्वच नाटकात ते हिरो होते; पण अत्र्यांच्या नाटकातले संगीत मर्यादित होते. नाटके सामाजिक होती; पण त्यातही सौदागरांचे खूप नाव झाले होते. गायक नट म्हणून ते कंपनीचा प्राण होते. सहाजिकच त्यांच्याजवळ गोडे होतेच; पण कृष्णाची भूमिका रंगविताना त्यांना फार मोठा फायदा झाला तो सामाजिक नाटकातल्या अभिनयाचा. त्यांनी कृष्णाच्या मुकुटाआड लपलेला कृष्णाचा मिस्किलपणा त्या भूमिकेत असा ओतला की, प्रेक्षकांना तो कृष्ण पौराणिक राहूनही आपल्यातलाच वाटू लागला. रंगतदार झाला.

त्यांनी लहानपणी कृष्णराव गोऱ्यांचा कृष्ण पाहिला होता. तो त्यांच्या मनावर बिंबला होता. कृष्णराव गोऱ्यांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. त्याचा एक धागा सौदागरांचा गोड गळा. दुसरा, ते दोघेही सातारा जिल्ह्यातले. ( गोरे-वाई, सौदागर-कोरेगाव ) शिवाय गाण्यांची जुनी बैठक न मोडता, आपल्या खास ढंगात ती अधिक गोड केली. त्यांनी स्वतःची 'छोटा गंधर्व कर्सन' स्थापून कृष्णाच्या भूमिकेचे जणू पेटेंटच घेतले. सौभद्राचे शेकडयांनी खेळ केले. पंचवीस तीस वर्षं, कृष्ण म्हणजे स्वरराज छोटा गंधर्वच अशी रसिकांची भावना होती. कृष्णासारखाच त्यांचा धैर्यधर नि चारुदत्त खूप लोकप्रिय झाला; पण एक वेळ यावी लागते. संधी मिळावी लागते. आजही 'प्रिये पहा, रात्रीचा समय सरूनी...'चे सूर कानावर पडले की, सौदागरांचा तिसऱ्या अंकातला तो शेवटचा प्रवेश जसाच्या तसा डोळ्यांपुढे उभा राहतो.

मला आपलं उगीचच वाटतं, 'गंधर्व' ( नारायणराव बालगंधर्व ) या नाममुद्रेची, या केशरकस्तुरी गंधटिळ्याचीच ही किमया असावी. मग ते छोटागंधर्व असोत, कुमारगंधर्व असोत, नाही तर सवाईगंधर्व असोत !

## □ टक्कल-एक जुगलबंदी !

दादरच्या डिसिल्व्हा हायस्कूलच्या प्रांगणात चित्रपट महोत्सव सुरू होता. सिनेकलावंतांचे करमणुकीचे अनेक कार्यक्रम होते. त्यात आचार्य अत्रे यांच्या सदाबहार (Ever Green) 'लग्नाची बेडी' या नाटकातले काही प्रवेश होते.

दुसऱ्या अंकातला गार्गी-गोकर्ण यांचा भांडणाचा प्रवेश सुरू झाला. गोकर्ण होते राजाभाऊ परांजपे. गोकर्ण म्हणतो, 'अग, तो अवधूत आहे महामूर्ख. त्याचं काय सांगतेस !' तेवढ्यात अवधूत (शरद तळवळकर) प्रवेश करतो नि गोकर्णाला विचारतो, 'काय हो हे, आपल्या बायकोसमोर माझी धडधडीत बदनामी करीत होतात.' त्यावर गोकर्ण सुनावतो, 'नवरा-बायकोच्या खाजगी भानगडीतल्या गोष्टी ऐकायच्या नसतात अवधूत.' त्यावर अवधूत म्हणतो, 'वा, म्हणजे तुम्ही भांडत होतात होय ? अहाहा, बायकोशी भांडण्यातसुद्धा एक प्रकारचा रोमान्स असेल नाही ? आमच्या नशिबात हे भाग्य केव्हा यायचे असेल ते येवो.' त्यावर राजाभाऊ परांजप्यांनी ( गोकर्ण ) रिस्पॉन्स दिला ( नाटकात नसलेला ) तो असा- त्यांनी आपली पगडी काढली नि टक्कलावर हात फिरवीत म्हणाले, 'भाग्य ! हे असं होईल.' सहाजिकच प्रेक्षकात हशा पिकला; पण त्यांचे जोडीदार शरद तळवळकर ( अवधूत ) हेही काही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. त्यांनी तो हशा ओसरताच, आपल्या डोक्यातली घोंगडीची टोपी काढून आपल्या गुळगुळीत टक्कलावर हात फिरवीत किंचित खाली वाकून म्हणाले, 'अहो, आम्हाला सवय आहे त्याची; पण बायकोशी भांडण्याचं भाग्य लाभू दे हो एकदा तरी !' अर्थातच या टक्कलांच्या जुगलबंदीने हास्याचा स्फोट झाला.

# लंडन / दिल्ली....

आठव्या लोकसभेची निवडणूक दारांवर येऊन ठेपली आहे. छत्तीस कोटी मतदार आपल्या पसंतीच्या पक्षावर शिक्कामोर्तब करतील आणि सुरू होईल नवा भिडू नवे राज्य.

हे भिडू कसे असतील ?

गांधी–नेहरू–पटेल या पर्वातले तर नसतीलच. चळवळीचं, आदर्शवादाचं राजकारण आता संपलं. आता राजकारण मॅनेजमेंटचं ! या राजकारणात स्वातंत्र्य, समता, बंधूभाव ही मूल्यं नाहीत तर फक्त इनपुट्स आणि आउटपुट्सचं रोखठोक गणित. शेवटचं ध्येय एकच–सत्ता–अनिर्बंध सत्ता.

ब्रिटिश पार्लमेंट आणि आपली संसदीय पद्धती यातलं साधर्म्य लक्षात घेतलं तर बदलत्या राजकीय चित्राच्या पार्श्वभूमीवर जेफ्री आर्चर या विख्यात इंग्रजी कादंबरीकाराची ' फर्स्ट अमंग इक्वल्स ' ही नवी कादंबरी लक्ष वेधून घेते.

ब्रिटिश पद्धतीत–कॉन्झर्व्हेटिव आणि लेबर हे दोनच प्रमुख पक्ष तर आपल्याकडे एका पक्षातसुद्धा अनेक पक्ष; पण सत्ता संपादनाची रीत, त्यातली उघडीवागडी स्पर्धा तीच !

रेमंड गोल्ड आणि अँड्र्यू फ्राझर हे दोघं लेबर पार्टीचे सदस्य तर चार्लस् सेमूर आणि सायमन कसलेक हे कॉन्झर्व्हेटिव पक्षाचे.

रेमंड खाटकाचा मुलगा, खेड्यातल्या शाळेत शिकलेला. अँड्र्यूचे वडील कॉन्झर्व्हेटिवचे लॉर्ड; पण अँड्र्यू स्वतः लेबर पार्टीचा. चार्लस् जमीनदाराच्या घरातून आलेला तर सायमन मध्यमवर्गीय कुटुंबातला. चौघांचे आयुष्य वेगळे; पण महत्त्वाकांक्षा एकच–सत्ता ! इंग्लंडचे पंतप्रधानपद–नंबर टेन डाऊनिंग स्ट्रीट.

१९६५ मध्ये चौघेही ब्रिटिश संसदेचे सभासद म्हणून निवडून येतात आणि मग सुरू होते मती गुंग करणारी एक सत्ताशर्यत.

चाळीस वर्षांच्या संसदीय राजकारणात–खाचखळग्यात–वेगवेगळी वळणे घेत त्यांच्यापैकी एकच ह्या स्पर्धेत यशस्वी ठरतो. तो कोण ? रेमंड की अँड्र्यू ? चार्लस की सायमन ? जेफ्री आर्चर ह्या स्पर्धेची उत्कंठा कादंबरीच्या शेवटच्या परिच्छेदापर्यंत टिकवून ठेवतात.

थोड्याफार फरकाने आपल्या आसपासच्या दिल्ली–मुंबईच्या राजकारणात नव्या युगाची नांदी देणाऱ्या, सत्ता हेच उद्दिष्ट असणाऱ्या व्यवसायनिपुण माणसांसारखी ही माणसे. त्यांच्या आशा आकांक्षांचा, सत्तास्पर्धेचा भेदक आलेख सादर करणारी जेफ्री आर्चर यांची ही एकोणीसशेचौऱ्यांऐंशी सालातली नवी कोरी कादंबरी, निवडणुका संपल्या संपल्या व नवे सरकार दिल्लीत अधिकारारूढ होत असताना नक्कीच लक्षावधी वाचकांना आकर्षून घेणारी ठरणार आहे.

जेफ्री आर्चर स्वतः एकोणीसशे चौऱ्याहत्तरपर्यंत हाऊस ऑफ कॉमन्सचे सदस्य होते. आतापर्यंत त्यांनी पाच बेस्ट सेलर कादंबऱ्या लिहिल्या आणि ही नवी ' फर्स्ट अमंग इक्वल्स ' तर त्यांच्या अनुभवातून उतरलेली.

या कादंबरीचे स्वैर रूपांतर

# शर्यत

रुपांतर–लेखक : विष्णू जयदेव, मुंबई.

पुढील अंकी